# १

# ग्रामीण वस्ती भूगोल

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ मानवी वस्तीची उत्क्रांती
१.३ ग्रामीण वस्ती

## १.० उद्दिष्ट्ये

- मानवी वसाहतीची सुरुवातीच्या काळापासून म्हणजे अश्मयुगीन काळापासून ते नागरीकरणाची संरचना समजून घेणे.
- ग्रामीण वसाहतीची उत्क्रांतीच्या पद्धती समजून घेणे.
- ग्रामीण वसाहतीची संरचना समजून घेणे.
- भारतातील ग्रामीण वसाहतीचे प्रकार अभ्यासने.
- भारतातील घरांच्या रचनेवर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- जगातील घरांच्या रचनेची तोंड ओळख करणे.

## १.१ प्रस्तावना

युनायटेड नेशन्सच्या १९७६ च्या म्हणण्यानुसार मानवी वस्ती म्हणजे संपूर्ण मानवी समाज होय ज्यात शहराचा नगरचा किंवा एखाद्या खेडेगावचा समावेश असू शकतो, म्हणजेच सामाजिक, भौतिक संघटनात्मक, धार्मिक आणि संस्कृतीक घटकांचा समावेश देखील होतो.

वस्तीभूगोलाचा अभ्यास हा मानवी भूगोलातील महत्वपूर्ण घटक आहे. मानवीवस्ती भूगोलाचा अभ्यास हा जगातील मानव व पर्यावरण यांचे नातेबंध दर्शवतो मानवाच्या वस्त्या या मानवाची परीभाषीकता दर्शवतात कि त्या वस्तीच्या ठिकाणचा मानव कायम वास्तव्याचा आहे किंवा तात्पुरत्या वास्तव्याचा आहे.एखाद्या वस्तीमध्ये अनेक घरांचा समावेश असतो यातील काहीजण तात्पुरत्या वस्तीसाठी असतात जे ऋतूनुसार स्थलांतर करतात. वस्ती छोटया आकाराची किंवा विखुरीत असते किंवा मोठया आकाराची आणि त्याबरोबरच जवळीकता असते. सर्वात उल्लेखनीयबाब म्हणजे मोठया प्रमाणात वाढती लोकसंख्या होय.

munotes.in

## १.२ मानवी वस्तीची उत्क्रांती- Evolution of human settlement

विकासाच्या अगदी सुरुवातीच्या काळात माणूस हा अन्न जमा करणारा होता. अन्नपुरवठा हा सुरक्षित नसल्याकारणाने तो एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत झाला. त्याकाळात त्याचे कायम वास्तव्य नव्हते.

पृथ्वीतलावर माणूस हा अतिशय बुद्धिवान प्राणी आहे. तो नैसर्गिक घटनांचे निरीक्षण करतो आणि त्याच्याशी संबंधित वैज्ञानिक मुलतत्वे ही जाणतो. त्याने बियांपासून झाड तयार होण्याच निरीक्षण केल असणार आणि त्याच्या अस लक्षात आल असणार की त्याला स्वतःला लागणाऱ्या अन्नपुरवठ्याची निर्मितीही लागवडीद्वारे करता येऊ शकते. लागवडीसाठी किंवा शेतीसाठी सुपीक माती आणि पाण्याचा कायम पुरवठा या दोन महत्वाच्या गरजा आहेत. या दोन्ही गरजा नदीच्या खालच्या पात्रातच पूर्ण होऊ शकतात. म्हणजेच नदीच पात्र आणि सुपीक गाळ याला पाण्याचा कायमचा पुरवठा असतो.

त्यामुळे शेत जमिनीची राखण करण्यासाठी त्याच्या बाजूला घर बांधणं अतिशय गरजेचं होऊन गेल आणि हिच कायमच्या गावाच्या वस्तीची सुरुवात असली पाहिजे. हे इसवी सन पुर्व ५००० ते ६००० वर्षापूर्वी आढळते - ज्याला निओलीथिक क्रांती असं म्हणतात. माणूस हा सामाजिक प्राणी आहे आणि तो आपले मित्र आणि नाते वाईक यांच्या साथीने राहण पसंत करतो. सुपीक आणि सुलभ ठिकाणी जिथे पाण्याचा मुबलक पूरवठा आहे ते भाग अतिशय गजबजलेले आहेत. पर्वत राजी आणि जाण्यायेण्या योग्य सोय नसलेले प्रदेश दुर्लक्षित आहेत.

munotes.in

## १.३ ग्रामीण वस्ती -Rural Settlements :

ग्रामीण वस्ती अशी की ज्यामध्ये ग्रामीण भागातील लोक त्यांच्या प्राथमिक व्यवसायात सतत गुंतलेले राहतील उदा. दाखल सांगावयाचे झाल्यास शेती व्यवसाय तर इतर प्राथमिक व्यवसायात मासेमारी, खनिज्यांच्या खाणी इत्यादी या व्यवसायामुळेच मानवी वसाहतीची निर्मिती झाली आहे. ग्रामीण वस्तीचा आकार, स्वरूप यावर आधारित ग्रामीण भागात सखोल शेती केली जाते. बहुतेक ग्रामीण वस्ती हि स्थायी स्वरुपाची असते. तर ग्रामीण वसाहत प्रामुख्याने कमी लोकसंख्या आणि कमी लोकसंख्येच्या घनतेला मदत करणारी असते.

**गावच्या वस्तीचे स्थान आणि परिस्थिती -**

ग्रामीण वस्तीचे स्थान आणि विकास हा त्या वस्तीच्या बाजू आणि परिस्थितीवर अवलंबून असतो. ग्रामीण वस्तीचे प्रत्यक्ष स्थान हे मनुष्याकडून ठरविले जाते. ते ठरवत असताना त्या वस्ती स्थानाच्या सभोवताली असणारी निसर्गाची उपलब्धता व त्यातून मिळणारी संसाधने हि महत्वाची ठरतात.

**स्थानाचे घटक –** स्थान घटक हा मुळात प्राकृतिकदृष्ट्या निदर्शित झालेला आहे. ज्यात जमिनीचा प्रकार व त्याला अनुसरून असणारे घटक म्हणजेच सभोवतालचे हवामान, पाणीपुरवठा, निवारा, मातीची धुप, किंवा घर बनविण्यासाठी लागणारे साहित्य, इंधन, एखादे नैसर्गिक बंदर आणि जंगली प्राणीजीवन इत्यादी.

**सभोवतालचे घटक –** वस्तीची वाढ ही सभोवतालच्या परिस्थितीवर व उपलब्ध असणाऱ्या साधन संपदेवर तसेच सभोवताली असणाऱ्यां सेवा सुविधावर अवलंबून असते. जागा म्हणजे एखाद्या वस्तूच किंवा घटनेचं नेमक ठिकाण, मैदान किंवा गावचा प्रदेश किंवा ज्या वर घराचे बांधकाम केलेलं आहे. जागेचा संबंध हा सरळ सरळ प्राकृतिक हवामान आणि स्थानिक पातळीवर संबंध प्रस्थापित करण्यापर्यंत असतो. गावच्या वस्तीच्या ठिकाणांनी मानव जातीच्या काही मुलभूत गरजा पूर्ण करायलाच हव्यात. पाणी, अन्न, नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण आणि परकीय आक्रमण.

त्यामुळे ज्या जागा निवडण्यासाठी कारणीभूत गोष्टी गावकरी बघत असतात त्या म्हणजे जागा पाण्याजवळ, उपलब्ध जागेजवळ आणि इंधनाच्या आणि वैराणाच्या उगमाच्या जवळ असेल.यावेळी जागा ही छोटया चिंतेपासून सुटका ही महत्वाची भूमिका बजावत असते. टेकडीच्या माथ्यावरील जागा किंवा नदी मधील बेट हे खूप संरक्षणाच्या दृष्टीने निवडल्या जातात. पाणथळ जागा या सर्व साधारणपणे टाळल्या जातात. पुरापासून संरक्षण देत असल्याने डाईकला खूप वेळा पसंती दर्शवली जाते.

आता आपण काही कारणीभूत गोष्टी विस्तृत पणे पाहणार आहोत.

**१) पाण्याचा पुरवठा-** पाणी ही माणसाची सर्वात गरजेची गोष्ट आहे, पाण्याचा साठा नसलेल्या शेजारी वस्ती आहे अशी उदाहरणे खूप तुरळक आहेत. प्राचीन वस्त्या या संरक्षणाच्या कारणामुळे पाण्यापासून थोडया अंतरावर वसलेल्या असायच्या, खूप वेळा विहिरी किंवा कृत्रिमपणे जमिनीत तयार केलेले डबके असायचे. आजकाल काही वस्त्या या वाळवंटाच्या मध्यभागी वसलेल्या आहेत. जो पर्यंत त्यांना तेल किंवा इतर मौल्यवान खनिजांच वरदान मिळालेलं आहे तो पर्यंत पाणी हे पाईपाद्वारे वस्ती पर्यंत आणल जात.

काही वेळेला पाण्याची गरज माणसाना प्रतिकूल ठिकाणी वस्ती करण्यास भाग पाडते, जस दलदलीने वेढलेल किंवा नदीच्या तीरावरच बेट. कोरडया प्रदेशात झरे आणि नद्या वस्त्यांना जगवतात आणि त्या ओलसर वस्त्या म्हणून ओळखल्या जातात. या प्रकारच्या वस्त्यांच चांगल उदाहरण म्हणजे एखाद्या तुटलेल्या ठिकाणी अनेक झरे वाहताना दिसतात आणि अनुषंगिक वस्त्यांना झऱ्याच्या काठावरच्या वस्त्या म्हणतात.

**२) जिराईत जमीन-** शेतकरी हे राहण्यासाठी कधीच अशी जागा निवडणार नाहीत जिथे जमिनी, ह्या त्यांच्या पारंपारिक पिकांसाठी अनुरूप नसतील त्यामुळेच युरोपातील गावाच्या निर्मात्यांनी पाणथळ जागा टाळल्या आणि वर खाली असणाऱ्या डोंगराळ प्रदेशात वसवल्या. दुसऱ्या बाजूला, मोंगोलाईड लोकांनी जेव्हा दक्षिण पूर्व आशियातून

प्रवेश केला आणि वसण्यासाठी नद्यांच्या किनाऱ्यालगत सुरुवात केली. किनाऱ्या लगतची सपाट जमीन ही भाताच्या शेतीसाठी योग्य होती. पिकांना फक्त योग्य जागाच नाहीतर, त्यांची अवजार आणि पद्धतीलाही चालायला हवी. उदाहरणार्थ, युरोपातील सुरुवातीच्या शेतकऱ्यांनी आपली घर दरीतल्या जड चिकणमाती पेक्षा जिथे माती ही हलकी व जास्त सुपीक आहे अशा पठारावर बांधली नाही तर ती नांगराने नांगरली गेली नसती. जुन्या गावच्या वसाहती या पूर्णतः स्वयंपूर्ण होत्या हे लक्षात ठेवण महत्वाच आहे.आणि त्यामुळेच जागा शोधताना ते अशी जागा शोधायचे जिथे त्यांना वेगवेगळ्या जमिनीत गायरान, जिराईत जमीन आणि झाडीचा प्रदेश असेल.

**३) कोरडी जमीन –** गाव उभारण्यासाठी निवडलेल्या ठिकाणी जर पाणी आणि जमीन उपलब्ध असेल तर ती जागा साधारणतः कोरडी असते आणि सतत पुराचा धोका नसलेली असते. जिथे वस्ती नदीच्या जवळ उभी राहिलेली आहे किंवा जिथे किनाऱ्यालगत लोकांनी उंच जागा किंवा कोरडी जमिन शोधलेली आहे. त्याला कोरडया जागेवरच्या वसाहती म्हटल जात. हे कदाचित नागमोडी वळणाच्या बाहेर, नदीच्या माथ्यावर किंवा त्याच्याही वर असेल. उदाहरणार्थ लेविसच्या बरोबरीने खालच्या मिसिसिपीच्या इथे वसाहतीची एक संध रांग आहे. दरीच्या बाजूला पुराच्या सपाट भूभागाच्यावर, मारशेसच्या बेटावर आणि तलाव आणि मानव निर्मित टेकड्याही नेदरलँडची उदाहरणे आहेत.

**४)** निवारा नैसर्गिक घटकांपासून संरक्षण देण्यास जागा योग्य आहे का हे विचारात घेऊन जागेची निवड केली जाते. हिमालयातील माणसे हिने हमी दक्षिणेकडे उजेडाच्या देशेने असणारी उतारावरची जागा निवडतात. गावकरी उंचीवरून वाहणारे वारे ही टाळण्याचा प्रयत्न करतात, जिथे मोकळ्या भूप्रदेशावर वारे हे अतिशय वेगाने वाहत असतात, कडाक्याची थंडी असलेल्या सुकलेला आणि ज्या ठिकाणी धुक्याचा प्रादुर्भाव आहे त्या जागा ही गावकरी टाळण्याचा प्रयत्न करतात. वसाहती या नैसर्गिक वाऱ्याला अडथला असलेल्या आकाराने मोठया झाडांच्या मागे बांधलेल्या असतात. समुद्र किनाऱ्यालगतची गावे हि नेहमीच उपसागर किंवा खजिन्यात पाहायला मिळतात. जागा ठरवण्याचा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे आरोग्य, रोगाचा प्रादुर्भाव  होणाऱ्या ठिकाणी राहण्याचं टाळतात. उदाहरणार्थ इटलीमध्ये जोपर्यंत हिवताप नियंत्रणात आणला गेला नव्हता तो पर्यंत जमिनीलगत असलेला परिसर वसलेला नव्हता.

**५) उपलब्ध असणारे इमारत साहित्य –** सभोवतालच्या परिस्थितीत उपलब्ध असणारे इमारत साहित्य हा घटक वस्तीच्या विकासासाठी आवश्यक घटक आहे. तसेच सभोवतालची असणारी प्राकृतिक रचना हा घटक पण वस्ती विकासासाठी महत्वपूर्ण ठरतो.

पश्चिम हिमालायचा विचार करता त्या ठिकाणी मोठया प्रमाणात भूस्खलन होते त्या ठिकाणी घरासाठी लाकूड बांबूसारख्या घटकांचा जास्त वापर होतो .तर ओरिसा

सारख्या प्रदेशात वालुकामय खडकाचा वापर होतो आणि गंगा नदीच्या खोऱ्यात मातीचे किंवा चिकण मातीचे दगड वस्तीसाठी वापरलेले पहावयास मिळतात.

**६) संरक्षण –** जेव्हा राजकीय अस्थिरता आणि शेजारच्या गटांबरोबर शत्रुत्व असेल तेव्हा संरक्षित जागा हा मोठा फायदा असतो, त्यावेळेस अधिकाधिक गावे वसवली जातात. त्याच कारणाने अनेक गावे हि संरक्षित टेकड्यांवर, बेटांवर किंवा भूशिरावर बांधली जातात. उदाहरणार्थ नायजेरियात, सशक्त 'इंसेलबर्ग' हा चांगल्या सर्कशीत स्थानावर तयार झाला आहे आणि तो नेहमी वसाहतीची जागा म्हणून वापरला जातो. अनेक गाव हि टेकड्यांवर न बांधली जाता त्यांच्या पायथ्याशी बांधली जातात, म्हणजे संकटाच्या वेळी माणस त्यांची तटबंदी मजबूत करू शकतील. अनेक ठिकाणी गाव हि बौद्ध मठ, जुन्या इमारतीच्या जवळपास बांधलेली असतात जेणे करून समाज्यात अशांतता असताना संरक्षण मिळेल.

**ग्रामीण वस्तीची विविध स्थाने –**

१) नदीच्या काठावरील वस्ती,पाणी हि माणसाची सर्वात महत्वाची गरज आहे आणि त्यामुळेच सर्वाधिक वस्ती या बारमाही वाहणाऱ्या नदीच्या काठावर आहेत.

२) शुष्क स्थान वस्ती या सामान्यतः नदीमुळे पूर येणाऱ्या भागात आढळतात.या वस्तीवरच्या भागात आढळतात जिथे शक्यतो पुराची भीती कमी असते.

३) आर्द्रस्थान वस्ती – ज्या भागात पाण्याची कमतरता असते, वस्ती साधारणतः नदीच्या उगमापाशी असते आणि त्याला आर्द्रस्थान वस्ती म्हणतात.

४) संगमावरील वस्ती – या वस्त्या दोन नद्यांच्या संगमावर वसलेल्या असतात.

५) फोर्डस्थान वस्ती - ज्या ठिकाणी एकटा माणूस नदीपार करून जाऊ शकेल त्या ठिकाणी फोर्डवस्ती वसलेल्या असतात. (म्हणजे होडीचा वापर केल्याशिवाय) ज्यावेळी पाण्याची पातळी कमी असते त्याचवेळी हे शक्य असत. या ठिकाणी दोन रस्ते एकत्र येतात, त्या फोर्डस्थाना जवळ या वस्त्या असतात.

६) फेरीस्थान वस्ती – जर नदीच्या पाण्याची पातळी जास्त असेल, तर टी फक्त होडीचा उपयोग करूनच पार करता येते. होडी ही फेरी म्हणूनही ओळखली जाते. त्यामुळेच काही जागा या फेरीस्थान म्हणूनच ओळखल्या जातात.

७) पुलाजवळील नदी – साधारणतः जमिनीवरचे रस्ते पुलाजवळ एकत्र येतात आणि म्हणूनच वस्त्या या पुलाजवळ वाढतात.

८) पायऱ्यांच्या उतारावरील वस्ती – किनाऱ्या लगतच्या वस्त्या या समुद्र सपाटीपासून उंचीवर वसलेल्या असतात, म्हणजे पायऱ्यांच्या उतारावरील वस्त्या या पुराचा धोका टाळण्यासाठी असतात.

९) सागरीकिनाऱ्या लगतची वस्ती – या समुद्र किनाऱ्यालगत वसलेल्या असतात.या संपर्क केद्र वस्त्या असतात. म्हणजे – मासेमारी आणि शेतीच्या मधील संपर्क.

१०) खिंडीतील वस्ती – खिंड हि डोंगराळ भागातील जागा असते जिथे समुद्र सपाटी पासुंनची उंची कमी असते आणि म्हणून डोंगर रांगा पार करण्यासाठी हे अतिशय योग्य ठिकाण आहे.

जमिनीवरचे रस्ते खिंडीजवळ एकत्र येतात आणि म्हणून वस्त्या या खिंडी जवळ तयार होतात. उदाहरणार्थ- खोपोली

११) टेकडीच्या माथ्यावरील वस्ती – पर्यटनाच्या जागा किंवा किल्ले हे उंच ठिकाणी असतात, आणि म्हणून या ठिकाणी वस्त्या तयार होतात.

१२) सपाट (मोकळ्या) जागेवरच्या वस्त्या – डोंगराळ भागात सपाट जमीनवस्त्या वसवण्यासाठी अतिशय दुर्मिळ असते म्हणून वस्त्या या सपाट जागेवर वसवलेल्या असतात.

१३) सोंडेच्या आकाराची वस्ती – कड्यांमुळे वाहतुकीसाठी अडथला निर्माण होतो आणि म्हणून वाहतुकीचा रस्ता सोंडेच्या ठिकाणी वळण घेतो. म्हणून खिंडी प्रमाणे वस्तीसोंडेच्या टोकाला तयार होते.


१४) दरीतील वस्ती – वस्ती वसविण्यासाठी दरीतील जागा ही अतिशय अनुकूल जागा आहे .अशा प्रकारच्या वस्त्या या नदी जवळ दरीमध्ये आढळून येतात.

**स्कंधावरील वस्ती –**
स्कंधावरील वस्ती डोंगररांगांच्या दोन्ही बाजूचे अतिशय सुंदर दर्शन घडविते आणि म्हणून अशा प्रकारची ठिकाण ही आदर्श पर्यटन स्थळ म्हणून तयार होतात.


**गावच्या वस्तीची संरचना-**
गावच्यावस्तीची संरचना दोनप्रकारे हाताळली जाऊ शकते.पहिलं वस्तीच्या आकारमानाचा अभ्यास करून आणि दुसर वस्तीच्या आकाराच्या हाताळणीमधून गावच्या वस्तीत एका घरापासून ते शंभर घरांच्या घोळक्या पर्यंत विविधता असते, तरी पण ती साधारणतः तीन मुख्य आकारमानाच्या श्रेणीत असतात.

**अ) विलग वस्ती –** साधारणतः यात एक इमारत किंवा इमारतीचा समूह असतो, विलग वस्ती –
साधारण यात एक इमारत किंवा इमारतीचा समूह असतो एका कुटुंबाचं निवास आणि एखाद्या वेळेस अनेक शेतमजूर विलगवस्ती साधारणतः दुसऱ्या वस्तीपासून काही अंतरावर शेताच्या ठिकाणी बांधलेली असते, कारण एक तर शेतकऱ्याना त्याच्या स्वतः च्या जमिनीवर रहायला आवडत. लांबच्या गावावरून प्रवास करण्यापेक्षा किंवा शेत हे नेहमीच्या वस्तीपासून लांब असल्यास पशुपालनाच्या अर्थकारणात ही ते खूप नित्याच आहे, जेव्हापासून प्रत्येक शेतकऱ्याच्या जागेवर काम कारण मोठया प्रमाणात आवश्यक आहे. नव्या जगातही ते नित्याच झाल आहे.


जिथे शेतकऱ्यांना राहण्याच्या कारणास्तव जागा उपलब्ध होती आणि जुन्या स्थिरावलेल्या वस्त्या तिथे प्रत्यक्ष नव्हत्याच. जेव्हा पासून अशा प्रकारच्या वस्त्या खूप किलोमीटर लांब होत्या ,त्या स्वयंपूर्ण असायला हव्यात. जरी विलग वस्त्या या जगभर पहायला मिळत असल्या तरी स्कॉटलंडच्या हस्तकले पासून ते कॅनडाच्या गव्हाच्या शेतापर्यंत तरी, स्कॉटलंडच्या हायलँडच्या हस्तकले पासून ते कॅनडाच्या गव्हाच्या शेतापर्यंत त्या अनेकदा सामाजिक अधिमान्यते पेक्षा आर्थिक गरजेचा परिणाम असतात.




**ब) ग्राम (लहानखेडे )-** ग्राम आणि गाव यांच्यातील अंतर पारदर्शक नाही. विशिष्ट प्रकारे, गरम हे लहान असते, ग्राम (लहान खेडे) – ग्राम आणि गांव यांच्यातील अंतर पारदर्शक नाही. विशिष्ट प्रकारे ग्राम हे लहान असते आणि इमारतींची रचना ही खूप विखुरलेली असते. ग्राम – मुख्यत्वे करून विशिष्ट परिस्थितीत लांबच्या ठिकाणी लोकसंख्या खूप कमी असते अशा ठिकाणी वसलेलं असत जी काही शेत आणि घरांचा मिळून बनतात.




या ठिकाणी कदाचित चर्च, दुकान, डाकघर किंवा शाळा असू किंवा नसू शकते. ग्राम हे पुन्हा पशुपालन करणाऱ्या जमातीत जिथे वेल्सच्या डोंगराळ भागाच्या आणि ग्रेट ब्रिटन मधील स्कॉटलंड किंवा हिमालयातील पशुपालन करणाऱ्या जमातीत आढळतात. महाराष्ट्रातील वाड्या या ग्रामच्या उत्तम उदाहरण आहेत.




**क) गाव:** बहुतेक देशातील गावे एका विशिष्ट ठेवणीची असतात.गावातील शेतकरी आणि घरे ही बहुतेक करून सामाजिक स्वरुपाची असतात जसे देउळे, मस्चीद, शाळा, पोस्ट ऑफिस काही मोजकी आणि सभेची जागा गावाचे सभागृह. जा सर्व बाबी गावात असतील असे नाही. या सर्व बाबी गावाच्या आकारानुसार ठरतात. लहानशा खेडयात या गोष्टी पाहण्याजोग्या असतात. गावाचे आकारमान जे काही लोकांपासून हजार लोकांपर्यंत मर्यादीचे असते. व्यवसायिक दृष्ट्या पाहता शेती हा सर्व साधारण व्यवसाय असतो. काही गावाचा व्यवसाय मासेमारी असतो. तर काही खनिजे आणि काही वन संपदेवर आधारित असतात.

**गावाचा आकार हा खालील गोष्टी निश्चित करतात.**

१) गावाची एकंदरीत लोकसंख्या

२) लोकसंख्येस राहण्याजोगी जागा

३) वस्तीस्थानाची जागा

४) इतर घटक जसे प्राकृतिक जमिनीची बंधने रचनेनुसार सर्व साधारणता काही गावाचा आकार हा मोठा असतो.

**ड) पुंजकेदार वस्ती आणि विखुरीत वस्ती :** पुंजकेदार वस्ती ही वेगवेगळ्या आकाराची असते. जसे अनियमित पुंजक्यासारखी रेषीय आकाराची, चौरसाकृती, त्रिकोणाकृती, गोलाकार प्रमाणे पुंजक्यासारखी असते. ही वस्ती विखुरीत वस्ती पेक्षा सर्वसाधारण आहे. संरक्षण आणि एकाकीपणा जाणवणारे याची मानव काळजी घेत असतो.

munotes.in

**पुंजकेदार ग्रामीण वस्ती :** पुंजकेदार वस्तीचे विविध घटकांमुळे विविध आकार असतात. ऐतिहासिक सामाजिक घटकांची उत्क्रांती शेतीच्या पारंपारिक पद्धती हे त्यास जबाबदार आहेत.

**१) जागेवरील बंधने :** जागा हा महत्वपूर्ण घटक गावाचा आकार ठरवीत असतो. उदा. जर गावाचे स्थानदरीमध्ये असेल तर काहीसा उताराचा भाग असेल आणि ती रेषेच्या आकाराची असेल तर ती वस्ती दरी नुसार पसरलेली असते. याची काही सर्वसाधारण उदाहरणे म्हणजे फ्रान्स मध्ये आणि स्वीस अलाप आणि रिहनीजोर्ज. नदीच्या बंधाऱ्यावरील जलवस्ती किंवा किनाऱ्यावरती वस्ती ही पण रेषीय आकाराची असते जसे कोकणातील किनारवर्ती गावे होत किंवा गुजरात राज्यातील दक्षिणेकडील वसाहती होत. डोंगर माथ्यावरील किंवा बेटावरील असणारी गावे गोलाकार किंवा आयताकार असतात.

**२) शेती संघटन आणि जमिन मिळकत पद्धती :** शेती करण्याची विभागातील रोजगार पद्धती व जमिन मिळकत पद्धती या वसाहती पद्धतीवर पारणं करतात. बहुतेक पुंजकेदार वस्त्या ह्या खेडे गावातील मध्यवर्ती भागात आढळतात. जास्त करून ज्या ठिकाणी शेती ही सामुहिक पद्धतीने केली जाते किंवा शेतकऱ्याने विखुरीत जमिन घेतली असेल तर अशा कोणत्याही प्रकारचा आकार पहावयास मिळत नाही. काही वेळा वस्तीचा आकार चौरसाकृती किंवा आवळ स्वरूपाचा असतो. तर काही वेळा तो प्राकृतिक असू शकतो अनेकदा तो रेषाकार असतो. याचे कारण असे  की प्रत्येक शेतकऱ्याची बागायती जमीन त्याच्या घरापासून लांब गेलेली असते.


आर्थिक लागवडीच्या बाबतीत वस्ती ही लागवडीनुसार बांधली जाते.ती चौरसाकृती आणि आवळ स्वरुपाची असते. प्रत्येक शेतकऱ्याचे स्वतःचे शेत जमिनीचा तुकडा आणि त्यात त्याचे घर जे गावापासून दूर असते. दरीतील वसाहतीतील हा भाग आवळ असतो. ज्या ठिकाणी जमीन ही विभक्त असते त्या ठिकाणी पर्वत हे कुरण युक्त असतात असा भाग  सर्वसाधारणतः वस्तीसाठी विखुरीत असतो.

**३) विकासाची दिनांक :** बहुतेक ठिकाणी असणारी गावे ही पुंजक्याच्या स्वरुपाची असतात आणि त्यांचा असणारा आकार हा अनियमित असतो. उदा. मोठी चौरसाकृती वस्ती किंवा ताराच्या आकाराची वस्ती लहान रेषीयतेमुळे विखुरीत असते. जो भाग जेव्हा उद्भवतो जेव्हा मोठी वस्तीच्या निर्मिती नंतर लहान स्वरुपाची वस्ती निर्माण होते. ही वस्तीमुळ गावातील लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होते. ही वस्तीमुळ गावातील लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेली असते किंवा स्थलांतरामुळे झालेली असते किंवा मोठया वस्तीची असणारी सीमा मर्यादित स्वरुपाची असते. सध्या प्रगती असणाऱ्या तंत्रज्ञानामुळे पडीक असणारी जमीन लागवडीखाली आणली जात आहे.ही असणारी जनजागृती आता सर्व साधारण आहे. नवीन खेडी अस्तित्वात असलेल्या रस्त्यांच्याकडेला रेषीय आकाराने निर्माण होत आहेत.

**४) वेळेनुसार बदल :** सध्यस्थितीत असणारा गावांचा आकार हा त्यांच्यामुळे आकारापासून वेगळा झालेला आहे.याची वेगवेगळी करणे आहेत, शेती पद्धतीतील तंत्रज्ञानात झालेला बदल हा काही लोकांना त्याच्या शेत जमिनीवर आवश्यक वाटतो

म्हणून काही खेडेगाव ही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. काही इंग्लिश गावे १४ व्या शतकात या पद्धतीने नामशेष झाली आहेत. तर दुसऱ्या बाजूला काही गावे लोकसंख्येच्या आणि जमिनीच्या दृष्टीने वाढत आहेत. या अतिरिक्त लोकसंख्येमुळे खेडयांचा मूळ आकार बदलतो आहे. जे गोलाकार आणि मुळात आवळ असणारा भाग सर्व बाजूने रस्त्याच्या बाजूने ताराकृती स्वरुपात किंवा अनियमित स्वरुपात वाढतो आहे.

खेडेगावांचा हा बदलणारा आकार खेडयांच्या पुनर्रनिर्मितीमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे बदलतो आहे. उदा. भूकंप, अग्नी किंवा पूर .




**ड) विखुरीत ग्रामीण वसाहती :**

ग्रामीण वसाहती या बहुतेक करून आवश्यक भागात आढळते किंवा आकारानुसार शेतकरीत्याच्या जमिनीवर गावापासून दूर राहतो. खडबडीत भागात फार कमी प्रमाणात लोकसंख्या राहते आणि त्या ठिकाणचे लागवडीखालील क्षेत्र पण कमी राहते म्हणून ही वस्ती विखुरीत असते. बहुतेक वस्त्या या मुळात डोंगरावरील शेतीमुळे विखुरीत वस्त्या या प्राण्यांच्या जमातीशी निगडीत असतात.

काही विखुरीत वस्त्या या चांगल्या हवामानाच्या श्रीमंती अशा आहेत. याला कारण सामाजिक आणि ऐतिहासिक घटक होय. उत्तर अमेरिकेतील वसाहतींचे उदाहरण घेता पुंजकेदार वस्त्या या संस्कृतीमुळे सामाजिक बदलामुळे विखुरीत झालेल्या आढळतात. १७ व्या शतकातील वसाहती युरोपियन गावातील वसाहती बदलण्याचा परिणाम अटलांटिक किनाऱ्यावरील वसाहती बदलण्यात आला आहे. युरोपातील बहुतेक जमीन डोंगर आणि जंगल युक्त आहे. रेड इंडियन या जमाती विरुद्ध लढण्यासाठी आणि धार्मिक एकता ठेवण्यासाठी यांना एकत्र राहणे गरजेच आहे. पश्चिमेला होणारे स्थलांतर हे जास्त किंमती दायक आहे. याचे कारण तेथील असणाऱ्या नद्या सेंट लॉरेन्स, मीसीसीपी, ओहिओ हा भाग जहाजे वाहून जाणाऱ्या कालव्याच्या जमिनीचा आहे. १९ व्य अशात्कात लोकांनी रिकाम्या भागावर वस्ती करण्यास सुरुवात केली ज्या जमिनीवर जंगल नव्हते रेड इंडियन लोकांचे हल्ले थांबले होते आणि त्या ठिकाणीची जमीन आणि वातावरण मनुष्यास मानवू लागले होते. विखुरीत वस्ती फक्त अंतर्गत भागात होती.

विखुरीत वस्ती ही अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड मध्ये मर्यादित स्वरुपाची नव्हती तर कमी प्रमाणत आशिया आणि आफ्रिका खंडात होती तर युरोपखंडात सर्व साधारण होती. युरोपखंडात निर्माण झालेली विखुरीत वस्तीची युरोपातील वस्तीच्या विकासानंतर झालेली आहे. या वस्तीच्या विकासाची दोन कारणे आहेत. त्यातील पहिले कारण म्हणजे आवाराचा (Enclosure Low) कायदा जे स्वतःच्या जागेसाठी लावला जातो किंवा जो जुन्या सामुदायिक जमिनीसाठी वापरला जातो. या कारणांमुळे ग्रामीण वसाहतीवर दोन प्रकारचा परिणाम झाला आहे. बहुतेक लोकांनी वस्ती सोडली व दुसरे म्हणजे शेतकऱ्यांनीविखुरीत जमिनीपेक्षा एकत्रित जमिनीचा वापर केला. तो स्वतः च्या जमिनीवर राहणे पसंत करून. म्हणून मुळगाव हे सभोवताली असणाऱ्या शेतकऱ्यांनी वेढले गेले. दुसरे विखुरण्याचे कारण म्हणजे अतिरिक्त लोकसंख्या मुळगाव सोडून दुसऱ्या जमिनीच्या शोधात जावू लागली. ज्याचा परिणाम विखुरीत वस्ती निर्माण झाली .

आफ्रिकेतील काही भागात जास्त करून दक्षिण आणि पूर्वखंड प्रदेशातील वस्त्या ज्या ठिकाणी युरोपी यांनी मोठी शेती आणि कुरणे ही विखुरीत स्वरुपाची तयार केली.तरी पण पारंपारिक पद्धतीची ग्रामीण वस्ती अजूनही गावात पहावयास मिळते. तिथे जी परंपरागत पद्धती छोटया जमीन धारकांच्या होत्या त्या युरोपियन लोकांनी मोडीत काढल्या.

**भारतीय ग्रामीण घरांचे प्रकार**

घर ही मानवाची मुलभूत गरज आहे. घर ही सार्वत्रिक ठिकाणी आढळते. जे मानवाने निर्माण केलेले असते. घर हे निवाराच्या चौकटीत बसताना हवामान आणि प्राकृतिक रचना यांचा विचार केला जातो.

**मानवाला निवाऱ्याची गरज विविध कारणांने भासते.**

१. स्वःताचा हवामान, तापमान, पाउस हिम वर्षापासून बचाव करण्यासाठी

२. प्राकृतिक व भावनात्मक संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे आहे प्राकृतिक दृष्ट्या घर मानवाचे वन्य प्राण्यांच्या आक्रमणा पासून संरक्षण करते तसेच शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी याचा वापर होतो. भावनात्मक दृष्टया विचार करता पर्यावरणात्मक आणि इतर सभोवतालच्या जगापासून होतो.

३. स्वतः ची मालमत्ता वाचविण्यासाठी घरे महत्वाची आहेत.ज्यात अन्नधान,प्राणी किंवा सुखसोयीच्या वस्तु घराच्या मुलभूत रचनेत दोन खोल्यांचे घर असते. त्यातील एक खोली अन्न धान्यसाठा विणीची किंवा प्राण्यांची असते.

**घराच्या प्रकारावर परिणाम करणारे खालील घटक**

अ) पर्यावरण

ब) सामाजिक आणि आर्थिक स्थितीत वास्तव्य करणारे

क) समाजातील तांत्रिक विकासाचा स्थर

munotes.in

घरांची विविध प्रकारची स्वरूपे खालील घटकांवर परिणाम करतात.

१) जागा

२) रचाना

३) आराखडा

४) बांधकाम साहित्य

अशा प्रकारची घरे हे मानव आणि पर्यावरण याचे नाते सांगत असते आणि त्याचा जैविकतेवर परिणाम होते. ग्रामीण जीवनात हे मुलभूत घटक जास्त लक्षात येतात. सामाजिक, हवामान दृष्ट्या आणि भौगोलिक परिस्थिती एकत्रित परिणाम बांधकामावर होतो .

ग्रामीण घरावरती विविध घटकांचा वेगवेगळा परिणाम खालील मुद्द्याच्याद्वारे दाखविला आहे.

**अ) पर्यावरणीय घटक :** जैविकतेची असणारी भूमिका विविध प्रकारच्या घरांवर महत्वाचा परिणाम करतात. हवामान घटकांचा यांचा विचार यात केला जातो. जगातील पर्वतीय भागात उपलब्ध असणारी सौरऊर्जा महत्वाची आहे. भरपूर सूर्यप्रकाश नैसर्गिक दृष्ट्या जमेचा आहे. म्हणून उत्तर गोलार्धात बहुतेक घरे ही दक्षिण उतारावर आहेत.




कमी उंचीच्या हिमालय पर्वतावर घरे ही स्पर ज्युटयांच्या साहाय्याने बांधली जातात. ती बाजू चांगल्या निचऱ्याची आणि कोरडी असते आणि ती जागा दरड कोसळण्यापासून सुरक्षित आणि खाली कोसळणारे बर्फ या साठी. जंगलाचा असणारा निवारा आणि जास्त प्रमाणात असणाऱ्या वनस्पती मदतीच्या ठरतात. सूर्य प्रकाशाबरोबर दुसरा महत्वाचा घरासाठी असण्यासाठी महत्वाचा घटक म्हणजे मानवासाठी आणि प्राण्यांसाठीचा पाण्याचा मुबलक पुरवठा होय. साध्या घरापासून ते कॉम्प्लेक्स पर्यंतची घरे पाण्याच्यासाठ्या जवळ असतात. अंदाजे लागवडी खालील जमीन ही यासाठी गृहीत धरली जाते. उदा. पर्वतीय प्रदेशात जमीन उदाहरणे दाखल घेतली जाते व त्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही ते पहिले जाते. पुन्हा घर निर्मितीसाठी जवळच खेटून सुरक्षित जागा निवडली जाते. आणखी घरे निर्माण करताना काही जागा मोकळी सोडली जाते जेणे करून लोकसंख्या वाढली तर घरे वाढवता आली पाहिजेत.



घरांची रचना ही प्रामुख्याने नैसर्गिक आणि पाण्याचा उताऱ्यावर असली पाहिजे. पावसापासून संरक्षण हे महत्वाचे आहे. तसेच सूर्यप्रकाशापासून स्वरक्षण ही महत्वाचे आहे. जेबुरनहार यांच्या हवामान विषयक "express itself through the roof'' हे म्हणणे सत्य आहे व ते भारतातील खेडयातील घरांना लागू पडते. भारतात जिथे दाट पाऊस पडतो उदा. कोकणात फक्त उतरत्या छपराची घरे पावसासाठी विचार घेतली जातात त्याच प्रमाणे पावसापासून संरक्षणासाठी घराच्या पुढील अंगण पण महत्वाचे मानले जाते.

दुसऱ्या बाजूला सपाट छपराची घरे ही पंजाब भागात आढळतात. जास्त तापमानाच्या भागात तापमान कमीत कमी राहणे गरजेचे असते. घरात शिरताना कमी जाडीची आणि चीरीची खिडकी सूर्याच्या उष्णते पासून स्वरक्षण करण्यास आणि घरात गारवा ठेवते. अशाप्रकारची घरे मध्यपूर्व भागात आढळतात. उष्ण प्रदेशात घराची असणारी ओसरी हा भाग पण सर्व साधारण असतो. तसेच ते दक्षिण अमेरिकेत ही पहावयास मिळतो.



दुसऱ्या बाजूस दलदलीच्या प्रदेशात आणि भरतीच्या प्रदेशात घरे ही घोडे काठी बांधली जातात,की जी भरती असल्यामुळे वाहून जावू नयेत अशी सर्वसाधारण परिस्थिती आसाम राज्यात पहावयास मिळते, घोडे काठ हा भाग वन्य प्राण्यापासून संरक्षण देणारा भाग आहे.



घरांची रचना ही आर्थिक आणि सामाजिक घटकानुसार काही प्राकृतिक घटकानुसार केली जाते. काही वेळा पर्यावरणाचा अप्रत्यक्षरित्या घरावर परिणाम होत असतो. बंगाल प्रदेशात घर ही चिखलाची आणि मध्य ठिकाणी अंगणाची बनविली जातात आणि त्याच्या सभोवताली किंवा मागच्या बाजूस तळे असते. तळे हे चिखलाचे स्त्रोत आहे, जे बांधकामासाठी वापरले जाते.

दुसऱ्या बाजूस भूरूप आणि भूवैज्ञानिकांनी मातीची घरे बांधण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. पर्वतीय किंवा खडकाळ प्रदेशात दगडाचा वापर भिंतीसाठी आपण घराच्या छतासाठी केला जातो. दुसऱ्या बाजूस पश्चिम हिमालयात बांबूचा आणि कठीण लाकडाचा वापर घराच्या बांधकाम साहित्यासाठी केला जातो. तर ओरिसा राज्यात वाळूच्या दगडांचा वापर केला जातो. महाराष्ट्रात ग्रॅनाईटचा वापर केला जातो. गंगा नदीच्या खोऱ्यात बहुतेक घरे ही चिखलाची आणि विताची असतात. जे सहजरित्या उपलब्ध असते.

भूवैज्ञानिकाना अजून एक महत्वाची बाजू मांडली आहे टी म्हणजे भूकंपग्रस्त प्रदेशात वापरण्यात येणारे बांधकाम साहित्य हे हलक्या वजनाचे असते. उदा.जपानमध्ये बांधण्यात येणारी घरे ही पुठ्याची असतात.जसे जपान हा भूकंपग्रस्त देश आहे. तसेच भारतातील काही भागात दगडाच्या ऐवजी लाकडाचा वापर केला जातो.पूर भागात तर हलक्या वजनाचे साहित्य वापरले जाते. कारण पुराच्या वेळी संपूर्ण घर वाहून जाण्याची शक्यता असते. याचे उदाहरण बिहार राज्यात पहावयास मिळते. जे मशागत करणारे असतात ते झोपडीत राहतात ज्या झोपडीला कुंपणाच्या भिंती असतात आणि गवताचे छप्पर असते या गोष्टी स्वस्त म्हणून वापरल्या जात नाहीतर या बाबी सहज कुठेही उपलब्ध होतात म्हणून वापरल्या जातात.

**ब) सामाजिक आर्थिक घटक :** आर्थिक घटक हा पण महत्वाचा घटक आहे. जे निश्चितपणे इमारतीचे वैभव आणि तिचे गावातील असणारे स्थान दर्शवितो. बहूतेक कसोट्या यामध्ये असणारी राज्यकार्ताची घरे ही अद्यवत स्थिती दर्शवित असतात. बहुतेक करून भारतातील घरामध्ये कमी वर्गाची आणि जास्त वर्गाची असा भास दर्शविला जातो. जी वरच्या श्रेणीतील घरे असतात ती त्यांची स्थिती चांगली असते. आणि अशी घरे गावात असतील तर गावाची स्थिती चांगली समजली जाते. चांगल्या

सतत नेहमी तपशील वारसा ही त्याचा वापर केला जातो त्यात जास्त दर्जाचे किंवा महाग अशा साहित्याचा वापर केला जातो. ज्यात जास्त दर्जाचे किंवा महाग अशा साहित्याचा वापर केला जातो. गरिबांची घरे बहुतेक करून मध्यम प्रकारचे घर साहित्य वापरून केली जातात. अशी घरे बहुतेक करून पूर भागात दलदलीची भागात असतात.

सामाजिक घटक हा वरील दोन ही घरांच्या प्रकारावर परिणाम करणारा आहे. उदाती म्बुक्तिक या ठिकाणी घरे ही वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी पश्चिम देशेला तोंड करून नाहीत. कारण आत्म किंवा एखादा राक्षस त्यांच्या घरात प्रवेश करतो अशी त्यांची भावना आहे. कुमओन आणि गरवाल यांची घरे ही धरण उपदेशक वर्गाची आहेत. जे भूता खेतावर विश्वास ठेवणारे आहेत. भारतामध्ये जात हा सामाजिक महत्वाचा घटक घरांची निश्चिती करतो. एकाच जातीचे लोक एक ठिकाणी घरे उभारतात. जे दलित किंवा मागासलेले आहेत. त्यांची घरे गावातील वस्तीच्या पेक्षा बाहेरच्या बाजूला असतात, की जेणे करून त्यांच्याकडून कोणतीही बाब दुषित होऊ नये. दलित लोकांच्या विहीर पण या कारणाने मुख्य गावा पासून वेगळ्या होत्या. पुन्हा सामाजिक मूल्यांनी आणि सामाजिक आकलनाने समाजातील अंतर अनेक उपजातीयापासून खेडेगाव तरुण एक आले.

**क) तांत्रिक विकासाचा दर्जा :** शेवटी तांत्रिक विकासाची पातळी जी बांधकाम साहित्यास घराच्या निर्मितीस आज अटकाव करते याचे उत्तम उदाहरण म्हणजे एस्किमो लोकांची घरे. जी काही शीइग्रूसया आधुनिक स्वरुपात लाकडाचा वापर करून केली जातात. भारतातील बहुतांशी आजची गावे ही अस्बेस्टॉसप्रमाणे फरशा बदलता येतात. अशा प्रकारे काही बदल हे हळूहळू होत आहेत. महत्वाचा आजचा बदल म्हणजे बांधकाम साहित्य आज जमिनीत बदल करून मोठया प्रमाणात न वापरता येणारी जमीन वापरात येवू लागली आहे. पारंपारिक बांधकाम पद्धतीत सुधारणा होऊन पाटबंधारे आणि कालवे यात महत्वपूर्ण बदल झाले आहेत. शेवटच्या निकर्षावर येत असे म्हणता येईल की उच्चतम सामाजिक तंत्रज्ञानाची जाणीव उच्चतम पद्धतशीर ग्रामीण घरांची रचना आणि बांधकाम साहित्यानुसार सांगितली जाते.

**जगातील घरांचे प्रकार**

**१) अमेरिकन –** जे मुळ अमेरिकन किंवा अलबर्टा, कॅनेडियन आहेत कि जे शिकारीसाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत जात असतात. हे लोक शिकारीला जाताना मोठया काठ्या नेतात व साधारणतः ३.५ ते ५.५ मीटर उंचावर काठ्यावर आधारित घरे बांधतात. अशी घरे हि म्हैसीच्या सहायाने लपवलेली असतात.

**२) ओनडोल –** हि पारंपारिक स्वरुपाची घरे आहेत. थंडीच्या लाटे पासून संरक्षण होण्यासाठी हि जमिनीच्या खाली बांधलेली असतात. या घराची दारे ठोंगण्या स्वरुपाची असतात. अशा प्रकारची घरे कोरियन द्वीपकल्पाच्या प्रदेशात पहावयास मिळतात.

**३) झाडावरील घरे –** दक्षिण फिलिपाईन्स प्रदेशातील लोक अशाप्रकारच्या झाडावरील आधारित घरावर राहणे पसंत करतात. अशा घरात राहिल्याने त्यांचे शत्रूपासून संरक्षण

होतो. तसेच साप हिंस्त्र पशु पक्षापासून त्यांचे संरक्षण होते. या प्रदेशात थंड व कोरडी हवा असल्याने त्यांना झाडावर राहणे सोपे जाते.

**४) जमिनी खालील घरे –** दक्षिण स्पेन मधील लोक जमिनीखाली घरे बनवितात या घरांना क्याबा असे म्हणतात जी घरे आतून थंड असतात जरी बाहेरील तापमान ४० अंश सेन्टीग्रेट असते तर हिवाळ्यात या घरांचे तापमान उबदार असते.

**५) डोम आकाराची घरे किंव घुमटा आकार घरे –** हि घरे ग्रेट रिफ्ट दरी या ठिकाणी आढळतात जी हलक्या कळकिच्या काठीने बनवलेली असतात जी सहज रित्या एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेता येतात.

**६) समी घरे ज्यांना वांशीक घरे असे म्हणतात –** जी उत्तर नॉर्वे या देशात पहावयास मिळतात. हि उन्हाळ्यात व हिवाळ्यात हलविली जातात. हिवाळयात यांचे घर मातीची व लाकडाची असतात. हिवाळ्यात यांच्या घरात उष्ण तातिक विणन्यासाठी अग्नी प्रज्वलीत ठेवला जातो मुल अमेरिकन वंशाची लोक ही घरे वापरतात.

**७) टोनगकोनन –** इंडोनेशियन लोकांच्या पारंपारिक घरांना टोनगकोनन असे म्हणतात. या घरांना जीटिंबर बांबूपासून व गवता पासून बनवलेली असतात. या घरांचा जमिनीचा भाग लाकडाचा असतो. या घरांच्या भिंती खूप छान प्रकारे सजविलेला असतात. या घरांची छते हि गवताची असतात.

**८) युर्ट –** आशिया खंडाच्या मध्यभागी आणि मंगोलीया या देशाचे लोक युर्ट या घरात राहतात. त्याच बरोबर त्यांनी पाळलेल्या बकऱ्या आणि घोडे पण या युर्ट मध्ये राहतात. हि घरे पूर्णतः लाकडाची असतात व त्यांना मेंढीच्या चामड्याचे आच्छादन असते.

**९) लफू जमातीची घरे –** थायलंड मधील उत्तर भागात समुद्र सपाटीपासून १००० मीटर उंचीवर उताराला अनुसरून राहणारी लफू जातीच्या जमातीची घरे आहेत. हि घरे दोन मीटर उंचीवर असतात. हि जमत कोंबड्या, शेळ्या यांना जमिनीच्या आत भुयार करून ठेवतात. लाकडाच्या पट्या ठोकून यांची घरे तयार होतात.

**१०) दगडी घरे –** चीन मधील मायो गावातील, मायो जमातीतील लोक चुनखडीच्या दगडांची घरे बांधतात. याचे कारण हा प्रदेश चुनखडीयुक्त प्रदेश आहे. हा प्रदेश कास्ट प्रदेश म्हणून ओळखला जातो या ठिकाणी आढळणाऱ्या दगडात मोठया प्रमाणात कॅल्शियम कार्बोनेट आढळते.

**११) चिखलीमातीच्या विटांची घरे –** बायबर नावाची जमात, मेरी झुआ, सहारा वाळवंट आपण दक्षिणेतील मोरोक्को प्रदेशात अशा प्रकारची घरे आढळतात. चिखल माती वाळवून व त्याच्या विटांची घरे बनविली जातात. चिखल मातीत थोडया प्रमाणात पाणी मिसळून व सूर्याच्या प्रकाशात विटा वाळवून त्यापासून हि घरे बनविली जातात. या घराच्या वापरात वाळलेल्या गवताचा वापर केला जातो. त्यामुळे घराचे तापमान सम राहते.

**१२) रीड हाऊस –** पेरू देशात समुद्रसपाटी पासून ४०० मीटर उंचीवर युरोस नावाच्या जमाती या प्रकारची घरे बनवितात. हि घरे ५० रीड बेटावर बनलेली आहेत. रीडपासून हि घरे बनलेली असतात व या जमातीचा मासेमारी, पर्यटन हा व्यवसाय असतो.

**१३) इग्लू -** इस्किमो प्रदेशात घुमटाकार स्वरुपात बर्फाची असणारी घरे इग्लू नावाने ओळखली जातात. या प्रदेशात वर्षभर बर्फाच्छदित खूप थंड असे तापमान असते. हि लोक बर्फाच्या लाद्या तयार करून घरांचा घुमटाकार बनवितात.

**१४) मधली घरे –** पूरग्रस्त प्रदेशात सर्वसाधारणता असणाऱ्या घरांना मधली घरे असे म्हणतात. परंतु घरातील आतील प्रदेश हा कोरडा असतो.

**१५) अडोब घरे –** ही घरे मातीची असतात. ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात चिखलाची उपलब्धता असते अशा ठिकाणी हि घरे निर्माण होतात. दक्षिणी पश्चिम युनायटेड स्टेट मधील स्थानिक जमाती अशा प्रकारची घरे बांधतात या घरांची छपरे हि सपाट असतात कारण या प्रदेशात क्वचितच पाऊस पडतो.

**१६) पाण्यावर असणारी घरे –** मलेशियामधील सबाबरनो या बेटावरील मासेमारी करणारे लोक पाण्यावर घरे करून राहतात. या घरांची निर्मिती करताना खारफुटी वनस्पती इमारती लाकडांचा वापर करण्यात येतो. जे पाण्यावर टिकाऊपणे राहु शकतो.

**प्रश्न संदर्भ -**

१. पूर नियंत्रणाकरिता उंचवट्यावर बांधलेल्या वस्त्यांच्या स्थानास __________ असे म्हणतात.

अ) आर्द्र वस्ती स्थान

ब) शुष्क वस्ती स्थान

क) संगमावरील वसतिस्थान

ड) संरक्षण वस्ती स्थान

२. दोन डोंगररांगांच्या दरम्यान असलेल्या खिंडींतील वस्तिस्थानास ----------- वस्तीस्थान असे म्हणतात.

अ) शुष्क वस्ती स्थान

ब) खिंडीतील वस्ती स्थान

क) आर्द्र वस्ती स्थान

ड) डोंगरमाथ्यावरील वस्तीस्थान

३. खालीलपैकी कोणत्या प्रदेशात एकाकी वस्त्या आढळत नाहीत?

अ) स्कॉटलंड मधील उंच प्रदेश

ब) कॅनडामधील गहू उत्पादक प्रदेश

क) ऑस्ट्रेलियातील मेंढपाळ क्षेत्रे

ड) भारतातील किनारी प्रदेश

munotes.in

४. नदीकाठावर वसलेल्या वस्त्या -------------- प्रकारच्या प्रारूपाच्या असतात.
अ) आयताकृती
ब) चौरसाकृती
क) रेषीय
ड) ताराकृती

५. वाळवंटी प्रदेशातील मरूद्यानांमध्ये (जलस्रोताजवळ) विकसित झालेल्या वस्त्यांचे वसतिस्थान ------------- असते.
अ) शुष्क वसतिस्थान
ब) खिंडीतील वसतिस्थान
क) आर्द्र वसतिस्थान
ड) डोंगरमाथ्यावरील वसतिस्थान

६. मध्य हिमालयातील ग्रामीण वस्त्या सामान्यतः हिमालय पर्वताच्या ---------- उतारावर आढळतात.
अ) पूर्व
ब) पश्चिम
क) उत्तर
ड) दक्षिण

❖❖❖❖

munotes.in

# २

# नागरी वस्ती भूगोल

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ नागरी वसाहत
२.२ नागरीकरणाची संकल्पना
२.३ नागरी भूगोलाचे महत्व
२.४ नागरी विकासाचे चक्र
२.५ नागरीकरणाच्या समस्या
२.६ नागरी समस्या सोडविण्यासाठीचे उपाय
२.७ अद्यावत शहरे
२.८ भारतातील अद्यावत शहरे

## २.० उद्दिष्ट्ये

- नागरी भूगोलाचे महत्व अभ्यासने.
- नागरीकरणाची संकल्पना व नागरीकरनाचे चक्र समजून घेणे
- नागरी वसाहतीच्या समस्यांचे समाधान समजून घेणे.
- अद्ययावत शहरांची माहिती घेणे

munotes.in

## २.१ नागरी वसाहत – Urban Settlement

वेगवेगळ्या देशांची नागरी वसाहती विषयी वेगवेगळी संकल्पना असते. इटलीसारख्या देशातील शहरांची बिगर शेतकऱ्यांच्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्यांना शहर असे म्हटले जाते. भारतीय जनगणना अहवालाने सुध्दा वेगवेगळ्या पद्धतीने नागरी वसाहतीची संकल्पना सांगितली आहे. २०११ च्या जनगणना अहवालानुसार नागरी वसाहत म्हणजे खालील प्रमाणे

१) बहुतेक नगरपालिकेने निदर्शित केलेली शहरे
२) इतर शहरे खालीलप्रमाणे समाधानकारक असतात.
अ) कमीत कमी लोकसंख्या ५०००

ब) ७५ टक्के लोक हे शेती व्यवसाया व्यतिरिक्त उद्योगात गुंतलेले असतात.
क) लोकसंख्येची घनता ४०० लोक प्रत्येक क्षेत्रफळा मागे असते.

पश्चिम युरोपियन क्रांतीला आधुनिक क्रांती असे म्हणतात की आशिया खंडाचा संबंध हा पुरातन नगरांशी आहे व आधुनिक महानगरे हि औद्यगिक क्रांतीमुळे जुळून आली आहेत. जगात झालेली ही क्रांती संक्रमित आहे. यात सर्वात उल्लेखनीयबाब म्हणजे मोठया प्रमाणात वाढती लोकसंख्या होय.

## २.२ नागरीकरणाची संकल्पना – Concept of Urbanization

नागरीकरणाची राजकीय व्याख्या करावयाची असेल तर ती अशी करता येईल कि जे नगरातील भागात राहतात परंतु बहुतेक नागरिकरणाच्या व्याख्या संशोधन पण किंवा धोरणांचा बाजार यावर अवलंबून आहेत. काही नागरीकरणाच्या व्याख्या गोंधळात टाकणाऱ्या आहेत सगळीकडे वेळेवेळे नुसार नागरीकरण होत आहे. परंतु हे नागरीकरण लोकसंख्येची वाढ, आर्थिक वाढ आणि सांस्कृतीक वाढयांच्या एकत्रीकरनावर नाही तर त्यासाठी प्रत्येक वाढीचा मुद्दा वेगळा अभ्यास करणे महत्वाचे आहे. आज जगातील बहुतेक लोकसंख्या हि नगरामध्ये राहते.

१) नागरीकरण आणि उप-नागरीकरण
नागरीकरण आणि उप-नागरीकरण हि प्रक्रिया एकूण चार मुद्यांच्याद्वारे अभ्यासली जाते.

१) उपनागरीकरण
२) महानगर
३) व्यापारीकरणातून तयार झालेले नगर
४) ग्रामीण नागरीकरण

**१) उपनागरीकरण –** म्हणजे ग्रामीण भागांचे शहरी भागात झालेले स्थलांतर होय. हा नागरीकरणाचा भाग म्हणजे आकस्मितपणे वाढलेले नगर होय जो कोणत्या प्रकारच्या नियोजनाशिवाय तयार झालेले असतो.

**२) महानगर –** महानगर म्हणजे नगराची झपाट्याने होणारी वाढ जी स्थलांतराच्या मदतीने होत असते.

**३) व्यापारीकरणातून तयार झालेले नगर –** अशी शहरे औद्योगीकराणातून तयार झालेले असते. जैसलमेर किल्ला, दुर्गापूर, भिलाई, औद्योगीकरण झाल्यामुळे या शहरांची निर्मिती झाली आहे.

१९५० अगोदरच भारतातील नागरीकरणाच्या सीमा वृद्धिंगत झालेल्या पहावयास मिळतात. भारतातील नागरीकरणाच्या सीमांचा होणारा विस्तार हा खूप हळू होताना पहावयास मिळत होता. हा विस्तार बहुतेक करून स्थलांतर या कारणामुळे होताना पहावयास मिळत होत, याच कारणामुळे नगरे हि प्राकृतिकदृष्ट्या विकसित झाली.

भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर भारतामधील जी शहरांची लोकसंख्या लाखापेक्षा जास्त होती ती शहरे जलद विकासाने वाढू लागली हा विकास एवढा होऊ लागला की त्याचा ताण शहरावरील जमिनीवर पडू लागला आणि त्याचा परिणाम नगरांच्या आजूबाजूला असणाऱ्या खेड्यांचा समावेश नगरात होऊ लागला.

सध्या आपण मुंबईची परिस्थिती पाहत आहे की मुंबई हे शहर बहुतेक करून त्याच्या उत्तर बाजूला वाढत चालले आहे ते त्या शहरावर पडणाऱ्या लोकसंखेच्या तणामुळे तसेच पश्चिमव मध्य रेल्वेमुळे उत्तर भागातील उपनगररांना मुंबई शहर जोडले जात आहे. एवढेच नव्हे तर पश्चिम ते पूर्व महामार्ग या शहराला जोडून जात आहे.

सध्या नवीन सॅटेलाईट शहरे मुंबईच्या अवती भोवती निर्माण होत आहेत जसे नवीन मुंबई जी मुंबईपासून फार दूर नाही व हे शहर मुंबईशी रेल्वे व रस्ते मार्गाने जोडले आहे. या नवीन मुंबई परिसराच्या विकासाची खरी सुरुवात ही १९७२ पासून झाली व आज पर्यंत बस व रेल्वे मार्गाने नवी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, दादर या ठिकाणाची प्रवासी सुरुवात झाली. आज या नवी मुंबई नगरास चर्चगेट पासून सर्व मार्ग जोडले गेले आहेत. एवढे असूनही आज काही असुविधा पहावयास मिळतात.

१) मुळात नवी मुंबई ते मुंबई हा रेल्वेमार्ग जोडू लागलेले आहे त्यावर धावणाऱ्या रेल्वेंची संख्या कमी आहे.

२) वाशी या नगरला जोडणाऱ्या पुलावर मोठया प्रमाणात वाहतुकीचा बोजा आहे.

३) आर्थिक प्रश्न

४) नवी मुंबईतील स्थानिक शाळा विकसित झाल्या नाहीत त्यामुळे शाळेसाठी मुंबईकडे जाण्याचा ओढा आहे.

५) नवी मुंबईतील स्थानिक लोक त्यांच्या जमिनी विकासासाठी देण्यास तयार नाहीत.

६) बिल्डर व्यवसायीकांपासून होणारा भ्रष्टाचार

७) ठाणे व बेलापूर या ठिकाणच्या प्रदूषण समस्या

१९६० नंतर राहणाऱ्या लोकांच्या संख्या जास्त होऊ लागली त्यामुळे जी गावे मासेमारी किंवा शेतीसाठी या व्यवसायाची होती त्यांचा विकास नगर म्हणून होऊ लागला.

## २.३ नागरी भूगोलाचे महत्व – Scope of Urban Geography

गेल्या काही दशकापासून नागरी भूगोल हा एक वेगळा विषय अभ्यासला जातो आहे. नागरी भूगोल हा नगरच्या विकासानुसार व भौगोलिक घटकानुसार अभ्यास केला जातो. नागरी भूगोल हा दोन प्रकारच्या अभ्यासाचे दाखवितो.

१. प्रत्येक नगर हे स्वत:हून इतर प्रत्येक नगराशी संलग्नित असतो.

२. प्रत्येक नगराचा विकास त्याच्या सभोवताला नुसार होत असतो. आज नागरी भूगोल हा एकूण तीन मुद्द्यानुसार वर्णिला जातो.

एक म्हणजे जगातील नागरी वस्त्या या प्रत्येक क्षेत्रानुसार अलग असतात. तसेच त्या त्यांच्या अलगते व भौगोलीक घटकांचा परिणाम होतो. परंतु ज्यांचे वर्गीकरण कमी जास्त प्रमाणात सारखेच असते. या नागरी व त्यांच्या असणारी संकल्पन जसे आकृतीबंध व वर्गीकरण आकार या गोष्टीसारख्या असतात.

दुसरे म्हणजे नागरी वस्त्यांच्या त्याच्या ठिकाणी असणारा वस्त्यांच्या विशिष्ट आकृतीबंधाचे चित्र रेखाटले जाते. जसे आतील व बाहेरील वस्ती जी उपनदीच्यानुसार दर्शिवले जाऊ शकते. गेल्या काही वर्षापासून काही सिद्धांतिक कागद हे मध्यवर्ती संकल्पना सांगतात जी निवडक क्षेत्राच्या आकार व ठिकाणाच्या भौगोलीक सूचनेनुसार दर्शविली जाते.

तिसरे म्हणजे नागरी भूगोल आपणास काही संकेत देते जी मूळ विकास आणि कार्यक्रमानुसार बनणारे शास्त्र आहे. हा अभ्यास काही नागरी भूगोलाची घटकांवर प्रकाश टाकतो, ज्यात नागरी भूगोलाच्या सर्वसाधारणतेची संकल्पना असेल तसेच नगरातील असणाऱ्या जमिनीचा सबंध दर्शवितो. नागरी भूगोलाचे संबंध हे दिशा, वेळ आणि चळवळीच्या अभिव्यक्तीवर परिणाम सांगतात. नागरी भूगोलातील वाहतूक यांचा परिणाम आहे, कि जो नागरी जागांचा वाढता परिणाम दर्शवितात. एकंदरीत परिणाम पाहता काही भूगोल शास्त्रज्ञानानुसार ही एक नवीन संकल्पना आहे कि जी नागरी विकासाच्या वाढीचे समस्या दर्शविते.

**नागरी व ग्रामीण यातील फरक -**

नागरी व ग्रामीण यातील फरक आणि त्यांच्या मर्यादा व त्याचा स्थापनेनुसार असणारा बदल हा महत्वाचा आहे. जो वस्ती भूगोलाची संकल्पना सांगतो. नागरी हा शब्द असे सांगतो की राष्ट्राचा असा भाग कि जो मागील किंवा आताच्या जमिनीची मर्यादा दुसऱ्या बाजूने विचार करता नगर हे शहराशी निगडीत असते.

या दोघातील होणारे बदल आहेत.ते आता सांगणे थोडे कठीण झाले आहे.पूर्वीच्या काळी शहरे ही निश्चितरित्या त्यांच्या सिमानुसार ठरत असत ज्या ठिकाणी उच्च राहणीमान असते तसेच नगरामध्ये नवनवीन कल्पना उदयास येत असतात. त्या ठिकाणची जीवन पद्धती बदलत असते नगरा जवळ असणारा ग्रामीण भाग या पासून जास्त वेगळा नसतो. परंतु ग्रामीण असणारी जीवन पद्धती खूप मागासलेली असते तर नगरात साक्षरता.

प्रत्येक देशाची नागरीकरणाचे कार्यालयीन निकष हे वेगवेगळे असतात. त्यांच्या शहरांच्या असणाऱ्या निकष वेगवेगळे असतात. हे निकष त्या ठिकाणच्या सामाजिक व आर्थिक घटकावर आधारित असतात.

बहुतांश देशांनी लोकसंख्येचे आकारमान हा निकष गृहीत धरलेला आहे व हा निकष प्रत्येक देशांना वेगवेगळ्या पद्धतीने लागू होत आहे. उदा. डेनमार्क व स्विडन या देशातील शहराचा निकष दोनशे लोकांचा आहे. तर दुसऱ्या बाजूला ग्रीस सारख्या देशात असणारी वस्ती संख्या दहा हजार रहिवाशी असणारी समजली जाते. तर कॅनडा सारख्या देशात

लोकसंख्या हजारात गिणली जाते. अमेरिकेचा लोकसंख्या निकष हा २५०० असा आहे तर व्हेनझुएला व  घाना सारख्या देशाचा लोकसंख्येचा निकष हा ५००० असा आहे.

काही देश किंवा शहरात जमिनीचे क्षेत्र व लोकसंख्येची घनता यावर निकष ठरविला जातो परंतु तो सर्व देशांना लागू होत नाही. भारतासारख्या देशाची लोकसंख्येची घनता ३४० चौ / की. मी इतकी आहे.

बहुतेक करून असे स्विकारले आहे की नागरीकरणाचे क्षेत्रफळ हे काळानुसार विकसीत झालेले असते परंतु त्या ठिकाणी ते प्राथमिक स्वरूपाचे असते. या सर्व वर्गीकरणात भारत या देशात एकूण पंचाहत्तर टक्के पुरुष जे शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. तर इजरायल सारख्या देशात तर नगरांची लोकसंख्या २००० इतर की असते यातील एक तृतींश  लोक हे शेती व्यवसायात गुंतलेले आहेत.

ग्रामीण विभागातील घनतेचे वर्गीकरण मृदे मुळे वेगळे झालेले असते. जी प्राथमिक स्वरुपात भारतात नागरी वसाहती मध्ये पंचाहत्तर टक्क्यांपेक्षा जास्त पुरुष व्यवसायात गुंतलेले आहेत. शेती व्यतिरिक्त कांगो या देशातही नगरांची किमान लोकसंख्या २००० असून बरेच लोक प्रामुख्याने शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायात असतात.

तुर्कस्थान, झेकोस्लोव्हेकिया युनायटेड अरब रिपब्लिक या देशामध्ये शहरांच्या व्याखेत प्रशासकीय कार्य महत्वाचे मानले आहे. जपान खल्जेरिया व युनायटेड किंगडम या देशामध्ये प्रशासकीय कार्याला महत्व देऊन नगरांच्या व्याख्या वेगवेगळ्या केल्या जातात.

युनायटेड किंगडम राष्ट्रांनी एकूण तीन प्रकारच्या स्थानाचे वर्गीकरण शहरी वसाहतीसाठी केले आहे.

१) प्रचंड लोकसंख्येच्या वस्त्या,वस्त्यांच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेला समूह
२) निश्चित स्थानाच्या सीमा असणाऱ्या वस्त्या ज्यांना शहरी जिल्हा असणाऱ्याकिंवा नगरपालिका किंवा बरो किंवा शहर असे संबोधले जाते.

३) छोटे वेगवेगळे स्थानिक व्यवस्थापन नसलेले शहरी विभाग त्या कारणांने युनाटेड किंगडम यांनी असे सांगितले आहे की प्रत्येक देशादेशातील फरक त्या देशातील ग्रामीण आणि नागरी भाग ठरवितो. आणि शहरी लोकसंख्येची व्याख्या ही सर्वासाठी समान नाही या कारणासाठी कोणता भाग शहरी आहे कोणता ग्रामीण आहे हे प्रत्यक्ष देश ठरवितो.

१९६१ पासून भारतामध्ये शहरी भाग ठरविण्याचे खालील निकष वापरले जातात जे नगरपालिका  विभागात येतात  त्यांना शहर असे म्हणतात. नगरपालिका नसलेल्या भागात खालील निकष लावले जातात.

१) लोकसंख्येची घनता १०० चौ.कि.मी.पेक्षा कमी नसावी.
२) लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त असावी
३) तीन चतुर्थांश लोकसंख्या शेती व्यतिरिक्त व्यवसायात गुंतलेली असावी.

ज्याप्रमाणे भारतातील प्रत्येक राज्याला वस्तीला 'नगरपालिका' देण्याचा अधिकार दिला आहे काही वस्त्यावरील सर्व निकष पूर्ण करतात तरीही त्यांना शहरी वसाहतीत गणले जात नाही. या प्राकृतिक बाजू व्यतिरिक्त शहरी समाजाची मानसिकता ही महत्वाची आहे. नगर ही मनाशी ही संबंधित आहे. शहरातील चाली आणि परंपरा वेगळ्या असतात. शहर हे भेट घेण्या योग्य रस्त्यांचे किंवा मालाची विक्रीकरणाचे फक्त स्थान नाही तर नगर ही माणसाची कल्पना आहे. मोठया आकाराच्या शहरात माणसाचे परस्परांमधील असणारे संबंध कमी असतात. नवीन कल्पना आणि तंत्रज्ञान याची वाढ शहरात होते. नागरीकरण शहराचे स्वरूप बदलते.

अशाप्रकारे असणारा शहरातील सारखेपणा ही आर्थिक आणि धंद्याच्या संघटनांमुळे बदलत्या काळाच्या ओघात शहरे बदलत जातात. मात्र आता तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ग्रामीण भागातील फरक कमी होत आहे, ग्रामीण व शहरी वसाहतीमधील फरक स्पष्ट करा.

गेल्या पाच दशकामध्ये लोकसंख्या वाढी बरोबर मोठया प्रमाणात ग्रामीण भागातून नागरी प्रदेशात लोकसंख्या स्थलांतरित झालेली आहे. वाढत्या नागरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये राहत्या घराचा प्रश्न, वाढती गर्दी, झोपडपट्ट्या, गरिबी, बेकारी याशिवाय हवा, पाणी, प्रदूषण, वाहतुकीची कोंडी आणि दळणवळण हे इतर अनेक प्रश्न वाढत आहेत. म्हणून आजच्या शहरात अनेक प्रकारचे ताणतणाव निर्माण झाले आहेत. तसेच ही सांस्कृतिक विकासाची आणि ग्रामीण व नागरी प्रदेशांची केंद्रे आहेत परंतु नगरांचे वर्गीकरण, समस्या व प्रक्रिया यांचे विश्लेषण करण्यापूर्वी नगर, नागरीकरण आणि अरबॅनिझम या संकल्पना समजावून घेणे आवशक आहे.

## २.४ नागरी विकासाचे चक्र – Cycle of Urban Development

नागरी वसाहतीची मुळची वाढ आणि त्याच्या पायऱ्या हि नागरी विकासाची पात्रता आहे. जरी ते लहानसे खेडे असे या एखादे गाव असे ज्या माध्यमातून नागरीकरणाचे पात्रता निदर्शित होते. त्या खेडेगावातून मिळणाऱ्या सुविधा या सर्व गोष्टी नागरिकांशी तंतोतंत नाही पण थोडीशी जुळतात. त्या खालीप्रमाणे –

**रस्ता बाजू –** रस्त्याच्या बाजूला असणारी घरे जी पेट्रोल स्टेशन किंवा पेट्रोल पंपाशी, चहाच्या टपरिशी निगडीत असतो ही नागरीकरणाची प्रारंभी अवस्था असते.

**छोटेसे खेडे –** रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या छोट्याश्या खेड्यात जास्त लोकसंख्या असते. काही मोठ्या इमारती असतात तर काही व्यवसायिक स्वरूपाचे गाळे देखील असतात.

**खेडे –** खेडे असे की जे मोठया लोकसंख्येचे असते (१५० ते १००००) ज्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध असतात जसे घाऊक व्यापाराची बाजारपेठ हायस्कूल, दवाखाना, पोस्ट ऑफिस. अशा खेड्यातून प्राथमिक पाठोपाठ द्वितीय स्वरूपाच्या सुविधा उपलब्ध होतात.

**शहर –** शहर असे की ज्यांना नगपालिका किंवा त्या समान असणाऱ्या कार्यालयावरून ओळखले जाते. शहरांची सर्व साधारण असणारी लोकसंख्या ही २०००ते २०००० या दरम्यान असते. या शहराच्या ठिकाणी शॉपिंग मॉल, सर्व प्रकारची वाहतूक सुविधा व्यापारासाठी भाडयाच्या तत्त्वावर मिळणाऱ्या मोठया इमारतीचे गाळे, तसेच घाऊक बाजार इत्यादी. शहराच्या ठिकाणी टेलिफोन ऑफिस सारख्या कार्यालयांचे मुख्यालय असते तसेच महाविद्यालय रेल्वे स्टेशन इत्यादी सुविधा असतात.

**नगर –** जनगणना अहवालानुसार ज्या ठिकाणी असणारी लोकसंख्या एक लाखापेक्षा अधिक असते अशा ठिकाणास नगर असे म्हणतात. नगरांच्या ठिकाणी व्यवसाय, शिक्षण संस्था सुविधा, वाहतूक, औद्योगिकरण इत्यादी, नगराची असणारी ओळख त्या ठिकाणी असणारे विद्यापीठ त्या ठिकाणी असणारे रेल्वेचे जंक्शन यावर सांगितली जाते.

**उपनगर –** उपनगरे हि बहुतेक औद्योगिकरणाच्या विस्तारामुळे निर्माण झालेली असतात ज्यांचा विकास आर्थिकदृष्टया झालेला असतो. राजकीयदृष्टया हि उपनगरे सक्षम असतात.

**राजधानी –** भारतीय जनगणना अहवालानुसार ज्या शहरांची लोकसंख्या १० लाखाच्या पेक्षा जास्त असते अशा शहरांना लक्षाधीश शहरे असे म्हणतात.

## २.५ नागरीकरणाच्या समस्या व त्याची कारणे – Problems of Urbanization and their causes

नागरी समस्या कधीही संपत नाहीत, प्रदूषण, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बेरोजगार या काही समस्या आहेत. त्या खालीलप्रमाणे –

**१) झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्या –** विकसित व विकसनशील देशामधील राहत्या घरांचा प्रश्न ही एक मोठी समस्या झाली आहे. गरीब व मध्यमवर्गीय लोकांना शहरामध्ये घरासाठी व्यवस्थित जागा मिळत नाहीत. औद्यगिकराणामुळे नगरांचा विस्तार वाढला. सरकार, उद्योजक, राज्यकर्ते, नियोजन तज्ञ, जमीनधारक नगरामध्ये कुठे ही मोकळी किंवा राखीव जागा घरे बांधण्यासाठी मोठया प्रमाणात ठेवत नाहीत ९ ते १९८८ चत हिंदुस्तान टाईम्सच्या अहवालानुसार २५ ते ५० टक्के नागरी लोकसंख्या झोपडपट्टी मध्ये राहते. उदा. मुंबई, चेन्नई, दिल्ली ई. भारतातील १५ टक्के कुटुंबाना राहण्यासाठी घरे नाहीत. तर ६० टक्के घरामध्ये पुरेशी विद्युत व हवा मिळत नाही. लाखो लोक भाडयाने राहतात. एकूण उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम घराच्या भाडयापोटी द्यावी लागते तर ५० टक्के लोकसंख्या आजही मोडकळीस आलेल्या घरात राहते.

काही राज्यामध्ये हाउसिंग सोसायटी, हुडको तसेच शहर विकास प्राधिकरण यांच्या मार्फत शहरातील घरांचे प्रश्न सोडवताना दिसतात. तसेच विमा कंपन्याकडून वित्त पुरवठा देखील केला जातो आहे. काही ठिकाणी सरकारी क्षेत्रापेक्षा इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर यांचा फायदा अधिक आहे. ते कमी दर्जाचा माल उपयोगात आणून इमारती बांधतात. त्यामुळे घर विकत घेतल्यानंतर घर मालकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे

लागते. उदा. लाईट फिटिंग, छप्पर गळती, प्लास्टर इ. झोपड्यांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त आणि परवानगी शिवाय घरांचे, झोपड्यांचे बंधकाम होत आहे.

**२) जास्तगर्दी –** जास्त गर्दी व लोकांची उदासीनता ही एक नगराची मोठी समस्या बनली आहे.काही ठिकाणी घरांची अतिशय गर्दी असून एकाच रूम मध्ये पाच ते सहा लोक राहतात. जास्त गर्दी ही नगरातील खूप मोठा परिणाम आहे. कारण त्यामुळे वाईट सवई, रोगांचा प्रसार, रोगराई, मद्यपानात वाढ होते. लोकांच्या उदासीनतेमुळे लोकसंख्येची घनता वाढते नगरातील बरेच लोक इतरांच्या  कामकाजात सहभागी होत नाहीत.

**३) पाणी पुरावठा व गटार समस्या –** जगात असे एकही शहर नाही कि जेथे सर्वांना वेळेत पाण्याचा पुरवठा होतो, हैद्राबाद, राजकोट, उदयपुर, अजमेर, चेन्नई ह्या शहरामध्ये दिवसातून एक तासा पेक्षा कमी पाणी लोकांना मिळते काही लहान शहरांना नगरपालिकांकडून पाणी पुरवठा होत नाही. अशी शहरे अप्रत्यक्षपणे बोअरवेल वर अवलंबून असतात. साधारणपणे बऱ्याचशा शहरांना दरवर्षी पुरेसा पाऊस मिळतो. परंतु पुढील दहा वर्षामध्ये पाण्याचा पुरवठा अपुरा पडणार आहे. कारण पाण्याची पातळी दरवर्षी खोलवर जात आहे. भारतातील बहुतेक शहरामध्ये गटारांची अवस्था वाईट आहे. एकही शहर पूर्णपणे स्वछ नाही. चंडीगडसारखे अतिशय नियोजन बद्ध शहरच स्वच्छतेचा दावा करू शकते. कारण या शहरामध्ये व शहरा सभोवतालच्या परिसरामध्ये नियोजना व्यतिरिक्त अधिक व्यवस्था बांधलेली आहे.

४) वाहतूक व वाहतूक कोंडी आणि व्यापाराची स्थिती भारतातील प्रत्येक शहरामध्ये अतिशय वाईट आहे.बरेच लोक बस,टेम्पो,व प्ल्वेचा उपयोग प्रवासासाठी करतात.
लाखाच्यापेक्षा जास्त अशा शहरांना लक्षाधीश शहरे असे म्हणतात.

## २.६ नागरी समस्या सोडवण्यासाठीचे उपाय – Solutions of Urban Problems

नागरी समस्या सोडण्यासाठी आपण स्थानिक प्रशासन,शहरामध्ये राहणारे लोक यांना घेऊन काही प्रमाणात उपायकारक शकतो, त्यातील काही उपाय खालील प्रमाणे सुचविलेले आहेत.

**१) पद्धतशीर व नियोजन बद्ध विकास –** वेगाने वाढणाऱ्या उपनगरांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे शहरांचा पद्धतशीर विकास केला पाहिजे. पुढील २० ते २५ वर्षासाठी नियोजन व गुंतवणुक केलीच पाहिजे. तरच देशभरात असंख्य वाढणाऱ्या नगरांच्या समस्या कमी होतील.

**२) प्रादेशिक नियोजनानुसार नगर नियोजन -** नागरी नियोजन हे नगर केंद्रबिंदू मानून केले जाते. आपण नेहमी नगर नियोजन, शहर नियोजन संदर्भात बोलतो. परंतु संपूर्ण शहर नियोजनाबद्दल विचार करत नाही. त्यामुळे झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना निवासी



munotes.in

घरांचा पुरवंठा केल्यास प्रादेशिक केल्यास नियोजनानुसार इतर ठिकाणी लोकांना स्थलांतरीत करता येईल.

**३) मागासलेल्या प्रदेशात उद्योगधंद्याचे स्थलांतर –** मागासलेल्या प्रदेशात उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी व हलविण्यासाठी सरकारकडून उद्योगपतीना प्रोत्साहन देऊन त्यांना स्वस्त दरात जमीन, पाणी, विद्युत, वाहतूक आणि दळणवळण सुविधा पुरविल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे स्थालांतर कमी होईल याशिवाय शहरातील गर्दी, प्रदूषण कमी प्रमाणात होईल.

**४) वैयक्तिक वित्त पुरवठा शोधणे –** नगरी लोकसंख्या जादा कर महानगरपालिका किंवा प्राधीकारणाला देत नाहीत, परंतु ही रक्कम रस्ते विकास नियोजित गटार व्यवस्था सांडपाणी, विद्युत पुरवठयासाठी वापरली पाहिजे. जर नियोजित सुधारणा करून पाणी व विद्युत कर निधी निर्माण केल्यास, ही रक्कम अतिशय महत्त्वाच्या कामासाठी उपलब्ध होईल, लोकांकडून जमा झालेली रक्कम, कर पूर्ण शहरावर खर्च केला जात नाही.

**खाजगी वाहतूक –** अनेक शहरामध्ये खाजगी वाहतूक व्यवस्था आहे. सार्वजनिक वाहतुकीमधील कर्मचारी व त्याच्या सवयी अकार्यक्षम असतात. तसेच नियमित वाहनाची देखभाल केली जात नाही, त्यांच्या संघटना अनेक वेळा संपावर जाण्यासाठी प्रेरित करतात. म्हणूनच खाजगी वाहतूक गरजेची आहे. यासाठी लहान बसेस, टेम्पो सेवा वाढवण्याची गरज आहे.

## २.७ अद्यावत शहरे –Smart Cities

विसाव्या शतकात मोठया प्रमाणात नगरांकडे स्थलांतर होत आहे. याच वेळी नगर रचना हि बदलत आहे हा बदल नगरांच्या चिरंतर विकासाच्या दृष्टीने होणे आवश्यक आहे. जसे पर्यावरणीय सुरक्षितता, शैक्षणिक बदल, नगरात असणाऱ्या सोसायटया किंवा वसाहती यांचे जीवनमान पर्यावरणीयदृष्टया कसे बदलते हे लक्षात येते सध्या स्थितीत काही नगरे आर्थिक वादात येत आहेत.

या शतकात ICT- Information and Communication चा वापर म्हणजे माहिती आणि संचार तंत्रज्ञान यांच्यामुळे मिळणाऱ्या माहितीमुळे बहुतेक नगरांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न सुटण्यास मदत होते. जर एखादे नगर नियोजित नगर म्हणून शासनाच्या आराखडयात असेल तर या स्मार्ट सिटीकडे जास्त लक्ष दिले जाते. आपणास मिळणाऱ्या योग्य माहितीमुळे आपणाकडून चिरंतर विकास साधता येतो. स्मार्ट सिटीची संकल्पना ही वेगळ्या राष्ट्रानुसार व शहरा नुसार सांगितली जाते. स्मार्ट सिटी ही संकल्पना ही विकासच्या वेगावर अवलंबून असते. भारतातील स्मार्ट सिटी ही संकल्पना युरोपातील देशानुसार आकारली आहे.

मुळात या सिटी व शहराच्या सीमा या वेगळ्या प्रकारे निश्चित करणे आवश्यक आहे. या भारतातील स्मार्ट सिटी संकल्पनेत पायाभूत सुविधा आणि सेवा या उच्च दर्जाच्या असाव्या.

स्मार्ट शहराबद्दल असणारी उद्दिष्टे हि त्या शहरातील आंतर भागातील पायाभूत सुविधा निदर्शित करतात. या शहरातील स्वच्छता आणि चिरंतर पर्यावरणीय संकल्पना साकारलेली असते. सध्या असणारे शासन स्मार्ट शहर हि संकल्पना देशातील विकासाची संकल्पना म्हणून राबवीत आहे. स्मार्ट सिटी यातील अंतर्गत पायाभूत सुविधा खालील प्रमाणे सांगता येतील.

१) शुद्ध आणि निर्मळ पाणी पुरवठा
२) शाश्वत प्रकारचा वीज पुरवठा
३) गटार व्यवस्था, जी वाया गेलेल्या पाण्याच्या नियोजनानुसार आखलेली असेल
४) पुरेशा प्रमाणात लोकाची वाहतूक सुविधा
५) गरिबांना विकत घेताल येती अशाप्रकारची घरे
६) तंत्रज्ञानाचे जाळे
७) याठिकाणी चांगल्या प्रकारची सुविधा जसे ई गव्हर्नन्स, चिरंतर पर्यावरण, नगरांसाठी सुरक्षित व्यवस्था, विशेषतः महिलांसाठी किंवा वृद्ध लोकांसाठी आणि आरोग्य व शिक्षणाच्या दृष्टीने म्हणजेच स्मार्ट सिटी हि संकल्पना आर्थिक विकास, विकासाचा दर्जा आणि लोकांचे आरोग्य निदर्शित करते, यात तंत्रज्ञानाची भूमिका महत्वाची आहे.

## २.८ भारतातील अद्यावत शहरे –Smart Cities in India

२०११ च्या जणगणना अहवालानुसार भारतामध्ये एकूण ७९२५ शहरे आहेत ती सर्व शहरे काही स्मार्ट सिटीचा संकल्पनेनुसार रुपांतरीत होणार नाहीत. जरी आपणाकडे काही मर्यादा आहेत. येत्या पाच वर्षात भारतात काही मोजक्या स्वरुपात स्मार्ट सिटी येवू घातल्या आहेत. परंतु याचा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार आहे हे नक्की आणि या होणाऱ्या स्मार्ट सिटी या आदर्श रचना म्हणून सर्वांच्या समोर येणार आहेत. त्यामुळे छोटया स्वरुपात विकसित होणाऱ्या स्मार्ट सिटी महत्वाच्या आहेत. पद्धतशीरपणे गोळा केलेली प्रत्यक शहराची माहिती तिचे वर्गीकरण त्या शहरातील जमीन व्यवस्था त्यासाठी राज्य शासनाकडून किंवा केंद्राकडून कोणताही निधी उपलब्ध होणार नाही तर स्मार्ट सिटी हा प्रोजेक्ट मुळात 'वेल डिफेन्डेड पॉलिसी' या तत्त्वावर आधारित आहेत. या प्रोजेक्टसाठी आंतरराष्ट्रीय भारतीय युनियन यांनी ७००० कोटीची तरतूद केलेली पहावयास मिळते. हि तरतूद फक्त प्राथमिक स्वरुपाची रक्कम आहे. भारतात होऊ घातलेला पहिले स्मार्ट सिटी म्हणजे कोची शहर जे दुबई व केरळा सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने साकारण्यात आळले आहे. हा पहिला प्रोजेक्टचा कालावधी १८ महिन्याचा आहे. या प्रोजेक्टमध्ये बांधण्यात येणाऱ्या बिल्डींगचे क्षेत्र हे ३.५ लाख हेक्टर क्षेत्रा अंतर्गत आहे व हा प्रोजेक्ट SEZ अंतर्गत येतो.

munotes.in

**प्रश्न संदर्भ**

१. ---------- हे शहर जगातील पहिले दशलक्ष शहर होते. (6)

अ. न्यूयॉर्क

ब. लंडन

क.  केप टाऊन

ड. कॅलिफोर्निया

२. खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य नागरी वस्तीस सुसंगत नाही?  (6)

अ. औद्योगिक क्रियांचे प्राबल्य

ब.  शेती व्यवसायाचे प्राबल्य

क.  व्यापारी वसाहतींचे अस्तित्व

ड.  दाट लोकसंख्या

३. ग्रीसमध्ये  ---------------- पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या वस्त्या नागरी वस्त्या संबोधल्या जातात.  (6)

अ. 10000

ब. 30000

क. 20000

ड. 40000

३. भारतीय जनगणना २००१ नुसार ज्या वस्त्यांमध्ये ------------- पेक्षा अधिक कार्यक्षम पुरुष बिगर कृषी व्यवसायात गुंतलेले असतील त्यांना नागरी वस्ती म्हणता येईल  (6)

अ. 50%

ब. 75%

क. 60%

ड. 80%

५. नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होण्याच्या प्रक्रियेस -------- असे म्हणतात.  (6)

अ. व्यापारीकरण

ब.  औद्यगिकरण

क.  नागरीकरण

ड.  केंद्रीकरण

❖❖❖❖

# ३

## वसाहतीकरण व तिसरे जग

**घटक रचना**

३.० उद्दिष्टेय

३.१ अविकासाची संकल्पना

३.२ तृतीय जगाची व्याख्या

## ३.० उद्दिष्टेय

- अविकास म्हणजे काय व त्याची कारणे समजून घेणे
- तृतीयजगाची संकल्पना समजून घेणे
- अविकसित व विकसनशील देशांची वैशिष्ट्ये अभ्यासने
- शेतकऱ्यांच्या समस्या अभ्यासणे

## ३.१ अविकासाची संकल्पना

काही वर्षापूर्वी एखाद्या देशाच्या आर्थिक विकासाची अवस्था निदर्शित करण्याकरता 'मागासलेले देश' आणि 'प्रगत देश' असे शब्द प्रयोग करण्यात येत असत मागासलेले देश हा शब्द अविकसित देशांच्या अस्मितेला धक्का देणारा असल्यामुळे काही काळानंतर ह्या शब्दाचा प्रयोग करणे हळूहळू बंद झाले. मागासलेल्या देशांमध्ये सुद्धा नैसर्गिक व मानवी संसाधनाची उपलब्धता करण्यात न आल्यामुळे तेथील जनता दारिद्र, विषमता अशा अनेक गोष्टीना तोंड देत असते.

जगातील काही देश आर्थिकदृष्टया व तांत्रिकदृष्ट्या पुढारलेले आहेत. या देशातील लोकांचा रहाणीमानाचा दर्जा उच्च आहे. त्या उलट काही देश मागासलेले किंवा अविकसित आहेत. या देशातील लोक अशिक्षित, गरीब असून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा खालचा आहे. जगातील या दोन प्रकारच्या देशांना 'आहे रे ' 'नाही रे' असे संबोधले जाते. आहे रे म्हणजे श्रीमंत विकसित देश व नाही रे म्हणजे गरीब मागासलेले देश. बऱ्याच विकसित देशांमध्ये रहाणीमानाचा दर्जा, मोटार गाडया, ॲटोमेटिक वॉशिंग मशीन, कलर टेलेव्हिजन यांच्या संदर्भात मोजला जातो. ज्या देशातील लोकांकडे या गोष्टी असतील त्यांचा रहाणीमानाचा दर्जा चांगला असे मानले जाते. नोकरीच्या सुविधा, शैक्षणिक सुविधा वैद्यकीय सुविधा, पाणी पुरवठा, टॉयलेट, सामाजिक सुविधा व

दळणवळण सुविधा यांचा समावेश होतो. या दृष्टीने विकसित,श्रीमंत –आहे रे गटात इंग्लंड, फ्रांस, संस्थाने, कॅनडा व जपानचा समावेश होतो, तर अविकसित गरीब, नाही रे देशांच्या गटात बांगलादेश, सोमालिया, बोलिव्हिया या देशांचा समावेश होतो.

## ३.२ तृतीय जगाची व्याख्या

१) बार्के आणि हारे यांनी म्हटल्याप्रमाणे –जगातील सुमारे ३/४ लोकसंख्या म्हणजेच जवळ जवळ ३८०० दशलक्ष लोकसंख्या एका मोठया गटात राहते, त्यात आफ्रिका, आशिया आणि लॅटिन,अमेरिकन देशांचा समावेश होतो. हे सर्व देश स्वतंत्र आहेत. या सर्व देशांचा समावेश असलेला गट म्हणजेच तृतीय जग होय.

२) राजकीय दृष्टया तटस्थ असलेल्या व आर्थिक दृष्टया विकसनशील व कमी औद्योगिकरण असलेल्या देशांच्या समुदायाला 'तृतीय जग' म्हणतात. अशी व्याख्या विश्वकोशामध्ये देण्यात आली आहे.

**अविकसित किंवा विकसनशील देशांची वैशिष्टे :**

१) बरेच लोक (७५ टक्के) शेतीत गुंतलेले असतात.

२) अर्थव्यवस्थेवर शेती, वन उत्पादने, मासेमारी खाणकाम अशा प्राथमिक व्यवसायांचा प्रभाव असतो.

३) शेतीत मजुरांचे प्राधान्य असते. बरीच कामे मजूर करतात. (यंत्राचा वापर कमी )

४) शेताचे भाग छोटे असून त्यामध्येही विभाजन केलेले आढळते.

५)शेतीची यंत्रे प्राथमिक आहेत.

६) शेतीतील उत्पादन साधारणतः कमी असते.

७) लोक गरीब असतात्. दरडोई उत्पन्न खूपच कमी असते.

८) निरक्षरता, गरिबी व इतर सामाजिक कारणांमुळे जन्मदर खूपच जास्त असतो.

९) वैद्यकीय सुविधांचा अभाव, दारिद्र, निरक्षरता व इतर सामाजिक कारणांमुळे मृत्युदर ही जास्त असतो.

१०) आर्युमर्यादा कमी असते.

११) बरेच देश अतिरिक्त लोकसंख्येचे आहेत.

१२) दारिद्रामुळे अन्नाचा दर्जा चांगला नसतो.कुपोषण आढळते.

१३) पाणीपुरवठा, टॉयलेट, वैद्यकीय सुविधा व इतर सामाजिक सुविधा पुरेशा नसतात.

१४) शैक्षणिक सुविधा ही चांगल्या नसतात. बरेच लोक निरक्षरही असतात.

१५) समाजात स्त्रियांचा दर्जा खालचा असतो. स्त्री कामगारांना पुरुष कामगारांपेक्षा वेतन कमी मिळते.

३) विकसित व विकसनशील देशांची तुलना

| क्र. | निकष आर्थिक निकष | विकसित देश | विकसनशील देश |
|---|---|---|---|
| ०१ | उत्पन्न | जास्त | कमी |
| ०२ | समाजातील उत्पन्नातील समानता | मध्यम | जास्त |
| ०३ | उत्पादकता | जास्त | कमी |
| ०४ | भांडवलाची उभारणी | जास्त | कमी |
| ०५ | आर्थिक वाढ | मध्यम | कमी |
| ०६ | तंत्रज्ञानाची पातळी | उच्च | खालची |
| ०७ | उर्जेचा वापर | जास्त | कमी |
| ०८ | उत्पादनाचा प्रकार | औद्योगिक | प्राथमिक |
| ०९ | सामाजिक सुविधा (दळणवळण) | चांगल्या | खराब |
| १० | शेतीतील लोकांचे प्रमाण | कमी | जास्त |
| ११ | बाजार पेठेचा आकार | मोठा | छोटा |
| १२ | पैसे परत फेडीतील संतुलन | मध्यम | तीव्र |
| १३ | तंत्रज्ञानासाठी अवलंबित्व | कमी | जास्त |
| १४ | व्यापारातील संबंध | अनुकूल | प्रतिकूल |
| १५ | आर्यु मर्यादा | चांगली | कमी |
| १६ | साक्षरता | जास्त | कमी |
| १७ | आरोग्य | चांगले | खराब |
| १८ | बाल मृत्यूचे प्रमाण | कमी | जास्त |
| १९ | सात्विक आहार | चांगला | खराब |
| २० | लोकसंख्येचे प्रमाण | मध्यम | जास्त |
| २१ | लोकसंख्या वाढ | कमी | जास्त |
| २२ | तांत्रिक कौशल्य | जास्त | कमी |
| | **सांस्कृतिक व राजकीय निकष** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | स्त्रियांचा दर्जा | मध्यम | खालचा |
| २४ | वर्तवणूक | आधुनिक | पारंपारिक |
| २५ | राजकीय स्थैर्य | जास्त | कमी |
| २६ | समाज | आद्योगिक | पारंपारिक |
| २७ | सरकार लष्करी | लोकशाही | हुकुमशाही |
| २८ | सांस्कृतिक | कमी | जास्त |

**विकसनशील देश**

विकसनशील देशांची उदाहरणे पुढील प्रमाणे

**विकसनशील देश**

अ) **मध्य व दक्षिण अमेरिका** – मेक्सिको, ब्राझील, अर्जेन्टिना, चिली

ब) **आफ्रिका - सर्व देश** – उदा. इजिप्त, नायजेरिया, केनिया, इथोपिया, सुदान इ.

क) **आशिया-** भारत, पाकिस्तान, इराण, इराक, अफगानिस्तान, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, बांगलादेश इ

४) **विकसनशील देशांच्या विकास समस्या :** बरेच विकसनशील देश हे पूर्वी युरोपियन देशांच्या वसाहती होत्या. विसाव्या शतकात हे बरेच स्वतंत्र झाले. हे देश त्यांच्या देशात अधिक विकास करू इच्छितात, पण ही सोपी गोष्ट नाही. त्यांच्या विकासाशी संबंधित अनेक समस्या आहेत. काही अंतर्गत तर काही बहिर्गत समस्या आहेत.

**शेतकऱ्यांच्या समस्या**

शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्या  पाण्याचा अभाव ही आहे. शेतीतील चुकीच्या पद्धतीमुळे मातीचा कस कमी होतो. मातीची धुप होते. बाजार पेठ दूर असून तेथे पोहोचणे कठीण असते. चांगले बियाणे त्यांना परवडत नाही. त्यामुळे धान्य उत्पादन कमी होते. प्राथमिक उपकरणांचा वापर होतो व बरीच कामे हातानेच केली जातात. शास्त्रज्ञ धान्य वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे धान्य उत्पादनात वाढ झाली यालाच हरितक्रांती असे संबोधले जाते. या बदलामुळे शेतकऱ्यांच्या समस्या कमी होऊन दारिद्रयावर मात करणे शक्य होईल.

**४.१) गुरांचे उत्पादन सुधारण्याची गरज**

बऱ्याच देशांच्या अनेक भागामध्ये गुरांचे आजार आढळतात. हिंदू धर्मात गाईला पवित्र मानतात व त्यामुळे भारतात गाईची संख्या जास्त असूनही उत्पादनावर बंधने येतात. त्यांचा मांसासाठी वापर करता येत नाही.

munotes.in

### ४.२) जमिनीची मालकी हक्कातील बऱ्याच देशांतील बदल

बऱ्याच देशांत शेतजमिनीचे आकार खूपच छोटे आहेत. अशा शेतीतून किफायतशीर उत्पादन काढणे कठीण जाते. त्यासाठी छोटया तुकडयांचे एकत्रीकरण व तुकडा बंदी कायदा भारत सरकारने केला जातो.

### ४.३) मृदेचा अपक्षय

विकसनशील देशामधील बरेच लोक मातीची धुप झालेल्या निसत्व प्रदेशात राहतात. उष्ण व मध्य कटिबंधातील हवामान उष्ण असल्याने किटकांची वाढ अधिक होते व त्यामुळे १/३ पिक दरवर्षी नष्ट होते. डोंगर उतारावर मोठया कंपन्यानी मळ्याच्या शेतीचा विकास केला आहे. जोराच्या पावसामुळे मातीची धूप अधिक होते. उदा.भारत, श्रीलंका व बऱ्याच आग्नेय आशियाई देशांतील रबर, चहा व कॉफीचे मळे. याच बरोबर अनेक ठिकाणी पाणी साठवून ठेवण्याची मृदेची क्षमता कमी आहे. जोराच्या पावसामुळे मातीची धुप खूप होते. उदा. भारताचा पश्चिम किनारा विशेषतः कोकणातील जिल्हे. मातीची धूप ही विकसनशील देशांमधील प्रमुख समस्या आहे.

### ४.४) अस्वछ पाणी

पाणी ही मानवाची मुलभूत गरज आहे. विकसनशील देशामधील बऱ्याच भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचा अपुरा पुरवठा होतो. दाट लोक वस्तीच्या प्रदेशात ही समस्या गंभीर आहे. बरेच लोक त्यांचे कपडे नदी किंवा तळ्यात धुतात, आंघोळ करतात व त्याच तळ्यात गुरे ही आंघोळ करतात. स्त्रियांना घरातील पिण्याचे पाणी भरण्यासाठी डोक्यावर पाण्याचे हंडे घेऊन दूर वर जावे लागते. विकसनशील देशांतील बरेच आजार व मृत्यू हे खराब / दुषित पाण्यामुळेच होतात. नळाचे पाणी, झाकलेल्या विहिरी, बंद गटारे यामुळे ही समस्या कमी होण्यास मदत होईल.

### ४.५) जलसिंचनाच्या समस्या

जलसिंचनाच्या चुकीच्या पद्धतीमुळे वेळ आणि कष्टाचा व्यय होतो. मागील हजारो वर्षा पासून विहिरी आणि लहान तलावांचा वापर करण्यात येत आहे. ते बहुतांश थोड्या क्षेत्रालाच पाणी पुरवठा करतात आणि उन्हाळ्यात जेव्हा पाण्याची नितांत आवश्यकता असते तेव्हा कोरडे पडतात.

पाणी साठवण्यासाठी नवीन जलसिंचन पद्धती विकसित करणे आवश्यक आहे. काही प्रदेशांमध्ये नद्यांचा प्रवाह व पूर नियंत्रित करण्यासाठी मोठी धरणे बांधली पाहिजेत. यामुळे मोठा दुष्काळ कमी होऊन दिर्घ कालावधीसाठी पाण्याचा साठा निर्माण होईल. परंतु बरेच शेतकरी साठी सोपी पद्धत अवलंबतात. उदा. खडकांना भोक पडून नवीन विहिर तयार करणे (बोअरवेल) प्लास्टिकचा वापर करून तळी तयार करून पाणी साठविणे, यांत्रिक पाण्याचा पंप इत्यादींचा वापर करतात.

### ४.६) नैसर्गिक आपत्ती

जेव्हा विकसनशील देशांमध्ये भूकंप, वादळे, महापूर आणि दुष्काळ या सारख्या नैसर्गिक आपत्ती येतात तेव्हा त्यांना नियंत्रित करण्यासाठी अगदी थोडी संसाधने आहेत. भारत,

पाकिस्तान, बांगलादेश सतत याला सामोरे जातात. यामुळे घरांचा, शेती, रस्ते रेल्वेमार्ग यांचा विनाश होतो आणि सतत विविध आजार पसरून अपंगत्व आणि मृत्यू येतो.

जे शेतकरी पिकांच्या नाशामुळे कर्जबाजारी झालेले असतात. ते त्यांच्या कर्जापासून मुक्ती व्हावी म्हणून मोठे शेतकरी किंवा सावकाराकडे भविष्यातील पीक तारण म्हणून ठेवतात.

जलसंपत्तिच्या संसाधनांचा व्यवस्थित विकास केला तर दुष्काळ आणि महापुरावर मात करता येते. पिण्याच्या पाण्याची देखील विपुलता होते. पिकांसाठी मोठया क्षेत्राचा वापर करता येतो. यामुळे भारतीय शेती क्षेत्राच्या तीन पट क्षेत्र ओलीताखाली आणणे भारताला शक्य आहे.

## ४.७) आधुनिक उद्योगांची कमतरता

औद्योगिक देश आणि विकसनशील देश यांच्यातील उद्योग धंद्यात मोठया प्रमाणात तफावत आहे. पूर्वीचे औद्योगिक देश हे सध्या अस्तित्वात असलेल्या विकसनशील देशातील राहणीमानाची अवहेलना करीत आहेत. आज आग्नेय आशियायी देशात रबर या पिकाची मोठया प्रमाणात वाढ झालेली असून ते विकसित देशांना कच्चा मालाचा पुरवठा करीत आहेत. तसेच चहा, कॉफी, कापूर, मसाल्याची पिक, साखर, खनिजे इ. अन्न व कच्चा मला म्हणून विकसित देशांना जास्त पूरक होऊ शकतो. जास्तीत जास्त लोकांना तेल शुद्धीकरण, खनिज शुद्धीकरण व वितळवणे, चहा, कॉफी, अन्न पदार्थ हवा बंद डब्यात भरणे इ. प्रकारच्या व्यवसायामुळे रोजगार उपलब्ध होऊ शकतो. स्थानिक कुटीर व लहान उद्योगांना फारसे इंधन व वीज लागत नाही. तेव्हा अशा उद्योगांना विकास करणे आवश्यक आहे.

विकसनशील देशातील ग्रामीण भागात आणि देशाच्या इतर भागात राहणारे बहुतांश लोक गरिबीच्या जीवनाला सामोरे जातात. ग्रामीण भागातील अनेक लोक शहरात आपणाला नोकरी व शिक्षण मिळेल या आशेने शहरी भागात स्थलांतर करीत आहेत. त्यांच्या असे निदर्शनास आलेले आहे की शहरात लहान सहान रोजगार संधी आहेत. तेथे उद्योगधंधे आहेत. बहुतांश कच्चा माल प्रक्रिया केल्यानंतर विकसित देशांना पाठविला जातो. लोकांना कमी शिक्षण व कमी कौशल्य असले तरी रोजगार उपलब्ध होतो. विकसनशील देशातील खूप कमी लोक आद्योगिक उत्पादने विकत घेतात.

## ४.८) शहरांच्या काही समस्या

विकसित देशातील शहरांच्या तुलेनेने विकसनशील देशातील शहरात १५० दशलक्षांपेक्षा जास्त लोकांना शहरी भागात राहण्यासाठी जागा नाही. बहुतांश लोक शहराच्या बाहेर उपनगरात राहतात. सर्वच विकसनशील देशात गजबजलेल्या उपनगरी भागात लोक राहत असतात.

मुंबई आणि कलकत्ता सारख्या शहरात ५० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्या उपनगरात राहते. गरीब लोक झोपडपट्टी आणि चाळीत राहतात. त्यांना घर शाळा व दवाखान्याची

गरज असते. आरोग्य आणि पाणी पुरवठा करणारे या सुविधा पुरविण्यासाठी असमर्थ / नाखूष आहेत.

### ४.९) उद्योगांची आवश्यकता

तिसऱ्या जगातील काही देश श्रीमंत देशांची नक्कल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते संगणक खरेदीकरून त्यात प्रगत उपकरणांचा वापर करून आपली प्रतिमा बनवितात. संगणकाच्या या वापरामुळे अनेक कार्यालये आणि कंपन्यामधील कामगारांना त्यांची नोकरी गमवावी लागलेली आहे. मानवाने केलेल्या विविध प्रकारच्या प्रत्यक्ष संशोधनामुळे विकसित जगात औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. उदा. जेम्सवॅट यांनी वाफेवर चालणारे इंजिन आणि रॉबर्ट स्टीफनसन यांनी कोळशावर चालणाऱ्या आगगाडीच्या इंजिनाचा ग्रेट ब्रिटन मध्ये शोध लावला. विकसनशील देशातील लोकांनी अशा प्रकारची औद्योगिक क्रांती केली नाही.

### ४.१०) द्रारिद्र्याचे चक्र

विकसनशील देशात अन्नाची कमतरता आहे.तरी देखील पृथ्वीवरील बहुतांश लोकसंख्या या देशात वाढत आहे. या देशात साधन संपत्तीची कमतरता आहे व साधनसंपत्तीचा फारसा विकास झालेला नाही. तरी देखील लोक आनंदाने जगतात. काही लोक म्हणतात की नवीन वैज्ञानिक शोध सध्या  अस्तित्वात असलेल्या लोकांची अन्नाची गरज पूर्ण करून शकत नाहीत.तसेच लाखो लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही.

प्राणघातक आजार जसे कॉलरा, मलेरिया, कावीळ यामुळे आता अनेक बळी पडतात; असे म्हणणे योग्य नाही. विकसनशील देशातील निम्मे मृत्यू हे अन्नाच्या कमतरतेमुळे होतात. लाखो लोक अन्न कमतरतेमुळे ट्राकोमा व हत्तीपाय या सारख्या आजारामुळे मृत्युमुखी पडतात.

आपल्या असे लक्षात येते की, जो गरीब असतो त्याला पुरेसा आहार किंवा खायला अन्न मिळत नाही. त्यामुळे ते अर्ध पोटी अशक्त राहतील. शारीरिक दृष्ट्या अशक्त राहिल्याने त्याची कार्य क्षमता कमी राहील व उत्पादन क्षमता कमी होईल. कमी उत्पादकतेमुळे त्याला कमी उत्पन्न मिळेल व तो गरीब राहील. गरिबीमुळे पुन्हा त्याला पोटभर अन्न मिळणार नाही व हे चक्र असेच चालू राहील यालाच ‘दारिद्र दुष्ट चक्र’
(व्यक्तिगत) असे म्हणतात.

विकसनशील देशातील बहुतांश लोक शेतकरी आहेत. तेथील शेतकरी त्यांची पूर्ण शक्ती पणाला लावून देखील केवळ आपल्या कुटुंबाला पुरेल एवढेच अन्न धान्याचे उत्पादन होते. त्यातून काही पुढच्या वर्षी लागणारी बियाणे म्हणून ठेवले जाते. काही अन्नधान्य विकून त्यातून खाद्यतेल, कपडे, मीठ, तेल इत्यादी मुलभूत गरजा पूर्ण करतात.

जर साठवणुकीची कमतरता असेल,विविध अवजारे व इतर खर्चासाठी पैसा हवा असेल तर ते गावातील श्रीमंत लोकांकडे जातात.

वरील आकृतीवरून आपल्या असे लक्षात येते की, विकसनशील देशातील शेतकरी गरीब का राहतात. येथील शेतकऱ्याची उत्पादकता कमी असते. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पन्न कमी असते. त्यातील काही बाजारात विकले जाते. उत्पन्न कमी असल्याने बचत करण्याची शक्ती कमी राहते. त्यामुळे गुंतवणुक कमी होऊन भांडवलाची कमतरता (टंचाई) निर्माण होते. भांडवलाच्या कमतरतेमुळे साधनसंपत्तीचा फारसा विकास होत नाही आणि अविकसीत  साधनसंपत्तीमुळे व कमी भांडवलामुळे उत्पादकता कमी होते. उत्पादकता कमी म्हणून उतपन्न कमी राहते. अशाप्रकारे दारिद्रयाचे दुष्ट चक्र सुरु राहते.

### ४.११) जागतिकीकरण आणि त्याचा विकसनशील देशांवरील प्रभाव

मागील तीन दशकात जगात जास्तीत जास्त बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या स्वस्त उत्पादनामुळे वाढत आहेत. विवध देशामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांची परकीय गुंतवणुक वाढत आहे. अशाच प्रकारे देशामध्ये विदेशी व्यापाराची जलद गतीने वाढ होत आहे.विदेशी व्यापाराचा मोठा भाग बहुराष्ट्र कंपन्या नियंत्रित करतात. उदा. भारतातील फोर्ड मोटर्स कार निर्मिती उद्योग केवळ भारतीय बाजारपेठेसाठी कार उत्पादन करीत नाही तर विकसनशील देशातही कारची निर्यात करतो. त्याच प्रमाणे बहुराष्ट्रीय कंपन्या या विविध वस्तूंचा व्यापार आणि सेवा सुविधांमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात आपला ठसा उमटवीत आहेत. परकीय गुंतवणुक आणि परकीय व्यापक परिणामामुळे जागतिक उत्पादन आणि बाजारपेठ जवळ आलेली आहे.

**प्रश्न संदर्भ**

१. खालीलपैकी कोणते राष्ट्र हे विकसित राष्ट्र आहे?
अ. जपान
ब. बांग्लादेश
क. नायजेरिया
ड. केनिया

२. खालीलपैकी कोणते विकसनशील व अविकसित राष्ट्राचे वैशिष्टे नाही?
अ. एकूण लोकसंख्येच्या ७५% लोक हे शेतीमध्ये गुंतलेले असतात
ब.  देशाचे दरडोई उत्पन्न जास्त असते
क. शेतीमध्ये यंत्राचा वापर फारच कमी केला जातो
ड. देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्राथमिक क्षेत्राच्या उद्योगांचा प्रभाव जास्त असतो

३. पुढीलपैकी कोणती विकसनशील देशाची समस्या नाही?
अ. जलसिंचनाच्या समस्या
ब. नैसर्गिक आपत्ती
क.  देशाचे दरडोई उत्पन्न जास्त
ड.  आधुनिक उद्योगांची समस्या

४. तृतीय जगातील देशांच्या संकल्पनेच्या संदर्भात कोणते विधान योग्य नाही?

अ. लोकसंख्येचे दरडोई सरासरी उत्पन्न साधारणपणे कमी होते.

ब. शिक्षणाची पातळी कमी आहे

क. लोकसंख्या वाढीचा दर खूपच जास्त आहे

ड. सेवा क्षेत्रातील व्यवसाय जास्त आहेत

५. राजकीयदृष्ट्या तटस्थ असणे आणि आर्थिकदृष्ट्या विकसनशील असणे हे खालीलपैकी कोणत्या राष्ट्रांचे वैशिष्टे आहे?

अ. तिसऱ्या जगातील देश

ब. विकसित देश

क. अविकसित देश

ड. गरीब देश

❖❖❖❖

munotes.in

# ४

# बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिकीकरण

**घटक रचना**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांची उत्पादने

४.३ बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे विकसनशील /अविकसित देशांचा होणारा तोटा

४.४ जागतिकीकरण आणि भारतीय माध्यमे


## ४.० उद्दिष्टे

- बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे काय व त्यांचे स्वरूप समजून घेणे
- बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव अभ्यासणे
- जागतिकीकरणाची संकल्पना समजून घेणे
- जागतिकीकरणाचा शेतीवरील परिणाम अभ्यासणे
- नवीन आर्थिक धोरण समजून घेणे
- विविध देशांच्या संघटनांची माहिती समजून घेणे

## ४.१ प्रस्तावना

### बहुराष्ट्रीय कंपन्या

बहुराष्ट्रीय कंपन्या या आंतरराष्ट्रीय व्यवसायाच्या चाव्या आहेत. बहुराष्ट्रीय कंपनी याचा अर्थ अनेक देशांकडून गुंतवणुक करून व्यापार करणारी कंपनी देशाबाहेरील कंपन्या या जगातील सर्वात मोठया आर्थिक संस्था आहेत. जवळपास ३०० मोठया बहुराष्ट्रीय कंपन्या जगातील एक चतुर्थांश उत्पादित मालमत्तेचे नियंत्रण करताना त्यांची किंमत सुमारे ५० अब्ज यू.एस.डॉलर आहे.

जगात सर्वत्र मोठया प्रमाणात बहुराष्ट्रीय कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. त्यांचे प्रमुख उद्देश म्हणजे भांडवलाची गुंतवणुक करणे, तंत्रज्ञान, अधिकाराची माहिती प्राप्त करणे आणि विपणन कौशल्य प्राप्त करून विदेशात व्यापार सुविधा स्थापन करणे होय. याचा परिणाम सामान्य ग्राहकांच्या दैनंदिन जीवनमानावर होत आहे. याची परिणती त्यांचा व्यवसाय बाहेर देशात वाढविण्यासाठी विकसनशील देशावरील प्रभावाविषयी चर्चा करीत असतात. यातील वाद - विवादावर एकांतात चर्चा केली जाते.

munotes.in

अर्थतज्ञानी एकत्रित येऊन एक मताने असे म्हटले आहे की आधुनिकीकरणाला बहुराष्ट्रीय कंपन्या मूर्त स्वरूप देतात आणि संपत्तीची माहिती पूर्ण तंत्रज्ञान, भांडवल समृद्धी रोजगाराची परिपूर्णता याची हमी देतात. विकसनशील देशातील सरकार सरकार या बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या देशात / राज्यात आणण्यासाठी उत्सुक आहेत. व्यापार करारातील सुधारणेमुळे या कंपन्या इतर देशात निर्माण करून मोठया प्रमाणत नफा कमविला जातो.

विकसनशील देशांची वाढ आणि कार्यक्षमता यामुळे त्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी आपली दारे उघडीच ठेवलेली आहेत. भविष्यातील याचे परिणाम लक्षात घेणे महत्वाचे आहे. कारण जागतिक बाजारपेठेत विकसनशील देशांची प्रगती ही होऊ शकते किंवा त्यांची स्थिती खालावून देखील शकते. या बाबतील खालील पाच घटकांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**१) भांडवल** – विकसनशील देशासाठी भांडवल हे उत्पादनाचे साधन असून ती पायाभूत गरज आहे. आर्थिक प्रवाहाच्या संरचनेतील गुंतवणुकीसाठी हे देश विदेशी कंपन्यांना प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या माध्यमातून परवानगी देते. या कंपन्या विकसनशील देशाला आवश्यक असणाऱ्या साधनांचे वितरक करतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या सहाय्याने देशात तंत्रज्ञान देखील आणले जाते. मालाचे उत्पादन तसेच दळणवळणासाठी तंत्रज्ञान आयात केले जाते. या विदेशी कंपन्या उत्पादन आणि वितरणासाठी केवळ महत्वाच्या नाहीत तर त्या लहान कंपन्याच्या विकासासाठी सुध्दा उपयुक्त आहेत. या स्थानिक कंपन्यांकडे चांगले उत्पादन काढण्यासाठी यंत्रे व इतर साहित्य उपलब्ध आहेत. विकसनशील देश हे स्वच्छ, अधिक चांगले तंत्राज्ञानाचा परिचय करून देण्यासाठी पुढाकार घेत आहेत. उदा. १९९० मध्ये ब्राझील या देशात पेट्रोकेमीकल विभागात खासगीकारण करण्यासाठी ब्राझीलने पुढाकार घेऊन त्या प्रदेशातील पर्यावरणाचा अभ्यास करण्याचे स्वीकारले आहे.

**२) कौशल्य** – विदेशी कंपन्यांना कुशल कामगारांची आवश्यकता असल्यामुळे आपल्या देशातील कामगारांचे कौशल्य वाढविले आणि त्यांच्या कार्यक्षमतेवर दोन्ही कंपन्यांचा फायदा होतो.

**३) निर्यातीचे प्रमाण** – स्वदेशातून होणारी निर्यात ही उपयुक्त असते. त्यामुळे एकूण दरडोई उत्पन्न आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्न सुद्धा वाढते.

**४) नोकऱ्या निर्मितीची आश्वासने** – बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या सोबत रोजगार निर्मितीचे आश्वासने देतात. स्थानिक देश हे प्रामुख्याने स्थानिक कामगारांचा विदेशी कंपन्यामध्ये वापर केला पाहिजे असा करार करतात. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. या नोकऱ्यातून कामगारांना पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या आपल्या देशातील कंपन्या पेक्षा जास्त वेतन मिळते. स्थानिक कामगारांची गुंतवणुक सुद्धा घरगुती उत्पादन वाढवितात. यामुळे नागरिकांची वस्तूंचा वापर आणि खरेदी करण्याची क्षमता वाढते. मिळकत वाढली की लोक विविध वस्तु तसेच चैनीच्या वस्तु खरेदी करून आपल्या

राहणीमानाचा दर्जा वाढवितात. सरकारला कर मिळाल्यामुळे लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सरकार निधी उपलब्ध करून देते. आरोग्य शिक्षण आणि इतर कार्यक्रमांसाठी चांगला निधी प्राप्त होतो. अशा कार्यक्रमातून नागरिकांना राज्या-राज्यातून शिक्षणाच्या सुविधा व आर्थिक मदत होते.

**५) कठीण कामाचे नेतृत्व** – सामान्य समाजासाठी विकसनशील देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी केलेली गुंतवणुक चांगली असते. त्यामुळे समाजात कष्ट करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे देशाची प्रतिमा वाढते. कारण तेथील कामगार क्रियाशील असतात. ते देशाच्या आर्थिक सुधारणेसाठी महत्वाचे असते.

थोडक्यात बहुराष्ट्रीय कंपन्या या विकसनशील देशांसाठी फायद्याच्या असतात. त्या भांडवलाचा प्रसार, तंत्रज्ञान, कौशल्य आणि निर्यातीच्या माध्यमातून आर्थिक पर्यावरणाचा पाया विकसित करतात. नागरिक कल्याणाविषयी जाणीव असलेल्या सरकारच्या विकास आणि वाढीवर कंपन्या प्रत्यक्ष परिणाम करतात.

७) खनिज संपत्ती व उर्जासाधन संपत्ती यांचा विकास होतो.

८) देशांची मान जगात उंचावणारे भव्य प्रकल्प मिळतात.

९) देशातील आर्थिक व्यवसायात विविधता येते, वाढ होते.

१०) विविध प्रकारच्या सेवा-सुविधा, पाणी, वीज, शाळा, हॉस्पिटले, वाहतूक यांचा विकास होतो.

## ४.२ परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांची उत्पादने -

- **स्नानाचा साबण** – लक्स, रेक्सोना, लिरील, लाईफबॉय, पीयर्स, जॉन्सन बेबी सोप, पॉण्डस्, डेटॉल, निको.
- **कपडे धुण्याचा साबण** – सनलाईट, रीन, व्हील, सर्फ .
- **टूथ पेस्ट, दुधपावडर, टूथ ब्रश** – कोलगेट, फोर्ट्डान्स, क्लोजप, सिबाका, गलीम
- **चहा–कॉफी दुधपेये-** ब्रुक बाँड (रेडलेबल), लिप्टन (टाइगर, ग्रीनलेबल) नेस्कॅफे, ब्रु.पोलसन, बोर्नव्हिटा, कॉम्प्लान
- **बिस्कीट, चॉकलेट** – ब्रिटानिया, कॅडबरी, ५ स्टार
- **ब्लेड -**७ ऑक्लॉक, वेल्टेज,
- **शॅम्पू** - पॉण्डस्, हॅलो, हीना, पामोलिव, क्लिनिक स्पेशल, सनसिल्क
- **क्रीम**–क्लिअरसील, क्लियरटोन, ब्लूसील, फेअर अँड लव्हली, निविया, ओल्डस्पाईस, डेटॉल.
- **पावडर** – नायसिल, लिरील, पॉण्डस्, जॉन्सन बेबी पावडर
- **दुध पावडर**-मिल्कमेड, नेस्ले, फॅरेक्स, एव्हरीडे, सेरेलॉक

- **बूट चप्पल** – बाटा, करीना
- **पंखे** –जी.ई.सी., क्रॉम्टन, ग्रीव्हज
- **विजेचे सामान** –फिलिप्स, थॉमस, सॅन्यो
- **टोर्च आणि बॅटरी** – एव्हरेडी, जीवनसाथी
- **तेल /तूप** – डालडा, सोया, रिफाईड, क्रिस्टल, सनड्रॉप
- **पेय** – पेप्सी( लेहर, मिरांडा) कोकाकोला
- **आईसक्रिम** – कॅडबरी
- **पेन** –पार्कर, रेनॉल्ड

**भारतीय उत्पादने -**

**स्नानाचा साबण –** हमाम, चंदन, विजील, मोती, मार्गो स्वस्तिक, ओके, खसरोज, स्वस्तिक (शेकेकाई), सिन्थॉल, जाई पतंजली.

**कपडे दुण्याचा साबण** – निरमा, डबल ५५५, विमल, गोदरेजचा स्वस्तिक, डेप, ओडोपिक, सॅनीप्रशर, कुटील उद्योगाद्वारा बनविले गेलेले साबण, पतंजली.

**टूथपेस्ट, टूथपावडर, टूथब्रश-** मिस, प्रूडेन्ट, नीम, बबुल, ग्लोब. विकोवज्रदंती, डाबर, बैद्यनाथ लालदंतमंजन, माकडछाप दंतमंजन, पतंजली.

**चहा-कॉफी दुध पेये –** असम टाटा, बंगालकंचा चहा, पल्ली, महाराजा चहा, हस मुखाराय ॲन्ड कंपनी, इंडियन कॉफी व पतंजली.

**बिस्कीट ,चॉकलेट –** पारले, साठे, मॉर्डन, अमूल, बेकमेन, पतंजली.

**ब्लेड –** टोपाज, अशोक, भारत सिल्व्हर, सुपरमॅक्स, गॅलेट, मॅक्स.

**शॅम्पू –** टाटा अफगाण, लॅक्मे, कुटीर उद्योग.

**क्रीम –** विको, बोरोलिन, लॅक्मे, इमानी, बोरोप्लम, जयश्री, अफगाण, पतंजली.

**पावडर –** बोरोप्लस, लॅक्मे, नीमतुळस

**दुध पावडर-** अमूल (आईचे दुध सुरक्षित व सर्वश्रेष्ठ आहे )

**बूट-चप्पल –** लिबर्टी, लखांनी, प्लोक्स, भारत लेदर, कुटीर उद्योग.

**पेय –** थम्सअप, गोल्डस्पॉट, माजा, बिसलरी, डूक्स, मॅंगोला, लिमका.

## ४.३ बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे विकसनशील / अविकसित देशांचा होणारा तोटा

१) बहुराष्ट्रीय कंपन्यात आधुनिक यंत्रसामुग्री असल्यामुळे थोडयाच लोकांना रोजगार मिळतो.

२) स्थानिक गरीब लोकांकडून खूप काम करून घेतात व त्यांना अपुरे / कमी पैसे देतात.

३) कुशल कामगार बाहेरून आणल्यामुळे स्थानिक लोकांना कुशल कामगारांच्या नोकऱ्या कमी मिळतात.

४) यांत्रिकीकरणामुळे मनुष्यबळाची गरज कमी होते.

५) देशातील गरीब व श्रीमंत यांच्या मधील तफावत वाढत जाते.

६) कच्च्या मालाची निर्यात दुसऱ्या देशांना करतात. तसेच तयार झालेला पक्का माल दुसऱ्या देशात निर्यात करतात. स्थानिक बाजारपेठेत तो खूपच कमी प्रमाणात येतो.

७) कंपनीचे निर्णय दुसऱ्या देशात (मुख्यालयात) घेतात.कंपनी कधीही बंद करू शकतात.

८) कामगारांना आरोग्य विषयक, सुरक्षा विषयक अपुऱ्या सुविधा पुरवतात. संकटाच्या वेळी अपघातग्रस्तांना पुरेशी भरपाई न देता वाऱ्यावर सोडतात. उदा. युनियन कार्बाईड (भोपाल दुर्घटना)

९) पर्यावरणाच्या संवर्धनाकडे लक्ष देत नाहीत.

१०) स्थानिक राजकारणावर दबाव आणून / पैसे देऊन स्वतःच्या फायद्याचे निर्णय घेण्यास त्यांना भाग पाडतात.

**जागतिकीकरण म्हणजे काय-**
जागतिकीकरण म्हणजे देशाच्या सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय. यानुसार जागतिक अर्थव्यवस्थांचे संदर्भात विविध देशांच्या अर्थव्यवस्थेचे एकत्रीकरण समाविष्ट आहे. यावरून विवध देशांच्या अर्थव्यवस्थांचे परस्पर अवलंबन स्पष्ट होते. म्हणजेच जागातीकरण ही आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया आहे. खालील काही व्याख्यांवरून आपणाला जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करता येते.

**जागतिक बँक-** जागतिकीकरण म्हणजे १) उपभोग्य वस्तूंच्या समावेशासह सर्व वस्तूवरील आयात नियंत्रणे हळूहळू रद्द करणे २) आयात जकातीचे दर कमी करणे ३) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे होय.

**माल्कॉम एस. ॲडिसेशीयह-** जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था विकासाचे जागतिक साधन होय.

munotes.in

प्रा.सी.टी. कुरियन जागतिकीकरण म्हणजे विविधता असलेल्या अर्थव्यवस्थांचा समूह होय. ज्यात विविध कार्यक्रमाद्वारे एकमेकांशी परस्पर सहकार्य आणि कालांतराने त्यांच्या वृत्तीत बदल करणे.

**रूसी मोदी-** मुक्त स्पर्धा आणि नवे धोरण यांच्यातून उत्पादकता व उत्पादन वाढविणे व संपूर्ण जगाची एकच सलग बाजारपेठ निर्माण करून वस्तु व सेवांची विक्री करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

थोडक्यात जागतिकीकरणाच्या संकल्पनेत आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार, बहुराष्ट्रीय कंपन्याचा विस्तार व वृद्धी आंतराष्ट्रीय सहयोगी उद्योगांची वाढ व विस्तार. भांडवल व वस्तु यांचा आंतरराष्ट्रीय पातळी वरील मुक्त प्रवाह यांचा समावेश होतो.

**अ) वाहतूक तंत्रज्ञानाची भूमिका –** तंत्रज्ञानातील जलद सुधारणा हा एक प्रमुख घटक जागतिकीकरण प्रक्रियेस प्रेरणा देत असते. उदा. गेल्या पन्नास वर्षात बाह्य वाहतुकीच्या तंत्रज्ञानात अनेक सुधारणा झालेल्या आहेत.

**ब) माहिती आणि संदेश वहन तंत्रज्ञानाची भूमिका –** वाहतूक तंत्रज्ञानापेक्षा माहिती आणि संदेश वहन तंत्रज्ञानाची भूमिका जागतिकीकरणात जास्त महत्वाची आहे. अलीकडच्या काळात संपर्क माध्यमाच्या क्षेत्रात संगणक, इंटरनेट इत्यादी मध्ये प्रचंड बदल होत आहेत. जगात कुठे HIO एकमेकांना संपर्क साधण्यासाठी तार यंत्रणा, दूरध्वनी, मोबाईल (भ्रमणध्वनी) इ. संपर्क माध्यमांचा वापर करण्यात येतो. दुर्गम प्रदेशातील माहिती त्वरित उपलब्ध होऊन त्याच्याशी संपर्क साधता येतो. ही माहिती उपग्रहाच्या माध्यमातून पुरविली जाते.सध्या संगणकाने जवळपास सर्वच क्षेत्रात प्रवेश केलेला आहे. आज आपण इंटरनेटच्या अद्भुत जगात प्रवेश केलेला असून आपल्याला हवी असलेली कोणतीही माहिती उपलब्ध होते, इंटरनेटच्या माध्यमातून आपणाला जगात कोठेही अल्प दरात माहिती पाठवता येते व संभाषण करता येते.

**क) विदेशी व्यापार आणि गुंतवणुक योजनेचे उदात्तीकरण –** आयातीवरील कर हा व्यापारातील शर्तीचे एक उदाहरण आहे. काही मर्यादेमुळेच याला निर्बंध (शर्ती) म्हणतात. विदेशी व्यापार वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी सरकार व्यापारशर्तीचा वापर करते आणि कोणत्या प्रकारचा माल किती प्रमाणात देशात आणायचा ते ठरवते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने विदेशी व्यापार आणि विदेशी गुंतवणुकीवर काही बंधने (शर्ती) घातली आहेत. विदेशी स्पर्धे पासून देशातील उत्पादकांना वाचविणे आवश्यक आहे १९५० ते १९६० च्या काळात उद्योग धंदे निर्माण झाले होते. याच काळात आयात स्पर्धा वाढवून नवीन उद्योगांना परवानगी देणे शक्य नव्हते. भारताने केवळ यंत्र, खते, खनिजतेल इत्यादीनाच आयातीसाठी परवानगी दिलेली होती.

१९९१ च्या जवळपास भारताने आपल्या धोरणात काही बदल केले. भारत सरकारने असे ठरविले की, भारतीय उत्पादनांनी जागतिक उत्पादनाशी स्पर्धा केली पाहिजे. यामुळे उत्पादकांमध्ये उत्पादना विषयी सुधारणा होऊन उत्पादनाची गुणात्मक सुधारेल. अशा प्रकारे परकीय गुंतवणुक आणि परकीय व्यापारावरील शर्ती मोठया प्रमाणात कमी करण्यात आला. याचाच अर्थ मालात सुधारणा व्हावी व निर्यात करणे सोपे व्हावे आणि विदेशी कंपन्यांनी त्यांचे उद्योग आणि कार्यालये भारतात स्थापन करावीत असे सरकारला वाटते.

अलीकडे आपल्या असे निदर्शनास येते की, सरकार विविध प्रकारचे निर्बंध कमी करीत आहे, यालाच उदारीकरण म्हणतात. उदारीकरणाच्या माध्यमातून व्यापार व्यवसायात स्वतः निर्णय घेण्याची परवानगी दिली जाते व ते आयात व निर्यात करतात. यामुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यातील काही परिणाम खालील प्रमाणे.

**अ) ग्राहकांसाठी फायद्याचे -** जागतिकीकरण आणि उत्पादकांतील (स्थानिक आणि विदेशी) मोठया स्पर्धेचा फायदा हा प्रामुख्याने नागरी भागातील उच्च आणि मध्यम वर्गीय लोकांना होतो. ग्राहकांपुढे सुधारित दर्जाची व कमी किमतीची विविध उत्पादने येतात. याचाच परिणाम म्हणजे पूर्वीच्या तुलनेने आज मोठया प्रमाणावर रहाणीमान सुधारले आहे.

**ब) नवीन रोजगार -** बहुराष्ट्रीय कंपन्या गेल्या पंधरा वर्षापासून भारतात त्यांची गुंतवणुक वाढवीत आहेत.याचाच अर्थ भारतातील गुंतवणुक त्यांच्यासाठी फायद्याची आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या या नागरी भागात मोबाईल फोन, मोटार निर्मिती, विद्युत उपकरणे, शीत पेये, फास्टफूड तसेच बँकिंगच्या सुविधा निर्माण करण्यासाठी उत्साही असतात. या उत्पादन संख्या जास्त असून ग्राहक देखील भरपूर असतात. या उद्योग आणि सुविधांमुळे नोकऱ्या निर्माण होतात. या उद्योगांच्या भरभराटीसाठी स्थानिक कंपन्या सुध्दा कच्च्या मालाचा पुरवठा करतात. विदेशी कंपन्यांबरोबर एकत्र काम करून काही कंपन्या प्रचंड नफा कमवतात.

**क) नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादन पद्धती -** भारतातील अनेक कंपन्या वाढलेल्या स्पर्धेचा फायदा घेण्यासाठी समर्थ आहेत. त्यांनी उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान पध्दतीत गुंतवणुक केलेली आहे. काही कंपन्यांनी विदेशी कंपन्यांनी विदेशी कंपन्या बरोबर यशस्वी एकत्रीकरण करून आर्थिक फायदा मिळविला आहे.

**ड) भातातील मोठया कंपन्यांनी बहुराष्ट्रीय कंपनीत गणना / निर्मिती-** जागतिकीकरण हे काही मोठया कंपन्यांना बहुराष्ट्रीय कंपनी म्हणून उदयास येण्यासाठी शक्ती देते. उदा. टाटा मोटर्स, रॅनबॅक्सी, एशियन पेन्ट, सुंदरम फास्टनर इत्यादी या कंपन्यांच्या जगभर व्यापार चालतो.

**इ) सेवा उद्योगांचा विकास –** माहिती तंत्रज्ञानासारखा कंपन्यांना जागतिकीकरणामुळे नवीन संधी निर्माण होतात. भारतीय कंपनी लंडनमधील कंपन्यांवर आधारित मॅगेझीनचे उत्पादन करतात, तसेच भारतातील कॉलसेंटर्स ही उत्तम उदाहरणे आहेत. या व्यतिरिक्त डेटा एन्ट्री, जमा, खर्च, हिशोब, प्रशासकीय कार्य, अभियांत्रिकी या सारखी कामे करून विकसित देशांना पाठवितात.

**क) लहान उत्पादकांना धोका –** जागतिकीकरणामुळे लहान उत्पादन आणि कामगारांसमोर अनेक आव्हाने निर्माण होतात. प्लास्टिक खेळणी, दुग्ध उत्पादने, वनस्पती तेल, बॅटरी, कॅपॅसीटर या उत्पादनांच्या स्पर्धेमुळे लहान उद्योगांना जबर तडाखा बसलेला आहे. यामुळे काही केंद्रे बंद होऊन अनेक कामगार बेरोजगार झाले आहेत.

**ड) रोजगाराची अनिश्चितता-** जागतिकीकरण आणि वाढत्या स्पर्धेमुळे अनेक कामगारांच्या जीवनात बदल झालेले आहेत. वाढत्या स्पर्धेमुळे अलिकडे बहुतांश कामगारांमध्ये लवचिकता आलेली आहे. याचाच अर्थ कामगारांच्या नोकऱ्या फारश्या सुरक्षित राहिलेल्या नाहीत. पूर्वी कंपन्या कामगारांची कायमस्वरूपी नोकरी भारती करीत होत्या. परंतु आता त्यांना कंत्राटी नोकर म्हणून घेतले जाते. त्यामुळे त्यांना वर्षभर रोजगार देण्याची देखील गरज नसते. कामगार देखील जास्त तास काम करतात आणि रात्रपाळी देखील करतात. वेतन कमी देऊन कामगारांकडून जास्त वेळ काम करून घेतले जाते. वेतन कमी देऊन कामगारांकडून जास्त वेळ काम करून घेतले जाते. भारतातील अनेक औद्योगिक क्षेत्रात आणि सेवा केंद्रात वरील प्रमाणे कामगारांची स्थिती आहे. आज बहुतांश कामगार असंघटीत क्षेत्रात नोकऱ्या करीत आहेत.

**४) शेतीवरील परिमाण –** शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा आहे. असे म्हटले जाते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात शेती महत्वाची भूमिका बजावते. कारण शेती जवळ पास ७० टक्के लोकांना रोजगार उपलब्ध करून देते. त्यामुळे मोठया प्रमाणावरील लोकांचे जीवनमान शेतीवर आधारलेले आहे. शेतीतून सुमारे २९ टक्के एकूण राष्ट्रीय उत्पन्न मिळते. अनेक शेतीप्रधान उद्योगधंद्यांना कच्च्या मालाचा शेतीतून पुरवठा होतो. उदा. कापड उद्योग, साखर उद्योग, साखर निर्मिती उद्योग, ताग उद्योग, तेलबिया इत्यादी शेतीप्रधान उद्योगातून उत्पादित होणाऱ्या कापड, साखर, मसाल्याचे पदार्थ इत्यादींचा भारतीय निर्यात मूल्यात २० टक्के वाटा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास आणि ग्रामीण लोकांची खरेदी क्षमता वाढावी यासाठी शेतीचा विकास होणे आवश्यक आहे.

**१) नवीन आर्थिक आणि नवीन शेतीविषयक धोरण –** इ.स.१९९१ मध्ये उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या दबावातून भारत सरकारला नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यासाठी भाग पाडले आणि इ.स.२००० मध्ये नवीन शेती विषयक धोरण अमलात आले. याचा महत्वाचा उद्देश म्हणजे पुढील २० वर्षात दरवर्षी ४ टक्के वाढीचा

दर आणि शेतीकारार व कंत्राटी शेतीतून खाजगी सहभाग वाढविणे होय. अन्न धान्याच्या पिकामध्ये आधुनिक सुधारणा करण्यासाठी देखील ते मदत करते. शेती संशोधानास प्राधान्य, सुक्ष्म ठेवीची वाढ, सहकारी संस्थांची बढती, जमीन सुधारणा, शेतीजमिनीच्या तुकडी करणाचे एकत्रीकरण, अतिरिक्त जमिनीचे पुर्नवितरण आणि शेतीसाठी खाजगी जमीन जमीन करारावर देणे इत्यादी नवीन आर्थिक व नवीन शेती विषयक धोरणाची उद्दिष्टे आहेत. आता सरकार उदारमतवादी धोरण स्वीकारून शेती बाजारपेठ निर्माण करीत आहे.

**२) शेती उत्पादनात वाढ –** शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात उत्पन्न वाढवावे यासाठी जागतिकीकरण अनेक संधी आणि पर्यायांची ओळख करून देते. निर्वाह शेती बंद होऊन नगदी पिकांच्या शेती केली जाते. त्यामुळे महाराष्ट्रातील लहान शेतकरी २00 ते ४०० डॉलर अतिरिक्त उत्पन्न प्राप्त करीत आहेत.

**३) तंत्रादनातील दरी कमी करणे –** विकसित देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांच्या मदतीने समस्या सोडविण्यासाठी आणि तांत्रिक दरी कमी करण्यासाठी जागतिकीकरण मदत करते. असे अनेकदा निदर्शनास येते की भारतात एक टन तांदूळ उत्पादनातील संयुक्त संस्थानाच्या तुलनेने तीन पट अधिक कष्ट घ्यावे लागतात. जागतिकीकरणाच्या मदतीने शेतीय बदलांचा विकास केला जात आहे. भारतात मौल्यवान नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन तसेच वेळ वाचविण्यासाठी उत्तरेकडील तांदूळ आणि गहू उत्पादन पट्ट्यात आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्राची मदत केली जाते. याला शून्य मशागत पद्धती म्हणतात. याद्वारे बियाणे प्रत्यक्ष मातीत टाकले जाते. शेतकऱ्यांना खर्चिक व वेळ लागणाऱ्या शेत नागरण्याची गरज नसते. यामुळे ७५ टक्के ट्रॅक्टरचे इंधन वाचते. यामुळे ३० ते ५० टक्के कमी पाणी लागते व चांगले उत्पादन येते. शेतकरी जवळ पास दर हेक्टरी ६५ डॉलरची बचत करू शकतात. त्यामुळे त्यांच्या उत्पादनातील मोठी मिळकत वाढते.

**४) चांगल्या शेती तंत्रज्ञानाचा प्रसार -** भारतातील प्रगत शेतकरी म्हणतात की, चांगले उपलब्ध तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय शेती संबंधित कंपन्यातील सुशिक्षित तरुण कामगार त्यांच्या भौगोलिक क्षेत्रात चांगल्या शेती तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी मदत करतात. मोहमद मुश्ताक (शेती तज्ञ) यांनी हिमाचल प्रदेशात तंत्रज्ञानाची सुरुवात करण्यासाठी मदत केली. त्यांनी सीरमूर जिल्ह्यातील मोरनी या ठिकाणी ३०००० चौरसफूट या क्षेत्रात स्वतःचे हरित गृह उभारले आहे. मागील दहा वर्षापासून त्यांनी लाखो रुपये कमवतो असे अनुमान आहे. दररोज १०-१५ शेतकरी त्यांचा सल्ला घेतात. अशाप्रकारे बहुराष्ट्रीय कंपन्या हिमाचल प्रदेशाच्या डोंगराळ राज्यात हरितगृह तंत्रज्ञानाचा प्रचार करण्यासाठी मदत करीत आहेत.

**अन्न प्रक्रियेतील वाढीसाठी संधी –** अमेरिकन कंपनी मॅकिंझीच्या मतानुसार भारतीय शेती व्यवसायात प्रामुख्याने अन्न प्रक्रिया उद्योग वाढण्यासाठी अनेक संधी आहेत.

भारतातील एकूण शेती उत्पादनाच्या केवळ १ टक्का उत्पादनावर प्रक्रिया केली जाते. याच्या तुलनेत संयुक्त संस्थाने, ब्राझील आणि फिलिपाईन्समध्ये हे प्रमाण ७० टक्के आहे. जागतिक सल्लागारांच्या असे निदर्शनास आले की ९९ टक्के अन्न हे घरगुती स्तरावर किंवा लहान कुटीर उद्योग आणि मोठे आद्योगिक क्षेत्र साहस दाखवितात आणि जागतिक बाजारपेठेत मागणी असलेल्या उत्पादनाची निर्यात करतात. उदा. आंब्याचा गर इत्यादी. देशात 'मेगा फूड पार्क' च्या विकासासाठी सरकार १५०० कोटी रुपयांची अनुदान योजना जाहीर करून अन्न प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन देत आहे.

**ताज्या शेती उत्पादनांचे विपणन –** जागतिकीकरणाच्या ताज्या शेती उत्पादनावर देखील प्रभाव पडतो. भारत मध्यमवर्गीयांचा देश असला तरी त्यांची खरेदी शक्ती संपूर्ण युरोप समान आहे. भारतातील घटक हे नवीन व्यवसाय पर्यावरणाची आवश्यकता आणि गतिशीलता ठरवितात. भारतीय शहरात सुपर मार्केट डिपार्टमेंटल स्टोअर्स आणि मॉल यांच्या एकत्रित साखळीच्या माध्यमातून ताजे पदार्थ किरकोळ भावाने विकले जातात. पुढील काही वर्षात हा बाजार विभाग शून्य टक्क्यावरून ३० टक्क्यापर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. जागतिकीकरणानंतर या विकासास सध्याच्या विपणन संबंधातील प्रखर बदल अपेक्षित आहे.विपणन हे प्रामुख्याने लहान शेतकऱ्यांकडून दुर्लक्षित जाते त्यामुळे त्याच्याकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे.

**५) जागतिकीकरणाच्या इतर बाजू –** जागतिकीकरणाच्या युगात प्रामुख्याने शेतीतील परिवर्तन ही भारताची अत्यंत गरज आहे. जागतिकीकरण जगाला जवळ आणत आहे. अर्थव्यवस्थेच्या विविध विभागात ते प्रचंड स्पर्धात्मक वातावरण निर्माण करते, जागतिकीकरणाच्या माध्यमातून केलेल्या कामासंदर्भात आज भारतीय शेतीला सुध्दा विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यातील काही समस्या किंवा आव्हाने खालील प्रमाणे आहेत.

**अ) जमीन सुधारणा -** सेझ नंतर जमीन सुधारणे संदर्भात बोलणे निरर्थक आहे याउलट ग्रामीण शेतकरी समाज व जमीन यात विसंगती आढळते. सेझ काळापूर्वी सर्व राज्य सरकार त्यांच्या राज्यात जास्तीत जास्त उद्योग स्थापन करण्याची प्रतिज्ञा करीत होते. तसेच विदेशी दौरे करून त्याच्या राज्यात परकीय भांडवल आकर्षित करीत होते. औद्योगिकरणाला विकासाची प्रतिकृती असे संबोधतात. ग्रामीण भागात उद्योग क्षेत्राला सुरुवातीच्या काळात विविध प्रकारची प्रलोभने, सर्व आवश्यक सेवा सुविधा, आर्थिक मदत व करामध्ये सुट यासारख्या तरतुदी करून देतात. याच प्रकारची प्रलोभने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिली जात नाहीत. राज्ये कोणत्याही परिस्थितीत औद्योगिकरण करण्याच्या उत्साहात शेतकऱ्यांवर जुलूम करून जमीन प्राप्त करून कायद्याद्वारे शेतकऱ्यांना थोडीफार देऊन त्यांच्या कुटुंबाचा जीवन जगण्याचा मार्गच हिरावून घेऊन कंपन्यांना शेती बहाल करतात. शेतकरी समाज्याच्या या नुकसानीमुळे उपाययोजनात प्रचंड बदल होत आहे.

**ब) ग्रामीण पर्यावरण प्रदूषित-** पश्चिम भारतातील सर्वच राज्यात नागरी केंद्रातील उद्योगधंदे ग्रामीण भागात स्थलांतरित होत आहेत. महाराष्ट्रातील नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद आणि कोकण पट्टा यामध्ये मोठया प्रमाणात प्रदूषण होत आहे. गोवा राज्यात सुध्दा प्रामुख्याने औषधे निर्मिती आणि मद्य निर्मिती कंपन्या ग्रामीण भागात निर्माण झालेल्या पहावयास मिळतात. या कंपन्या त्यांचे त्या टाकाऊ पदार्थ आजूबाजूच्या प्रदेशात टाकतात. त्यामुळे ग्रामीण शेती प्रदेशात जल प्रदूषण व हवेचे प्रदूषण होते.

**क) जमीन विक्री संदर्भातील सौम्य कायदे -** जमीन विक्रीचे कायदे सौम्य किंवा साधे असून ते उद्योगांच्या बाजूनेच आहेत. सर्व उद्योगांना सामाजिक वनीकरण आणि फळ बागाच्या नावाखाली जमीन विक्री कायद्यापासून सुट मिळलेली आहे. अशाप्रकारच्या सुधारणेमुळे अनेक औद्योगिक कंपन्या वनस्पती लागवडीच्या नावाखाली (जसे हरित पृथ्वी) स्टॉक मार्केटमधील ग्रामीण भागात गुंतवले जात आहे. आणि त्यामुळे ग्रामीण भागातील भूमी उपाययोजनात बदल होत आहे.

**ड) पीक पद्धतीतील बदल –** NEP आणि SAP च्या अंमलबजवणीनंतर पीक पद्धतीत अत्यंत महत्वाचा बदल झालेला आहे. प्रमुख अन्न पिके कमी होऊन उसा सारखे जास्त पाणी लागणाऱ्या पिकांची वाढ होत आहे. स्थानिक गरजांकडे दुर्लक्ष करून शेतीत जास्तीत जास्त निर्यातीची उत्पादने घेण्याचा कल वाढलेला आहे. जास्त उत्पादन देणाऱ्या हायब्रीड बियाणांनी स्थानिक बियाण्यापेक्षा जास्त महत्व मिळविलेले आहे.

**इ) परिस्थितीकिय समस्या-** उच्च मध्यम वर्गाची वाढती अन्नाची गरज बाजारपेठा पुरवतात गरीब आणि दुर्लक्षित ग्रामीण शेतकरी समाज हा त्यांच्या उत्पादनात समाधानी आहे. हायब्रीड पिकांच्या उत्पादनासाठी कीटकनाशकांची गरज लागते त्यामुळे जास्तीत जास्त पाण्याचा पुरवठा करावा लागतो. बि-बियाणे शेतीस मोठया प्रमाणात महत्व प्राप्त होत आहे. महिको सारख्या बियाणे निर्माण करणाऱ्या कंपन्या शेतकऱ्यांना कोणत्या पिकांचे उत्पादन केव्हा व कसे घ्यावे. पिकांकडे कसे लक्ष द्यावे या संदर्भात मार्गदर्शन करतात. रासायनिक खते, कीटकनाशके आणि हायब्रीड बियाणे यांच्या वाढत्या वापरामुळे भूमीगत पाणी दुषित होते. त्यामुळे ग्रामीण भागातील पर्यावरणाची हानी होते.

**फ) जैव विविधतेचा ऱ्हास –** गेल्या अनेक दशकापासून दुर्गम भूमीत आदिवासी उत्पादन घेतात. काही वेळा त्यांचे वारस वन संरक्षणाच्या नावामुळे नेहमी शेती करीत नाहीत. परंतु उद्योगांचे या वन्य भूमीत स्वागत केले जाते. व्यापारी दृष्टीकोनातून सागासारख्या वनस्पतींचा नाश होतो. त्यामुळे जैविविधता धोक्यात येते. याचा विपरीत परिणाम आदिवासी लोकांवर होतो. आदिवासी लोकांना वनातून इंधन, औषधी वनस्पती, अन्न व जीवन जगण्याची साधने उपलब्ध होतात.

munotes.in

**ग) जागतिकीकरणाचे शेतीवरील इतर परिणाम –**

**१) आर्थिक मदतीची समस्या –** जागतिक व्यापार संघटनेच्या मार्गदर्शनाने भारत व्यापारी निर्बंध कमी करून चांगला आर्थिक विकास करीत आहे. परंतु शेतीसाठीच्या आर्थिक मदतीच्या समस्येमुळे आणि अलीकडील करारांमुळे जागतिक व्यापार संघटनेच्या दृष्टीने शेती एक आक्षेपार्ह समस्या झालेली आहे. संयुक्त संस्थानातील मोठे शेतकरी १९ बिलियन डॉलर आर्थिक मदत घेतात. युरोपियन युनियन देखील यांस अपवाद नाही. दुसऱ्या बाजूला ते भारत सरकारवर शेतकऱ्याची आर्थिक मदत कमी करण्यासाठी दबाव आणतात. खरे तर भारतीय शेतकरी हे संयुक्त संस्थाने व युरोपियन युनियनच्या शेतकऱ्याशी स्पर्धा करू शकत नाहीत. आपले सरकार हे शेतकऱ्यांना कमीत कमी मदत निधी आणि सार्वजनिक वितरण पद्धतीला आर्थिक मदत पुरविण्यासाठी केवळ आश्वासन देते. संयुक्त संस्थाने आणि युरोपियन युनियनच्या मोठया सहकार्यामुळे भारतातील अन्नाच्या किंमती पेक्षा त्यांच्या किंमती कमी आहेत. बऱ्याच काळापासून आपण व्यापारी निर्बंध कमी केल्यामुळे भारतीय बाजारपेठेत संयुक्त संस्थाने आणि युरोपियन युनियन मधील प्रचंड पिक/ अन्नधान्य भारतात येण्याची शक्यता आहे. भारतीय शेती आणि शेतकऱ्यांना विदेशी स्पर्धेपासून वाचविण्यासाठी भरत सरकारने कडक उपाय योजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

**२) सार्वजनिक आणि खाजगी गुंतवणुकी –** आज सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्राची शेतीतील गुंतवणुक कमी कमी होत आहे. अन्नधान्यातील जागतिक व्यापाराच्या दृष्टीने विचार केला र जलसिंचन, संशोधन आणि विपणन, साठवणुकीच्या सुविध शीत गृहे इत्यादी सुविधांसाठी सरकारी आणि म्खाजागी गुंतवणुक करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. याचा उपयोग मृदेची उत्पादकता आणि विविध पिकांच्या उत्पादनाच्या विकासासाठी भारतीय शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो आणि जगातील अन्न बाजारात प्रभावीपणे स्पर्धा करता येईल.

**३) राष्ट्रीय स्तरावर अन्न पुरवठ्याला घटक –**

भारतातील कमी खरेदी शक्ती असलेल्या लोकाचे प्रमाण जास्त आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाचा परिणाम अन्न पुरवठ्यावर होतो. यांचे कारण म्हणजे मोठे शेतकरी स्थानिक बाजार पेठेत कमी किमतीत विक्री करण्यापेक्षा त्यांचे उत्पादन निर्यात करून जास्त किंमत मिळवितात. ही परिस्थिती टाळण्यासाठी सरकारने शेती मालाचा वापर आपल्या नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे.

**४) संयुक्त संस्थाने आणि युरोपियन देशातील आर्थिक सहकार्य कमी करण्यासाठी प्रयत्न –**

भारत हा विविध प्रकारची फळे, भाजीपाला मसाले, तांदूळ इत्यादींचे उत्पादना करणारा एक प्रमुख देश आहे. परंतु भारतातील कृषी उत्पादकता खूप कमी आहे. त्यामुळे भारतीय शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारात न जाणेच पसंत करतात. जागतिक व्यापार संघटनेच शेतीवरील करार हा केवळ भारतासारख्या विकसनशील देशासाठी लिखित

स्वरुपात अनुकूल आहे. परंतु त्याची अंमलबजावणी आणि उपयोगीही शेती उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पाठविण्यासाठी केला आहे. विकसित देश अनेक वर्षापासून त्यांच्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात सवलती देतात. त्यामुळे आपल्या सरकारने विकसित देशांच्या माध्यमातून विकसित देशातील शेतकऱ्यांच्या सवलती कमी करण्यासाठी दबाव आणला पाहिजे आणि श्रीमंत व विकसनशील देशासाठी शेतकऱ्यांच्या सारख्याच स्तरावर आणणे आवश्यक आहे.

**५) व्यापारा संदर्भात बुद्धिवंत मालकी अधिकाराची उपयोगिता आणि भारतातील शेती –**

जागतिक व्यापार संघटनेची व्यापारा संदर्भातील बुद्धिवंत मालकी अधिकाराची अंमलबजावणी केली आहे. भारतीय शेतीसाठी बियाणे आणि वनस्पतीचे मालकी अधिकार दिले जातील. ही गंभीर बाब आहे. विविध प्रकारची उत्पादने भारतासारख्या विकसनशील देशातील शेतीकडून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातात स्थलांतरित केली जाऊ शकतात. उदा. भारतातील 'नीम' बासमती आणि हळदीच्या समस्या. हे देश त्यांच्याकडे उपलब्ध असलेली समृद्धी आर्थिक स्थिती साधन संपत्ती संशोधन आणि तज्ञ व्यक्तीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात वनस्पती आणि विविध प्रकारची बियाणे विकसित करू शकतात. त्यामुळेच तर भारत सरकारने शेती विभागाद्वारे लक्ष केंद्रित करून विविध शास्त्रज्ञांना वनस्पतीसाठी एकाधिकार प्राप्त करण्यासाठी उत्तेजन दिले आहे. आणि त्यासाठी कृषी विद्यापीठात संशोधन केंद्रे ही स्थापन करण्यात आलेली आहेत.

**६) शेतकरी वाद / समस्या –**

१९६० च्या दशकातील हरित क्रांतीही प्रामुख्याने अन्न धान्याच्या उत्पादनाच्या वाढीसाठी जबाबदार आहे. हरितक्रांतीतील अन्न धान्याच्या उत्पादन वाढीसाठी चांगल्या प्रकारच्या बियाणाचा वापर, जलसिंचनाच्या सुविधा, कीटक नाशके, जंतुनाशके व रासायनिक खतांचा वापर इत्यादी घटक महत्वाचे आहेत. असे असले तरी अन्नधान्याच्या उत्पादन वाढीसाठी पुढील काही घटक महत्वाचे आहेत हे घटक म्हणजे १) भारतीय शेतीही मोठ्या प्रमाणात मान्सून पावसावर आधारलेली आहे. हा पर्जन्य अनिश्चित बेभरवशाचा आणि असमान वितरणाचा आहे. २) शेतकऱ्याचे दारिद्र्य आणि शेतजमिनीचे लहान तुकडे यामुळे मालकाच्याद्वारे कसणाऱ्याची पिळवणूक आणि शेतीचा असंतुलित विकास हे देखील इतर घटक भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनातील मर्यादित वाढीसाठी जबाबदार आहेत. शेती साधनांच्या वाढत्या किंमती उदा. बियाणे खते, किटकनाशके इत्यादी आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील शेती उत्पादनांच्या तुलनात्मक कमी किंमती भारतीय शेतीसाठी समस्या निर्माण करतात. उदा. भारतातील बाजारपेठेतील गव्हापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजरपेठेत खरेदी केलेला गहू स्वस्त आहे. काही मिल-मालक स्थानिक बाजारपेठेतून गहू खरेदी करण्यापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून खरेदी करणे पसंत करतात. तसेच दूध आणि दुग्धजन्य पदार्थ आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून खरेदी करणे स्वस्त पडते.

**कर्जबाजारी शेतकरी –**

शेती संबंधित साहित्याच्या वाढत्या किंमतीमुळे लहान शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबावर परिणाम होतो. लहान शेतकरी वाढते कर्ज आणि तणावाखाली दाबले जात आहेत.

पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना यांनी केलेल्या अभ्यासानुसार पंजाब मधील ८९ टक्के शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकलेले आहे. पंजाबला भारताच्या धान्याचे कोथर म्हणतात आणि तेथील शेतकऱ्यांची अशी गंभीर परिस्थिती आहे. तर इतर राज्यांची काय परिस्थिती असेल.

**७) सेझची निर्मिती /सुरुवात –**

विकासाच्या नावाखाली भारतातील सुपीक शेतजमीन मोठ्या मोठ्या इमारती आणि माहिती तंत्रज्ञान इत्यादीसाठी बिल्डर लोकांकडे चाललेली आहे. पश्चिम बंगाल सिंनगूर तालुक्यात टाटा मोटर्सनी शेतकऱ्यांची जमीन संपादन केल्यामुळे टाटा मोटर्सच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले आणि शेतकऱ्यांचे बंड पश्चिम बंगालमधील नंदीग्राम, उत्तर प्रदेशातील दाद्री, हरयाणातील गुडगाव आणि महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात सेझ विरोधात आंदोलन पेटले.

**८) गरिबी –**

शेतीपिकांच्या अपयशामुळे व इतर अनेक कारणांमुळे ग्रामीण भागात गरिबी वाढत आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांचे संतापाची जाणीव निर्माण झालेली आहे. आपल्याला हे लक्षात घेतले पाहिजे की भारतातील एकूण नक्षलवाद्यांपैकी एक तृतीयांश नक्शलवादी प्रामुख्याने शेती उत्पादनातील अपयश आणि ग्रामीण दारिद्र्यामुळे निर्माण झालेले आहेत.

**९) पाण्याची कमतरता –**

बहुतांश बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांचे उद्योग उदा. पेय, अन्न प्रक्रिया, वन संस्कृती इत्यादी ग्रामीण भागातच सुरु करतात. या सर्व उद्योगांना प्रचंड पाणी लागते या कंपन्या मोठ्या प्रमाणात भूमिगत पाण्याचाच उपसा करतात. यामुळे पाण्याची कमतरता निर्माण होते. किनाऱ्या लगतच्या प्रदेशात विहिरीतून मोठ्या प्रमाणात पाणी काढले जाते. त्यामुळे विहिरीतील पिण्याचे पाणी क्षारयुक्त होण्यास सुरुवात होते. तसेच काही विहिरी कोरड्या पडतात. अशा प्रदेशात दिवसेंदिवस पाण्याची कमतरता मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे.

**१०) शेतकऱ्यांच्या आत्महत्या –**

भारतात ७० टक्के शेतकरी त्यांच्या छोट्याशा जागेवर शेती करून आपली या अन्नाची गरज पूर्ण करतात व नियमित उत्पन्न मिळवतात. त्यापैकी बहुतांशी लहान आणि दुय्यम गटातील असून त्यांच्याकडे ०.४ हेक्टर जमीन आहे. शेतजमिनीचे लहान तुकडे,

उत्पादनाच्या वाढत्या किमती, वाढते कर्ज, काही शेतमालाच्या आंतरराष्ट्रीय बाजार पेठेतील कमी दर यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात. विदर्भातील शेकडो शेतकऱ्यांनी यामुळे आत्महत्या केलेल्या आहेत.

'राष्ट्रीय ज्ञान मंडळ' भारत सरकारने हे मंडळ स्थापन केलेले असून त्याच्या २००६ च्या राष्ट्रीय अहवालात खालील गोष्टी आहेत – शेती भारतातील ६० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्येला जीवन जगण्यासाठी प्रमुख साधने पुरविते. एकूण दरडोई उत्पन्नाचा भाग सतत कमी होत असला तरी देशातील हा मोठा आर्थिक विभाग शिल्लक आहे. देशाच्या विविध भागातील शेतीच्या समस्यांची होणारी वाढ आणि कमी व लहरी वाढीचा दर हे केवळ राष्ट्रीय अन्न सुरक्षेवर नाही तर संपूर्ण देशाच्या आर्थिक जीवनात सुद्धा धोका पोहचवितात.

**११) संस्कृतीवरील परिणाम –**

मानव पूर्वीपेक्षा आज एकमेकांच्या जवळ आलेला आहे. पूर्वीच्या तुलनेने माहिती आणि चलन त्वरित स्थलांतरीत होते. जगाच्या एका भागात उत्पादित झालेला माल आणि सुविधा जगाच्या सर्वच भागात देखील उपलब्ध होतात. आंतरराष्ट्रीय संदेश वाहन हे अत्यंत सोपे झाले असून आंतरराष्ट्रीय प्रवास सुलभ झालेला आहे. आपण एकमेकांवर अवलंबित असून दळणवळणातील सुलभ आणि तत्पर प्रगतीमुळे पृथ्वीवरील मानवाची संस्कृती आणि प्रचंड फरक अनुभवण्यास मिळतो. आपणाला जगातील बहुतांश धोकादायक गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. या घटनेला **जागतिकीकरण** असे संबोधतात. जागतिकीकरणाचा काळ हा चालू कालावधीच्या वर्णनासाठी योग्य आहे. 'मंदी' 'शीतयुद्धाचा काळ' 'अवकाश युग' हे इतिहासाच्या विशिष्ट कालावधीचे वर्णन जागतिकीकरणातून होते.

काही लोक जागतिकीकरणास जागतिक व्यापार असे संबोधतात. परंतू जागतिकीकरण केवळ व्यापारापुरते मर्यादित नाही. त्याची व्याप्ती प्रचंड आहे. जागतिक स्तरावर कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय दहशतवादी आणि इतर उपक्रम जगभर राबविले जातात. त्यांना देशाच्या सीमांचे बंधन नसते.

**प्रसार माध्यमांचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम –**

आजच्या युगातील प्रसारमाध्यमे आणि जागतिकीकरण ह्या अत्यंत गतिशील संकल्पना आहेत. आधुनिक समाजात त्या दोन्ही अदृश्य आहेत. प्रत्येक मानवाला जागतिकीकरणाशिवाय जगणे शक्य नाही. तो नेहमी काळ नाणी वेळेतील अडथळे पार करण्यासाठी विचार करीत असतो. पूर्वीपेक्षा आज जागतिकीकरण जास्त गतिशील झालेले आहे.

जागतिकीकरण ही घटना नसून प्रक्रिया आहे. ती आर्थिक प्रक्रियेपेक्षा खूप मोठी आहे. सर्व मानवाला एकत्र करणारी ही एक प्रक्रिया आहे. ती सध्याच्या पिढी समोरील अत्यंत

महत्वाचे आव्हान आहे. संपर्क माध्यमातील नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीमुळे पूर्वीचे तुलनेने आज जास्त आव्हानात्मक झालेले आहे. आपण एक लक्षात घेतले पाहिजे की माध्यमे ही आपल्या सर्वांना जागतिकीकरणाचा अनुभव देणारी साधने आहेत. आपण रेडीओवर पॉप म्यूझिक ऐकून हॉलीवूडचे सिनेमा पाहून किंवा विदेशात आपल्या मित्राला ईमेल पाठवून जागतिकीकरणाचा अभूतपूर्व अनुभव घेतो आणि जागतिक संस्कृतीचा उपयोग दर्शविणे शक्य नाही. आपण या घटनेचा विचार केला पाहिजे की आपल्याला त्याची गरज असून त्याच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी आपण स्वत: तयार असणे आवश्यक आहे.

**जागतिक माध्यम पद्धती –**

जागतिकीकरणाच्या युगात माध्यमांना समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण उत्पादन आणि वितरणाची माहिती आणि प्रतिमांचा तो जगातील एक महत्वाचा दूवा आहे. जागतिक माध्यमे अमर्याद निवड आणि स्वतंत्र माध्यमे पुरवितात. आवड निवडीचे स्वातंत्र्य आपण अनुभवीत आहोत.

जागतिक माध्यमे सध्या विकसित देशाद्वारे अंमलात आणली जातात. वार्नर ब्रदर्स, वॉल्ट डिस्ने, सोनी, जनरल इलेक्ट्रिकल्स इत्यादी त्यातील काही महत्वाची आहेत. याचाच अर्थ ते जागतिक बाजारपेठ चालवितात आणि लहान घटक त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नाहीत. या जागतिक युगात माध्यमांच्या शक्तीचे केंद्रीकरण / वाढ विशेषत: विकसनशील देशांसाठी एक गंभीर समस्या आहे.

## ४.४ जागतिकीकरण आणि भारतीय माध्यमे

माध्यम पद्धतीच्या विकासाचे आपण आज साक्षीदार आहोत. १९८० पर्यंत रेडीओ, वर्तमान पत्रे, दूरदर्शन आणि चित्रपट उद्योग स्वदेशी होते आणि भारत सरकारच्या माध्यमातून चालत होते. असे असले तरी भारतीय माध्यमांमध्ये १९९० च्या कालावधीत खुप बदल झालेले आहे. हा बदल सर्व प्रथम संयुक्त संस्थाने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांनी सरकारवर अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण करण्यासाठी दबाव आणला. दुसरे म्हणजे नवीन माहिती आणि संदेश वाहन तंत्रज्ञानाच्या आगमनातून देशाबाहेर मध्यम संस्था स्थापन करून त्यांचा मार्ग मोकळा करणे भारतीय माध्यम यंत्राने वरील आणि समाज व संस्कृती वर या विकासाचे परिणाम पहावयास मिळतात.

भारतासाठी जागतिकीकरण एक संधी तसेच धोका देखील आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या माध्यमांचा फायदा कमी व धोका जास्त आहे.

**संपर्क माध्यमांचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम –**

भारतीय संस्कृतीवर संपर्क माध्यमांचे जे चांगले परिणाम होतात ते आपणाला खालील प्रमाणे सांगता येतात.

१) **राष्ट्रीय एकात्मता –** दूरदर्शन, चित्रपट इत्यादी संपर्क माध्यमाची साधने राष्ट्रीय एकात्मता टिकवतात. ते विविध जाती धर्म संस्कुतीच्या लोकांना एकत्र करून समाजात शांतता व ऐक्य निर्माण करतात. उदा. दूरदर्शन मालिका 'झांसी की राणी' किंवा हिंदी सिनेमा 'गांधी' इत्यादी.

२) **कौटुंबिक संबंध / दृढ / मजबूत –** दूरदर्शन वरील काही कार्यक्रम कुटुंबाच्या एकत्रीकरणास मदत करतात. असे कार्यक्रम कुटुंबातील लोक एकत्रितपणे पाहतात आणि आनंदाने एकत्रित जीवन जगतात.

३) **स्त्रियांची सकारात्मक आणि कार्यक्षम भूमिका –** दूरदर्शन वरील काही कार्यक्रम आणि चित्रपटात स्त्रियांचा सकारात्मक आणि कार्यक्षम भूमिकेचे प्रदर्शन केलेले असते.

४) **आर्थिक विकास –** दैनिक वर्तमान पत्रातील जाहिराती, रेडीओ आणि दूरदर्शन प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या रोजगार निर्मिती करतात. एकदा रोजगार प्राप्त झाला की लोकांचा खरेदी शक्ती वाढते आणि यामुळे आर्थिक तसेच शैक्षणिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून राहणीमानात सुधारणा होते.

५) **जाणीव जागृतीत वाढ –** घटनात्मक अधिकारावरील वर्तमानपत्रातील अनेक लेख आणि रेडीओ व दूरदर्शन वरील अनेक कार्यक्रमातून सामाजिक आणि नैतिक आधार प्राप्त होतो. यातून घटनेने दिलेले अधिकार आणि जबाबदारीची जाणीव लोकांमध्ये निर्माण होते.

६) **सामाजिक समस्यांना पुढे आणणे –** विविध प्रकारची प्रसारमाध्यमे अनेक सामाजिक कार्यक्रमांना पुढे आणतात. उदा. बालकामगार, हुंड्याला विरोध, वाढत्या वयाच्या समस्या, अशा कार्यक्रमामुळे चांगल्या संस्कृतीच्या महत्वाविषयी जाणीव लोकांमध्ये निर्माण होते.

**संपर्क माध्यमांचे विघातक किंवा वाईट परिणाम –**

१) इ.स. १९९१ मध्ये भारतातील भागात केवळ १० टक्के लोकांकडे दूरदर्शन होते. परंतु १९९९ मध्ये त्याचे प्रमाण ७५ टक्क्या पर्यंत वाढले, ग्रामीण भागात देखील केवळ इंटरनेटच्या सुविधा स्वस्तात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. आणि त्यामुळे अनैतिक गोष्टी तरुण वर्गाच्या हाती मिळतात.

२) हिंसाचारात विशेषत: महिलांवरील अन्याय व अत्याचारात वाढ होते.

३) सामाजिक मुल्यांचा सर्वत्र ऱ्हास होत आहे. आणि त्यामुळे महिला आणि जेष्ठ लोकांचा आदर कमी झालेला आहे.

**विविध देशांच्या संघटना**

आपली राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध देश एकत्र येऊन संघटना स्थापन करतात. त्यामुळे जागतिक घडामोडी मध्ये त्यांना महत्त्व प्राप्त होते व त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होते.

१) **अरबलीग –** अरबी भाषा बोलणाऱ्या देशांनी २२ मार्च १९४५ साली ही संघटना स्थापन केली. याचे मुख्यालय कैरो, इजिप्त येथे असून सुमारे २२ देश याचे सभासद आहेत. त्यातील प्रमुख देश पुढील प्रमाणे – इजिप्त, इराण, जॉर्डन, कुवेत, कतार, सौदी अरेबिया, सिरीया, येमेन, अल्जेरिया इ.

२) **आशियन –** आग्नेय आशियायी देशांची संघटना ८ ऑगस्ट १९६७ ला या संघटनेची स्थापना झाली, याचे मुख्यालय जाकार्ता, इंडोनेशिया येथे आहे. सहभागी देश, बुनेई दारेसलाम, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, फिलीपिन्स, सिंगापूर, थायलंड व व्हियेतनाम – आग्नेय आशियाई देशांत आर्थिक स्थैर्य रहावे या देशांचा आर्थिक विकास व्हावा या उद्देशाने ही संघटना स्थापन करण्यात आली आहे.

३) **कॉमन वेल्थ –** पूर्वीच्या ब्रिटीश साम्राज्यातील देश या संघटनेत आहेत. याची स्थापना १९३९ साली झाली व याचे मुख्यालय लंडन, इंग्लंड येथे आहे. याची सदस्य संख्या सुमारे ५३ आहे.

४) **युरोपियन युनियन किंवा युरोपियन कम्युनिटी –** युरोपियन युनियन १९९४ पर्यंत युरोपियन कम्युनिटी या नावाने ओळखले जात असे. या संघटनेत पूर्वीच्या तीन संघटनांचा समावेश आहे. युरोपियन युनियनचे २७ सदस्य असून याचे मुख्यालय बेल्जियम मध्ये आहे. या संघटनेच्या १३ देशांमध्ये बेल्जियम, जर्मनी, ग्रीस, स्पेन, फ्रान्स, आयलंड, इटली, नेदरलँड, ऑस्ट्रिया, पोर्तुगाल, स्लोव्हेनिया व फिनलॅड) युरो हे समान चलन वापरले जाते.

५) **आंतरराष्ट्रीय हवाई वाहतून संघटना –** याची स्थापना १९४५ साली झाली. एकमेकांच्या सहकार्याने जगातील वाहतूक सुरक्षित नियमित व कमी खर्चात करण्यावर या संघटनेचा भर आहे.

६) **नाटो –** १९४९ साली साम्यवादी रशियाच्या विस्तार प्रक्रियेला तोंड देण्यासाठी ही संघटना स्थापन झाली. सुरुवातीला याचे १२ सदस्य होते. नंतर सदस्य संख्या २६ झाली. याचे मुख्यालय बेल्जियम मध्ये आहे.

७) **ओपेक : पेट्रोलियम तेल निर्यातदार राष्ट्रांची संघटना –** खनिज तेलाचे उत्पादन नियंत्रणात ठेऊन जागतिक बाजारपेठ तेलाला जास्त भाव मिळावा या उद्देशाने ही संघटना १९६० च्या सप्टेंबर मध्ये स्थापन झाली. सुमारे १३ तेल उत्पादक देश याचे सदस्य आहेत. याचे मुख्यालय व्हिएन्ना, ऑस्ट्रिया येथे आहे. सदस्य – अल्जीरुया, युकेडोर, गॅबन, इंडोनेशिया, इराण, इराक, कुवेत, लिबिया, नायजेरिया, कतार, सौदी अरेबिया, युएई, वव्हेनेझुएला.

**प्रश्न संदर्भ**

१. पुढीलपैकी कोणती बहुराष्ट्रीय कंपन्यांची (MNC's) वैशिष्ट्ये आहेत?
अ. स्थानिक वर्चस्व
ब. आंतरराष्ट्रीय ऑपरेशन
क. संसाधनांचे सामूहिक हस्तांतरण
ड. मोठा आकार

बहुराष्ट्रीय कंपन्या यापैकी कोणत्या घटकावर लक्ष केंद्रित करतात?
I. कॅपिटल
II. कौशल्य
III. निर्यात (8)
अ. केवळ I
ब. I, II आणि III
क. केवळ II आणि III
ड. केवळ III

२. ___________ म्हणजे देशाच्या सीमाबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय.
अ. उदारीकरण
ब. खासगीकरण
क. जागतिकीकरण
ड. निर्गुंतवणूक

३. पुढीलपैकी कोणता जागतिकीकरणाचा नकारात्मक प्रभाव आहे?
अ. नवीन रोजगार निर्मिती
ब. सकारात्मक भांडवल प्रवाह
क. सांस्कृतिक देवाणघेवाण
ड. औद्योगिक देशांमधील संरक्षणवादी धोरणे

४. बहुराष्ट्रीय कंपनी ही अशी कंपनी आहे जी उत्पादनाचे मालकी किंवा नियंत्रण________ मधून ठेवते
अ. एक देश
ब. एकापेक्षा जास्त देश
क. केवळ विकसनशील देश
ड. केवळ विकसित देश

❖❖❖❖

# ५

# प्रात्यक्षिक भूगोल

## (साधा स्तंभालेख)

**भौगोलिक माहिती प्रामुख्याने दोन प्रकारची असते.**

१) **काळाशी संबंधित माहिती** (Temporal Data) उदा. १९७१ ते २०११ या काळातील चीनच्या लोकसंख्येत झालेली वाढ किंवा तांदळाचे उत्पादन.

२) **प्रदेशाशी संबंधित माहिती** (Spatial Data) उदा. इंग्लंड, चीन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इत्यादी देशांची लोकसंख्या.

काळाशी संबंधित असलेली माहिती प्रामुख्याने सध्या आलेखाद्वारे दाखवितात. आलेखातील बिंदू रेषेद्वारे जोडले व त्यामुळे आलेखाच्या रेषेच्या स्वरूपावरून लोकसंख्येत किंवा उत्पादनात झालेली वाढ किंवा घट लक्षात येते.


ज्यावेळी दिलेली भौगोलिक माहिती प्रदेशाशी संबंधित असते त्यावेळी विविध प्रदेशातील माहिती स्वतंत्र असते. उदा. चीनमधील लोकसंख्येची वाढ भारताच्या लोकसंख्येच्या वाढीवर अवलंबून नाही व त्यामुळे अशी माहिती आलेखाप्रमाणे एकमेकांना जोडता येत नाही. अशी प्रादेशिक माहिती स्वतंत्र स्तंभलेखाद्वारे किंवा द्ण्डाकृती द्वारे दर्शविली जाते.

आलेखात केवळ बारीक रेषेचाच वापर केला जातो तर द्ण्डाकृतीत लांबी व रुंदी असणारा स्तंभ, द्ण्ड अथवा आयत वापरला जातो, त्यामुळे आलेखापेक्षाही द्ण्डाकृती चटकन डोळ्यात भरते व आलेखापेक्षा जास्त प्रभावी ठरते.


द्ण्डाकृती उभी किंवा आडवी दोन्ही प्रकारे काढता येते – म्हणजेच प्रदेशांची नावे क्ष अक्षावर किंवा य अक्षावर घेता येतात.

साध्या द्ण्डाकृतीतील प्रदेशांची नावे एक अवलंबित चाल उदा. प्रदेशातील लोकसंख्या किंवा उत्पादन दिलेले असते. साधी द्ण्डाकृती ही रेषात्मक आकृतीचा (Linear Diagram) एक प्रकार असल्यामुळे स्तंभाची किंवा द्ण्डाची लांबी दिलेल्या आकड्यांच्या समप्रमाणात असते. द्ण्डाची रुंदी फारशी महत्वाची नसते किंवा द्ण्डाकृतीचे वचन करताना रुंदीचा विचार केला जात नाही. असे असले तरीही दिलेल्या आकडेवारीचे स्वरूप, तिच्यातील एकूण घटकांची संख्या आणि ज्या कागदावर ही द्ण्डाकृती काढणार त्या कागदाचा आकार इत्यादी घटक लक्षात घेऊन द्ण्डाकृतीची रुंदी ठरवावी लागते. रुंदी फार कमी किंवा फार जास्त असल्यास द्ण्डाकृती बेढब दिसते. शक्यतो द्ण्डामधील अंतर हे त्या द्ण्डाच्या रुंदी इतकेच किंवा त्यापेक्षा कमी असावे.

munotes.in




खाली दिलेल्या आकृतीचे वचन करा व सोबतच्या प्रश्नांची उत्तरे द्या.




**धान्य उत्पादन :**


१) चीनमधील धान्याचे उत्पादन किती टन होते ?

२) थायलँडमधील उत्पादनापेक्षा चीन व भारतातील धान्याचे उत्पादन किती पटींनी जास्त आहे ?

३) धान्याचे सर्वात जास्त व सर्वात कमी उत्पादन कोणत्या देशात आहे ?

४) इंडोनेशिया, बांग्ला देश व भारतातील धान्याचे उत्पादन किती टन आहे ?

खालील आकृत्यांचे वाचन करा व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या.




१) कापसाचे सर्वात जास्त उत्पादन कोणत्या देशात आहे ?
२) रशिया, भारत व संयुक्त संस्थानातील कापसाचे उत्पादन किती टन आहे ?

**खालील माहिती द्ण्डाकृतीच्या सहाय्याने दाखवा.**

**भारतातील दशलक्षी शहरे**
**१९९१**

| शहर | लोकसंख्या (दशलक्षात) |
|---|---|
| मुंबई | १२.५७ |
| कलकत्ता | १०.८६ |
| दिल्ली | ८.३८ |
| मद्रास | ५.३६ |

**ज्यूट – जागतिक उत्पादन**
**१९९०-९१**

| देश | उत्पादन हजार टनात |
|---|---|
| भारत | १९२० |
| बांगलादेश | ८४९ |
| चीन | ५९० |
| थायलंड | १६० |

**विविध देशांमधील लोकरीचे उत्पादन**
**(उत्पादन हजार टनात**

| देश | उत्पादन |
|---|---|
| आस्ट्रेलिया | ११९० |
| रशिया | ४६५ |
| न्युझिलंड | ३१८ |
| चीन | ३२८ |

**जग – प्रमुख नदया**

| नदी | लांबी (किलोमीटर्समध्ये) |
|---|---|
| ॲमेझॉन | ६७५० |
| नाईल | ६६७० |
| गंगा | २६५५ |
| डार्लिंग | १८६६ |

munotes.in

# संयुक्त द्ण्डाकृती


ज्यावेळी दिलेल्या प्रादेशिक माहितीत दोन किंवा अधिक अवलंबित चले असतात. परंतु अशा चलांचा एकमेकांशी फारसा संबंध नसतो किंवा या अवलंबित चलांच्या एकत्रीकरणातून विशेष जास्त माहिती मिळविण्यासारखी नसते त्यावेळी अशी माहिती संयुक्त द्ण्डाकृतीच्या सहाय्याने दर्शविली जाते. अधोरेखित आलेखाप्रमाणेच संयुक्त द्ण्डाकृतीत प्रत्येक अवलंबित चल स्वतंत्रपणे साध्या द्ण्डाच्या सहाय्याने दर्शविले जाते. परंतु एखाद्या प्रदेशाशी निगडीत असणारी सर्व अवलंबित चले किंवा त्यांचे स्तंभ एकत्रितरीत्या संयुक्तपणे दर्शविली जातात आणि म्हणूनच या आकृतीस संयुक्त द्ण्डाकृती असे संबोधले जाते.

खालील आकडेवारी संयुक्त द्ण्डाकृतीच्या सहाय्याने दाखवा.


**भारत चीनमधील विविध पिकांचे उत्पादन**
**१९९० (उत्पादन हजार टनात)**

| पीक | भारत | चीन |
|---|---|---|
| चहा | ७३५ | ५२१ |
| तंबाखू | ४९० | २७११ |
| ताग | १९२० | ५९० |

**भारत व चीन – विविध पिकांचे उत्पादन**
**१९९०**




munotes.in




१) सर्वात जास्त व सर्वात साक्षरतेचे प्रमाण कोणत्या राज्यांमध्ये आहे ?

२) तामिळनाडू, मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये स्त्री-साक्षरतेचे प्रमाण किती टक्के आहे ?

३) स्त्री व पुरुषांच्या साक्षरतेमधील फरक कोणत्या राज्यांमध्ये सर्वात जास्त व सर्वात कमी आढळतो ?

**खालील आकडेवारी संयुक्त द्ण्डाकृतीच्या सहाय्याने दाखवा.**

**भारताच्या काही राज्यातील सुशिक्षितांची टक्केवारी १९९१**

| राज्य | पुरुष साक्षरतेची टक्केवारी | स्त्री साक्षरतेची टक्केवारी |
|---|---|---|
| हिमाचल प्रदेश | ७५ | ५२ |
| गुजरात | ७३ | ४८ |
| पंजाब | ३६ | ४९ |
| उत्तर प्रदेश | ५५ | २६ |

**काही देशांमधील विविध खनिजांचे उत्पादन १९९० – (उत्पादन दशलक्ष टनात)**

| खनिज | सं. संस्थाने | रशिया | भारत | चीन |
|---|---|---|---|---|
| लोह | ५४ | २३९ | ४९ | १०५ |
| कोळसा | ८६९ | ५७१ | १९० | १०५० |
| | | | | |

munotes.in

# विभाजित द्ण्डाकृती

## विभाजित द्ण्डाकृती (Divided Bars)

दिलेल्या आकडेवारीत दोन किंवा दोनपेक्षा जास्त अवलंबित चले असून ही चले एकमेकांशी संबंधित असतील किंवा त्यांच्या एकत्रित करण्यातून अधिक माहिती मिळण्यासारखी असेल अशी प्रादेशिक आकडेवारी विभाजित द्ण्डाकृतीच्या सहाय्याने दर्शविली जाते.


विभाजित द्ण्डाकृती काढताना पाहिल्या चलाची किंमत साध्या द्ण्डाकृतीप्रमाणे दर्शवून झाल्यावर दुसऱ्या चलाची किंमत दर्शविताना पहिल्या व दुसऱ्या चलाच्या आकड्याची बेरीज करून ती किंमत दर्शविली जाते. यामुळे प्रत्येक प्रत्येक चलामध्ये कशाप्रकारे फरक पडत जातो हे लक्षात येतेच परंतु त्याचबरोबर एखाद्या प्रदेशातील सर्व चलाची एकत्रित किंमत किती आहे ते ही समजते. विभाजित द्ण्डाकृती काढण्यासाठी प्रत्यक्ष आकडेवारी किंवा त्या आकडेवारीची यांचा वापर करता येतो.

**खालील माहिती विभाजित द्ण्डाकृतीच्या सहाय्याने दाखवा.**

**भारत-भूमी उपयोग**

| | भूमी उपयोग | क्षेत्राची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | शेती | ४६% |
| २. | वने | २३% |
| ३. | बिगर शेती | १३% |
| ४. | चराऊ | १०% |
| ५. | पडीक | ८% |

**भारत – भूमी उपयोग**




munotes.in

**खालील माहिती विभाजित द्ण्डाकृतीचा वापर करून दाखवा.**

**काही देशांमधील भुईमूगाचे उत्पादन – १९९०**

| देश | उत्पादन दशलक्ष |
|---|---|
| भारत | ७.५ |
| चीन | ५.९ |
| संयुक्त संस्थाने | १.६ |
| नायजेरिया | १.६ |
| इतर देश | ६.४ |
| एकूण | २३.० |

**भारताच्या काही राज्यांमधील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण – १९९१**

| राज्य | स्त्री साक्षरतेची टक्केवारी |
|---|---|
| केरळ | ८७ |
| नागालँड | ६५ |
| पश्चिम बंगाल | ४७ |
| राजस्थान | २० |

**जगाच्या नकाशात माहिती भरणे.**

जगाचा नकाशा – ॲटलास (नकाशा संग्रह) च्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी पुढील स्थाने /देश जगाच्या नकाशात दाखवून नावे लिहा. (प्रात्यक्षिक भूगोलातील स्थानांकित आकृत्या नकाशावर काढण्याच्या प्रश्नासाठी याचा उपयोग होईल).

न्यूयॉर्क
वॉशिंग्टन
सॅन फ्रान्सिस्को
संयुक्त संस्थाने
यु.के. (इंग्लंड)
कॅनडा
मेक्सिको
ब्राझील
अर्जेन्टिना
पेरू
चिली
रिओ डी जानेरो
लॉस एंजल्स
लिमा
लंडन
फ्रान्स
पॅरिस

दिल्ली
श्रीलंका
कोलंबो
सिंगापूर
इंडोनेशिया
ऑस्ट्रेलिया
सिडने
कॅनबेरा
न्यूझीलंड
कोरिया
पाकिस्तान
इराण
इराक
कुवेत
सौदी अरेबिया
इजिप्त
लिबिया

munotes.in

| | |
|---|---|
| बर्लिन | नायजेरिया |
| जर्मनी | दक्षिण आफ्रिका |
| नॉर्वे | केनिया |
| स्वीडन | घाना |
| फिनलँड | तुर्कस्थान |
| रोम | बांगलादेश |
| रशिया | हिंदी महासागर |
| जपान | प्रशांत महासागर |
| टोकियो | अटलांटिक महासागर |
| चीन | ग्रीनलँड |
| हाँग काँग | पोलंड |
| थायलँड | आर्टिक महासागर |
| भारत | स्पेन |

## प्रमाणबद्ध वर्तुळे

प्रमाणबध्द वर्तुळे / चौरस दिलेल्या आर्थिक आकडेवारी कक्षा (लहान व मोठ्या आकड्यामधील फरक) जास्त असल्यास अशा आकडेवारीसाठी आलेख किंवा स्तंभलेख काढणे शक्य होत नाही. कारण मोठे प्रमाण घेतल्यास आकृती कागदावर पुरत नाही व आकृती लहान करण्याचा प्रयत्न केल्यास फार छोट्या संख्या दर्शविता येत नाहीत. ही अडचण टाळण्यासाठी क्षेत्रीय किंवा क्षेत्रात्मक आकृत्याचा वापर केला जातो. ही अडचण टाळण्यासाठी क्षेत्रीय किंवा क्षेत्रात्मक आकृत्याचा वापर केला जातो. वर्तुळ आणि चौरस या क्षेत्रात्मक आकृत्या आहेत. या आकृत्याच्या बाबतीत वर्तुळाचे किंवा चौरसाचे क्षेत्रफळ दिलेल्या आकडेवारीच्या समप्रमाणात असते. क्षेत्रात्मक आकृत्यांमध्ये आकृतीची लांबी तशीच महत्वाची असल्यामुळे मोठ्या संख्याही कमी जागेत दर्शविणे शक्य होते. क्षेत्रात्मक आकृत्यातील वर्तुळ अथवा चौरस काढण्यासाठी गणिती पद्धत किंवा आलेख पद्धत अशा दोन पद्धती वापरल्या जातात. गणिती पद्धतीमध्ये दिलेल्या आकडेवारीतील संख्याचे वर्गमूळ अथवा चौरस काढण्यासाठी गणिती पद्धत किंवा आलेख पद्धत अशा दोन पद्धती वापरल्या जातात. गणिती पद्धतीमध्ये दिलेल्या आकडेवारीतील संख्याचे वर्गमूळ घेऊन त्या वर्गमूळाच्या प्रमाणात वर्तुळाची त्रिज्या किंवा चौकोनाची एक बाजू घेतली जाते. तर आलेख पद्धतीत ठराविक संख्या आणि त्यांचे वर्ग अनुक्रमे य आणि क्ष अक्षावर घेऊन आलेख काढला जातो. क्ष अक्षावर योग्य ते प्रमाण घेवू दिलेल्या आकडेवारीतील संख्या त्यात बसविल्या जातात व क्ष अक्षवरील त्या संख्यापासून आलेखापर्यंत लांब काढले जातात. हे लंब म्हणजे क्षेत्रात्मक आकृत्यांच्या वर्तुळाची त्रिज्या. क्षेत्रात्मक आकृत्यामध्ये चौरासापेक्षा वर्तुळ काढणे सोपे असल्यामुळे प्रामुख्याने वर्तुळाचाच वापर जास्त प्रमाणात केला जातो.


उदा. २५,१७० व ४८० या संख्यांसाठी वर्तुळाची त्रिज्या खालील आलेखाच्या आधारे ठरविता येईल.

१) १० से.मी. लांबीचा ‘क्ष’ अक्ष व ३ से.मी. लांबीचा ‘य’ अक्ष काढा. प्रत्येक से.मी. वर खुणा करा.

२) १ चा वर्ग १,२ चा वर्ग ४,३ चा वर्ग ९ याप्रमाणे किंमती अनुक्रमे य व क्ष अक्षंवरील घेऊन बिंदू स्थापन करा व आकृतीत दर्शविल्याप्रमाणे वक्र रेषेने ते बिंदू जोड.

३) क्ष अक्षावर प्रमाण घेताना १० से.मी. च्या बिंदुला ५०० ही संख्या माना (कारण दिलेल्या आकड्याची मोठी संख्या ४८० आहे व ५०० ही त्या आकड्याच्या जवळची मोठी पूर्ण संख्या आहे.)

४) क्ष अक्षावरील २५,१७० व ४८० या बिंदूच्या स्थानांपासून आलेखात रेषेपर्यंत लंब टाका व हेच लंब त्या आकड्यांसाठी काढण्यात येणाऱ्या वर्तुळाची त्रिज्या आहेत.




**खालील माहिती प्रमाणबद्ध वर्तुळांचा वापर करून दाखवा.**


**केरळमधील काही जिल्ह्यांची लोकसंख्या**


**१९९१**

| जिल्हा | लोकसंख्या (शेकड्यात) |
|---|---|
| कोलम | २३९ |
| इडूकी | १०७ |
| एर्नाकुलम | २७९ |
| पलक्कड | २३७ |
| वायनाड | ६७ |
| मलप्पुरम | ३०० |

munotes.in

## केरळमधील काही जिल्ह्यांची लोकसंख्या





### केरळमधील काही जिल्ह्यांची लोकसंख्या – १९९१

| जिल्हा | लोकसंख्या (शेकड्यात) |
|---|---|
| कोलम | २३९ |
| इडूकी | १०७ |
| एर्नाकुलम | २७९ |
| पलक्कड | २३७ |
| वायनाड | ६७ |
| मलप्पुरम | ३०९ |

**लोकसंख्या शेकड्यात**




वरील नकाशात केरळ राज्यातील काही जिल्ह्यांची लोकसंख्या स्थानांकित प्रमाणबद्ध वर्तुळाच्या सहाय्याने दर्शविली आहे. या पद्धतीत कोणत्या कमी किंवा जास्त आहे ते वर्तुळाच्या आकारावरून कळतेच परंतु तो जिल्हा कोठे आहे, त्याचे स्थान लक्षात येते. तसेच आजूबाजूच्या जिल्ह्यांची लोकसंख्या किती आहे तेही लक्षात येते. यामुळेच प्रमाणबद्ध वर्तुळांचे नकाशे अधिक भौगोलिक माहिती देतात व उपयुक्त असतात.

खालील माहिती वर्तुळांचा वापर करून दाखवा.

**केरळमधील काही जिल्ह्यांची लोकसंख्या – १९९१**

| जिल्हा | लोकसंख्या (शेकड्यात) |
|---|---|
| कोलम | २३९ |
| एर्नाकुलम | २७९ |
| पलक्कड | २३७ |
| वायनाड | ६७ |
| मलप्पुरम | ३०० |

**खालील माहिती वर्तुळांचा वापर करून दाखवा.**

भारताच्या काही राज्यांमधील तंबाखूचे उत्पादन (उत्पादन हजार टनात) १९४७-७५

| राज्य | उत्पादन |
|---|---|
| आंध्रप्रदेश | १८१ |
| गुजरात | १२७ |
| कर्नाटक | १९ |

**भारतीय बंदरातून होणारी निर्यात – १९७५-७६**

| बंदर | निर्यात (लाख टनात) |
|---|---|
| मुंबई | ४१ |
| मार्गागोवा | १२० |
| मद्रास | २८ |
| कलकत्ता | ३२ |

**खालील माहिती प्रमाणबद्ध वर्तुळांच्या सहाय्याने दाखवा.**

**भारतातील काही राज्यांची लोकसंख्या १९९१**


| राज्य | लोकसंख्या (हजारात) |
|---|---|
| पंजाब | २०१९ |
| जम्मू काश्मीर | ७७१ |
| त्रिपुरा | २७४ |
| गोवा | ३२ |

**प्रमुख महासागर**

| महासागराचे नाव | क्षेत्र (चौरस की.मी.मध्ये) |
|---|---|
| पॅसिफिक | १६५,२४२,००० |
| अटलांटिक | ८२,३६२,००० |
| हिंदी | ७४,५५६,००० |
| आर्टिक | १३,९८६,००० |

munotes.in

## जग - बॉक्साईट वितरण





### जगातील बॉक्साईटच्या खाणींचे प्रदेश

१) बॉक्साईटचे सर्वात जास्त व सर्वात कमी उत्पादन कोणत्या देशांत होते? किती टन?

२) भारत, चीन, जमेका, फ्रान्स, रशिया, ग्रीस, ब्राझील इत्यादी देशामध्ये बॉक्साईटचे उत्पादन किती टन झाले?

३) ऑस्ट्रेलियातील बॉक्साईटचे उत्पादन भारतातील उत्पादनापेक्षा किती पटींनी जास्त आहे?

### नकाशा क्र. २. लोकसंख्या वितरण





munotes.in

१) कोणत्या खंडाची लोकसंख्या सर्वात जास्त व सर्वात कमी आहे?
२) उत्तर अमेरिका व ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या किती आहे?
३) संयुक्त संस्थाने कॅनडा व नेदरलँडमधील नैसर्गिक वायूचे उत्पादन किती टन आहे?
४) नैसगिक वायूचे सर्वाधिक उत्पन्न कोणत्या देशात आहे?

**नकाशा क्र. ३. नैसर्गिक वायूचे जागतिक उत्पादन**

**जग – नैसर्गिक वायूचे वितरण**




## विभाजित वर्तुळ

विभाजित वर्तुळांच्या सहाय्याने एखाद्या घटकाचे विविध भाग दर्शविणे सुलभ होते. उदा. भूमी उपाययोजनांचे वन, शेती, पडीक इत्यादी प्रकार विभाजित वर्तुळांच्या सहाय्याने दर्शविता येतात. दिलेली माहिती टक्केवारीच्या स्वरुपात असल्यास ३६०° बरोबर १००% असे प्रमाण गृहीत घरून टक्केवारीसाठी किती अंशाचा कोन काढता येईल ते काढले जाते. उदा. वनव्यास प्रदेश ५०% असल्यास

$\therefore$ 100%-360

50%

$$\frac{50 \times 360}{100} = 180^0$$


म्हणजेच वर्तुळातील १८० अंशाचा कोन वनव्यास प्रदेश दर्शविल. याप्रमाणे इतर भागांसाठी कोन काढून वर्तुळात दाखविता येतील.

पुढील माहिती विभाजित वर्तुळाच्या सहाय्याने दाखवा.


munotes.in

भारतातील लोह खनिजांचे साठे –

उडीसा ३२%, बिहार २३%, मध्य प्रदेश २०%, कर्नाटक १७%, इतर राज्ये ८%




खालील आकृतीचे वाचन करा व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या.



**भारत भूमी उपयोग**

१) वने आणि कुरणांनी एकूण किती टक्के क्षेत्र व्यापले आहे?

२) भारतातील प्रमुख भूमी-उपयोग कोणता आहे?

**कापूस - जागतिक उत्पादन**





कापसाचे जागतिक उत्पादन

१. भारत, रशिया, सं. संस्थाने आणि चीन या देशांमधील कापसाचे उत्पादन जागतिक उत्पादनाच्या किती टक्के आहे?

२. जागतिक उत्पादनाच्या १५% पेक्षा जास्त उत्पादन कोणत्या देशांचे आहे?

**पृथ्वीवरील विस्तारणारी वाळवंटे**




टीप : या नकाशात सध्या अस्तित्वात असलेल्या वाळवंटी प्रदेशाचे व वाळवंटी-करणमुळे ओसाड होऊ शकणाऱ्या प्रदेशाचे प्रमाण दाखविले आहे.


**पृथ्वीवरील विस्तारणारी वाळवंटे**

१) सध्या अस्तित्वात असलेल्या वाळवंटाचे प्रमाण कोणत्या खंडात जास्त आढळते?

२) वाळवंटीकरणाचा धोका कोणत्या खंडामध्ये जास्त व कोणत्या खंडामध्ये कमी आहे?

munotes.in

**जग - खंडवार भूमीउपयोजन**





**खंडानुसार भूमी उपयोग**

१) कोणत्या खंडात वनांचे प्रमाण सर्वात कमी आहे?

२) शेतीचे प्रमाण कोणत्या खंडात सर्वात जास्त व कोणत्या खंडात सर्वात कमी आहे?

**जग – ग्रामीण व नागरी लोकसंख्या**

जग - ग्रामीण व नागरी लोकसंख्या




munotes.in

**ग्रामीण व नागरी लोकसंख्या**

१) नागरी लोकसंख्यांचे प्रमाण कोणत्या खंडामध्ये जास्त आहे व कोणत्या खंडामध्ये कमी आहे?

२) आशियातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण किती आहे?

**खालील आकृत्यांचे वचन करा व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या.**

**गहू-जागतिक उत्पादन**




**रबर - जागतिक उत्पादन**




गहू

१. कोणत्या देशांमधली गव्हाचे उत्पादन जागतिक उत्पादनाच्या १०% पेक्षा जास्त आहे?

रबर

१. इंडोनेशिया, मलेशिया व थायलँड मधील रबराचे उत्पादन एकत्र केल्यास ते जागतिक उत्पादनाच्या किती टक्के असेल?

२. सर्वात जास्त रबराचे उत्पादन कोणत्या देशात होत?

**गहू-जागतिक उत्पादन**




**रबर - जागतिक उत्पादन**




गहू

१. कोणत्या देशांमधली गव्हाचे उत्पादन जागतिक उत्पादनाच्या १०% पेक्षा जास्त आहे?

रबर

१. इंडोनेशिया, मलेशिया व थायलँड मधील रबराचे उत्पादन एकत्र केल्यास ते जागतिक उत्पादनाच्या किती टक्के असेल?

२. सर्वात जास्त रबराचे उत्पादन कोणत्या देशात होत?

munotes.in

**खालील माहिती विभाजित वर्तुळांच्या सहाय्याने दाखवा.**

**महाराष्ट्रातील विद्यार्थी संख्या १९९०**

| अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्या (हजारात) |
|---|---|
| प्राथमिक | १०१६ |
| माध्यमिक | ३८७ |
| उच्च माध्यमिक | २७० |
| उच्च शिक्षण | ८७ |

**केरळमधील विद्यार्थी संख्या १९९०**

| अभ्यासक्रम | क्षेत्र (चौरस की.मी.मध्ये) |
|---|---|
| प्राथमिक | ३०५ |
| माध्यमिक | १८८ |
| उच्च माध्यमिक | ११० |
| उच्च शिक्षण | १० |

**भारतातील जलसिंचन (१९७०-७१)**

| जलसिंचनाचा प्रकार | जलसिंचित क्षेत्राची टक्केवारी |
|---|---|
| कालवे | ४०% |
| विहिरी | ३८% |
| तळी | १५% |
| इतर | ७% |

**तान्ही बाळे कुठे मरतात?**

(१९७३ ते १९८० या कालावधीत जगभर मृत्यू पावलेल्या तान्ह्या बाळांची टक्केवारी)

| प्रदेश | मृत्यू पावलेल्या तान्ह्या बाळांची टक्केवारी |
|---|---|
| दक्षिण व पूर्व आशिया | ५५% |
| आफ्रिका | २४% |
| दक्षिण अमेरिका | १८% |
| विकसित देश | ३% |

**प्रश्न संदर्भ**

१. ____________ हि रेषीय (liner) सांखिकीय आकृती आहे

१. क्षेत्रीय

२. वर्तुळ

३. दंडकृती / स्तंभालेख

४. पायआकृती



munotes.in

२. दोन किवा अधिक स्तभालेखांची तुलना ___________या आकृतीत करता येईल.

१. साधा स्तंभालेख

२. संयुक्त स्तंभालेख

३. विभाजित स्तंभालेख

४. तुलात्मक स्तंभालेख

३. विविध देशांमधील तांदळाचे उत्पादन व तांदळाचे एकूण उत्पादन आपल्याला ___________या आकृतीने दर्शविता येईल

१. साधा स्तंभालेख

२. संयुक्त स्तंभालेख

३. विभाजित स्तंभालेख

४. वर्तुळ

४. वक्राकार आलेखाचा वापर __________ हि आकृती काढण्यासाठी केला जातो

१. साधा स्तंभालेख

२. विभाजित स्तंभालेख

३. वर्तुळ

४. संयुक्त स्तंभालेख

५. विभाजित वर्तुलाची ___________आकृती असे संबोधले जाते

१. विभाजीत स्तंभ

२. पाय

३. रेषीय

४. स्तंभालेख

❖❖❖❖